शुक्रवार, ३१ मार्च २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०२ अंक -२०९
आरएनआय : एमएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) • FRIDAY 31 MARCH 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | • YEAR-02 • ISSUE-209 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-14 • PRICE-5

१८१ दिवस
मुदत ठेवीवर मिळवा
11% व्याजदर
* नियम व अटी लागू
टोल-फ्री : 18004197501 rajasthanimultistate.in

राजस्थानी मल्टीस्टेट
कार्यक्षेत्र महाराष्ट्र-कर्नाटक
राजस्थानी मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सो.लि., परळी वैजनाथ
बँकींग • आरोग्य • शिक्षण • रियल ईस्टेट • इन्शुरन्स
चंदुलाल बियाणी
चेअरमन

कार्यरत शाखा :
मुख्य कार्यालय व शाखा : मोंढा मार्केट, परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072178/88
पंचशिल नगर शाखा : विद्यानगर जलालपूर रोड, पंचशिल नगर, परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072809
मुख्य शाखा विस्तारित कक्ष : ऊर्जा प्लाझा, गणेशपार रोड, परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072181
पंचशिल नगर शाखा विस्तारित कक्ष-१ : दिगंबर कॉम्प्लेक्स, नेहरू चौक (तळ), परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072180
पंचशिल नगर शाखा विस्तारित कक्ष-२ उड्डान पुला जवळ, शिवाजी नगर, परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072805
सिरसाळा शाखा : बड़े निवास, जुने बस स्टँड रोड, सिरसाळा, ता. परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072184
अंबाजोगाई शाखा: प्रशांत नगर, बस स्टॅण्डच्या मागे, अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड. 9130072183
विस्तारीत कक्ष अंबाजोगाई-१ : मोहन कॉम्प्लेक्स, मेनरोड, अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड. 9130072802
विस्तारीत कक्ष अंबाजोगाई-२ घाटनांदुर, मेनरोड, अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड. 9130072808
बीड शाखा : जिजामाता चौक, मोंढा रोड, ता. जि. बीड. 9130072221
सोनपेठ शाखा : स्नेह सदन, विटा रोड, सोनपेठ, ता. सोनपेठ, जि. परभणी. 9130072186
गंगाखेड शाखा : डॉक्टर लेन, एच.डी.एफ.सी. बँकेसमोर, गंगाखेड, जि. परभणी. 9130072807
विभागीय कार्यालय व महेश नगर शाखा : अपना बजार २०४ २०६, आकाशवाणी जवळ, औरंगाबाद 9130072176 / 77
राजा बजार शाखा : बालाजी मंदिर समोर, राजा बजार, शहागंज, मोंढा, ता. जि. औरंगाबाद. 9130072022
माळीवाडा विस्तारीत कक्ष : नाशिक रोड, माळीवाडा, ता. जि. औरंगाबाद. 9130072803
अंबड शाखा: जालना-बीड रोड, महावीर चौक, आंबड, जि. जालना. 9130072804
जालना शाखा : मेन बस स्टँड रोड, जालना, ता. जि. जालना. 9130072806
जालना विस्तारीत कक्ष-१ : जांगडे कॉम्प्लेक्स, जालना-अंबड रोड, ता. जि. जालना. 9130072226
नांदेड विस्तारीत कक्ष : पहिला मजला, गुरूकृपा मार्केट, महावीर चौक, ता. जि. नांदेड. 9130003070
उदगीर विस्तारीत कक्ष : पहिला मजला, लासूणे कॉम्प्लेक्स, देगलूर रोड, उदगीर, जि. लातूर. 9130072190
टोकवाडी विस्तारीत कक्ष: परळी-बीड रोड, टोकवाडी, ता. परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072224
दिंद्रुड विस्तारीत कक्ष : शेप कॉम्प्लेक्स, परळी-बीड रोड, दिंद्रुड, ता. माजलगाव, जि. बीड. 9130002070
लातूर विस्तारीत कक्ष : कव्हा रोड, शिवनेरी गेट जवळ, लातूर 9130002070
औराद विस्तारीत कक्ष : मेन रोड, कृष्णा ऑईल मिल समोर, औराद शहाजनी, ता. निलंगा, जि. लातूर. 9130003044
बीड विस्तारीत कक्ष : मोंढा मार्केट, संतोषी माता मंदिर समोर, बीड, ता.जि. बीड. 9130072221
उमरगा शाखा : शिवाजी महाविद्यालय जवळ, बालाजी नगर, मेन रोड, उमरगा, जि. उस्मानाबाद.
परभणी शाखा: कापसे भवन, कच्छी बजार, सरदार वल्लभभाई पटेल रोड, परभणी.
अहमदनगर शाखा: शॉप नं. ३ व ४ बेसमेंट, मोरया कॉर्नर, मोरया मंगल कार्यालय, पाईपलाईन रोड, अहमदनगर.
केज शाखा : वकीलवाडी, कानडी रोड, केज, ता. केज. जि. बीड.
माजलगाव शाखा : गाळा क्र.८, सिद्धेश्वर कॉम्प्लेक्स, गढी कॉर्नर, गढी रोड, माजलगाव, ता. माजलगाव, जि. बीड.
नियोजित शाखा : धर्माबाद उमरखेड नाशिक पंढरपूर रेणापूर पुणे अकोला
कॉर्पोरेट ऑफिस : २०५,२०६, बिल्डिंग नं. २, पहिला मजला, अपना बाजार, जालना रोड, औरंगाबाद . मो. 9130072176, 9130072177

# धनुष्यबाण चोरला तरी प्रभूराम माझ्यासोबत

## उद्धव ठाकरे : रामटेकहून पायी आलेल्या कार्यकर्त्यांचे कौतुक

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : एका दृष्टीने पाहिले, तर असे कुणीतरी कुणासाठीतरी इतके किलोमीटर पायपीट करत येणे आत्ताच्या काळात अवघड नाही, अशक्य आहे. तुम्हाला मातोश्रीत यावे आणि माझ्यासोबत उभे राहावे असे वाटणे हा मी रामाचा आशीर्वाद मानतो. रामटेकमधून निघून तुम्ही बरोबर राम नवमीला इथे पोहोचलात. काही जणांनी धनुष्यबाण चोरला असला, तरी प्रभूराम माझ्यासोबत आहेत, असा टोला उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना नाव न घेता लगावला.**

गुरुवारी रामनवमीच्या निमित्ताने देशभरात वेगवेगळ्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर मुंबईत 'मातोश्री' या उद्धव ठाकरेंच्या निवासस्थानीही रामनवमीनिमित्त कार्यकर्ते जमले होते. निमित्त होते थेट रामटेकहून मुंबईपर्यंत पायी चालत आलेल्या काही शिवसेना कार्यकर्त्यांच्या कौतुक करता उद्धव ठाकरेंनी या कार्यकर्त्यांना भेटल्यानंतर उपस्थितांशी संवाद साधला.

उद्धव ठाकरे पुढे म्हणाले की, ज्या हिंमतीने रामटेक ते इथपर्यंत पायी येणे ही हिंमत आहे. ही जिद्द तुम्ही जिथून आला असाल तिथपर्यंत पोहोचवा. तुम्ही सगळे सोबत आहात हीच माझी ताकद आहे. धनुष्यबाण जरी कागदावरचा नेला असला, तरी हे बाण माझ्या भात्यात आहेत. हे फक्त बाण नाहीत, तर हे ब्रह्मास्त्र आहेत. हे सगळे ब्रह्मास्त्र माझ्याबरोबर आहेत, असे उद्धव ठाकरे यावेळी म्हणाले.

लोकशाही वाचवणे हे केवळ माझ्या एकट्याचे काम नाही किंवा माझ्या एकट्यासाठी नाही. आपल्या सगळ्यांसाठी, आपल्या पुढच्या पिढ्यांसाठी आहे. रामसेतू बांधताना वानरसेना तर होतीच, पण खारही होती. तेव्हा तर खारीनंही तिचा वाटा उचलला. आपण सगळे एकत्र आलो, तर लंकादहन करू शकणार नाही का? असा प्रश्न उद्धव ठाकरेंनी उपस्थित कार्यकर्त्यांना केला. तेव्हा प्रभू रामचंद्राचे नाव घेऊन दगड टाकला, तरी तो तरंगायचा. आत्ता राजकारणात तेच झालंय. प्रभू रामाचे नाव घेऊन



दगड तरंगतात. तेव्हा दगडांवर पाय ठेवून लंकेत जाण्यासाठी ते तरंगत होते. आता दगडच तरंगतात आणि दगडच राज्य करतात. मग खऱ्या रामभक्तांनी करायचे काय? ते रामभक्तांचे काम मला तुमच्याकडून अपेक्षित आहे, असेही उद्धव ठाकरेंनी यावेळी नमूद केले.

# किराडपुरा राडा प्रकरण; पाचशे जणांवर गुन्हा

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** संभाजीनगर पोलिस आयुक्तांनी दिलेल्या माहितीनुसार, किराडपुऱ्यातील हाणामारी, जाळपोळ, दगडफेक प्रकरणी ४०० ते ५०० अज्ञातांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. शहरात सध्या तणावपूर्ण शांतता आहे. राम नवमीनिमित्त विविध मंदिरांमध्ये आयोजित केलेले कार्यक्रम शांततेत पार पडले. किराडपुऱ्यातील राम मंदिरात काहीही अनुचित प्रकार घडलेला नसून जन्मोत्सवही साजरा करण्यात आला, अशी माहिती पोलिस उपायुक्त शीलवंत नांदेडकर यांनी दिली. शहरातील किराडपुरा भागातील राम मंदिर परिसरात काल रात्री दोन गटात प्रचंड राडा झाला. गाडीला धक्का लागल्याच्या कारणावरून दोन गटात आधी शाब्दिक चकमक सुरु झाली. या वादाचे रुपांतर भांडण, हाणामारीत झाले. त्यानंतर दोन गटाकडून तुफान दगडफेक करण्यात आली. तणावावर नियंत्रण मिळवण्यासाठी आलेल्या पोलिसांवरही हल्ला झाला. पोलिसांच्या जवळपास १० ते १२ गाड्या जाळण्यात आल्या.

दोन ते तीन तास हा प्रकार सुरु होता. संभाजीनगरचे खासदार इम्तियाज जलील, भाजप आमदार अतुल सावे हे रात्री घटनास्थळी पोहोचले. त्यांनीदेखील जमावाला शांत करण्याचे तसेच नागरिकांना शांततेचे आवाहन केले. सदर प्रकाराबाबत गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

किराडपुऱ्यात ज्या भागात हा राडा झाला. तो परिसर शहरातील जिन्सी पोलीस ठाण्याच्या हद्दीत येतो. या प्रकरणात 400 ते 500 जणांवर दंगल घडवल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आलाय. दंगल घडवणे, खुनाचा प्रयत्न करणे, शासकीय अधिकाऱ्यांना मारहाण करणे, शासकीय मालमत्तेचे नुकसान करणे या कलमाखाली हे गुन्हे दाखल झाले आहेत.

**मुख्यमंत्र्यांनी दिले कठोर कारवाईचे निर्देश :** किराडपुरा भागात घडलेल्या घटनेची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गंभीर दाखल घेतली असून तणावासाठी जबाबदार लोकांवर तातडीने कठोर कारवाई करण्याचे निर्देश त्यांनी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना दिले आहेत. नागरिकांनी देखील शांतता ठेवावी असे आवाहन त्यांनी केले आहे. मुख्यमंत्र्यांनी काल रात्री या घटनेनंतर पोलीस आणि प्रशासनाशी चर्चा केली व परिस्थितीचा आढावा घेतला. पोलीस आणि रहिवाशांवर दगडफेक करणे, जाळपोळ करणे आणि तणाव निर्माण करणे मुळीच सहन केले जाणार नाही. कुणीही कायदा आणि सुव्यवस्था आपल्या हातात घेऊ नये. अशा सर्वांवर पोलिसांनी लक्ष ठेवावे आणि त्यांच्यावर कठोर कारवाई करावी असे निर्देश पोलिसांना दिल्याचेही मुख्यमंत्री म्हणाले.

# चंद्रपूर-बल्लारपुरातील शोभायात्रेत लोककलावंताची मांदियाळी

## देशभरातील १९४६ लोककलावंतांनी केले सादरीकरण

आधुनिक केसरी न्यूज

भगवान राऊत


चंद्रपूर : श्रीरामनवमीच्या पुर्वसंध्येला अयोध्येतील राममंदिरासाठी बल्लारपूर-चंद्रपूर येथील सर्वोत्कृष्ट दर्जाचे सागवान लाकुड काष्ठपुजनानंतर भव्य शोभायात्रेद्वारे रवाना करण्यात आले. या शोभायात्रेत महाराष्ट्रासह देशभरातील १९४६ लोककलावंतांनी बल्लारपूर-चंद्रपूरात आपल्या कलांचे सादरीकरण करत लक्ष वेधले. राज्याचे वने, सांस्कृतिक कार्यमंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते काष्ठशिल्पाचे सपत्नीक पूजन करण्यात आले. यावेळी रामायण या मालिकेतील राम, सीता, लक्ष्मण त्यांच्या भूमिका साकारणारे प्रसिद्ध अभिनेते अरुण गोविंद, दीपिका चिखलीया, सुनील लहरी तसेच उत्तर प्रदेशातील अनेक



मान्यवर उपस्थित होते. दुपारी तीन वाजतापासून बल्लारपूर येथून शोभायात्रेला सुरुवात झाली. चंद्रपुरात माता महाकाली मंदिरापासून शहरात भव्य शोभायात्रा देशभरातील लोककलावंताच्या कला सादरीकरणासह निघाली. सायंकाळी सुप्रसिद्ध गायक कैलाश खेर यांचा भक्ती संगीताचा कार्यक्रम चंद्रपूरकरांच्या उपस्थितीत



पार पडला. या शोभायात्रेत ठाणे जिल्ह्यातील मोखाडा येथील राजन वैद्य व सहकाऱ्यांचे आदिवासी तारपा नृत्य, गौरी नृत्य, फुगडी नृत्य, अहमदनगर जिल्ह्यातील अकोले येथील आदिवासी कांबड नृत्य, सांगली जिल्ह्यातील गज नृत्य, कोकणातील पालखी नृत्य, सोंगी मुखवटे, चंद्रपुरातील भुसारी नृत्य, ढेमसा नृत्य, ढोलपथक, नंदुरबार येथील होळी नृत्य, दक्षिणेतील बाहुल्या, धनगरी तोफ, बंजारा लेंगी नृत्य, पाणीहारी पथक, गुंडूम वाजा, बधाई नृत्य, गणगौर, वारकरी दिंडी, लेझीम पथक, कलशधारी महिला, बंगाल येथील महिलांचे शंखपथक, आदिवासी तूर नृत्य, भजनी मंडळी, गिड्डी नृत्य, सोंगी मुखवटे, मालवण व सिंधुदुर्ग येथील सिद्धेश मालवणकर यांचे हत्ती, मोर, अस्वल, वाघ, पोपट, कोंबडा या प्राण्यांच्या हुबेहूब प्रतिकृती शोभायात्रेत विशेष आकर्षण ठरले. शोभा यात्रेच्या अग्रभागी महाराष्ट्रातील साडेतीन शक्तीपीठाचा देखावा, अयोध्येतील राम मंदिराची प्रतिकृती, विठ्ठल मूर्ती, हातात गुढ्या घेऊन सहभागी झालेल्या महिला, भगवे ध्वज हाती घेतलेले वारकरी, वारी नृत्य, महिलांची भजनी मंडळे, रावण वधाचा देखावा, कास्यरथ, हनुमान असे अनेक पथके देशभरातून सहभागी झाली होती. या शोभायात्रेत झाडीपट्टीतील कलावंतांनीही दानपट्टा, तलवार, लाठीकाठी, मल्लखांब, चक्रीपाश, मर्दानी खेळ, पारंपारिक युद्धकला अशा साहसी कला सादर करत लक्ष वेधले. मराठी चित्रपट सृष्टीतील प्रसिद्ध चित्रपट नृत्यदिग्दर्शक सुभाष नकाशे यांच्या मार्गदर्शनात शोभायात्रेचे संचालन करण्यात आले.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932




आधुनिक केसरी

य गंमत झाली बघा. नुकतेच घरात थोडे दुरुस्तीचे काम केलं. बाथरूमजवळ एक नवीन बेसिन बसवलं. आणि एक नवीन आरसा बसवला. त्याच्याजवळ उजव्या बाजूला एक प्लास्टिकचं कंटेनर होतं. त्यात कंगवे, टूथब्रश इ ठेवलेलं होत. नवीन आरसा थोडा मोठा असल्यामुळे ते प्लास्टिकचं कंटेनर जे उजव्या हाताला होतं, ते डाव्या बाजूला लावावं लागलं. ते लावून चारपाच दिवस झाले तरी ब्रश किंवा पेस्ट घ्यायला माझा हात जो नेहमी उजवीकडे जायचा, तो अजूनही बऱ्याचवेळा जातो. मग लक्षात येतं की अरे आपण त्याची जागा बदलली आहे. एकदा आपल्या हाताला किंवा अवयवाला जी सवय लागली ती अशी आपला पाठलाग करते. काही लोकांना कुलूप लावल्यानंतर पुन्हा ओढून पाहायची सवय असते. अशा काही गोष्टी नकळत केवळ सवयीमुळे घडत असतात. जी वयासह येते ती स-वय. एकदा लागलेली सवय पुढे आयुष्यभर टिकून राहते. सकाळी उठल्याबरोबर काही लोकांना चहा हवा असतो. त्याशिवाय त्यांचा दिवस सुरु होत नाही. अर्थात माझाही त्यात समावेश आहे. पण मग एखादे दिवशी सकाळी लवकर चहा नाही मिळाला की लागलीच बेचैनी येते. काहींचे डोके दुखते. सवयीचा हा परिणाम आहे. सवयी चांगल्या असतात आणि वाईटही. काही काही सवयी तर प्रतिक्षिप्त क्रिया घडल्याप्रमाणे घडतात. त्यात मेंदूचा फारसा सहभाग नसतो. उदा गाडी चालवताना कोणी अचानक समोर आलं तर ब्रेक दाबणं, सवयीनं गिअर बदलणे इ गोष्टी सहज घडतात. त्यासाठी विचार करावा लागत नाही. हा सवयीचा परिणाम असतो. काही लोकांना ज्या वाईट सवयी लागलेल्या असतात, त्या प्रतिक्षिप्त क्रियांप्रमाणे घडतात. समोरच्या माणसाला एकदम तोडून बोलणे, क्षुल्लक गोष्टीवरून चिडून काहीतरी लागेल असे बोलणे. या गोष्टी घडून गेल्यावर करणाऱ्याला त्यांचा पश्चाताप होतो. पण नंतर काही उपयोग नसतो. त्याचा जो काही परिणाम व्हायचा असेल तो होऊन गेलेला असतो. म्हणून तर लहान मुलांना लहानपणापासून चांगल्या सवयी लागाव्या यासाठीआपण प्रयत्नशील असतो. कारण एकदा लागलेली सवय पुढे जन्मभर टिकते. सवय हे तसे पाहिले तर माणसाला मिळालेलं वरदान आहे. कारण सवयीमुळेच आपण चांगली कौशल्ये शिकतो, नवीन गोष्टी शिकतो, आपले संरक्षण करायला शिकतो. चांगल्या सवयीमुळे माणूस घडतो. ' असाध्य ते साध्य करिता सायास, कारण अभ्यास तुका म्हणे.



# आनंदी पहाट

## आठवणी आपापसातील जिव्हाळा जपतात

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपल्यापैकी प्रत्येकांत काही उणिवा असतातच, उणिवा नसणारी व्यक्ती सापडणे सद्यःस्थितीत विरळाच; त्याचा शोधही न घेतलेला बरा. कारण व्यक्ती तितक्या प्रकृती, त्यांत काहींमध्ये संकृतीचे तर काहींमध्ये काही विकृतीचे दर्शन आपल्याला घडत असते. अर्थातच कोणत्याही विकृतीची स्वीकृती आपण सहसा करत नाही, पण आपल्या संकृतीला आणि आपापल्या प्रकृतीला साजेशी एखादी कलाकृती ठरेल अशी कृती करण्याची आपल्याला जाणीव काहीवेळा का होत नाही? कालच्या काही उणिवा कुरवाळत बसण्यात आपण धन्यता मानतो, सतत उणिवांचीच, समस्यांचीच, दःखाचीच सर्वत्र आणि सातत्याने चर्चा करत राहतो. आजच्या आपल्या आणि इतरांच्या जाणीवा जपण्याच्या दृष्टीकोनातून आपण खरंच गांभीर्यानं विचार करतोच असे नाही. आपल्या बुद्धिवादी जीवाला कालच्या उणिवा दूर करून, आजच्या जाणीवा जपून त्यांना नेणीवेपर्यंत नेण्याची आज खरी गरज आहे. ह्यासाठी आपल्या प्रत्येकाचेच विचार, वर्तन आणि व्यवहार हे स्वतः पुरते मर्यादित न ठेवता इतरांच्या उणिवा दूर करून,

त्यांच्या जाणीवा जपून त्यांना नेणीवेपर्यंत नेण्याच्या कामी यायला हवेत. आपण आणि इतरांनी परिधान केलेले कपडे, वापरलेल्या वस्तू, आपापसांत झालेला संवाद, घडलेल्या गप्पागोष्टी, त्या दरम्यानच्या शारीरिक हालचाली, आपापले हावभाव अशा अनेकविध गोष्टी आठवायला सुरुवात होते. ह्या आठवणींचे आपल्याशी एक जिव्हाळ्याचे नातेच निर्माण झालेले असते. आपले जगण्यापलीकडचे जीवन आनंदायी करण्याचे काम अनेकदा ह्या अशा आठवणीच करत असतात. काही आठवणी तर रात्री झोपेत आपल्याला पडलेल्या स्वप्नांच्या असतात. काहीवेळा तर ह्या आठवणीमध्ये आपण इतके रममाण झालेले असतो, कि वास्तवातले आणि वर्तमानातले कित्येक क्षण आपले फक्त शरीर प्रचीती घेत असते, पण मनाला त्याची अनुभूतीच मिळत नसते.



आधुनिक केसरी

**सोन्याचा पिंपळ | सळाळू दे ||**
आचार विचार | बीज जीवनाचे ||
फुलणे वृक्षाचे | कर्मसिद्धी ||१||
योग क्षेम | सारे मानी समाधान ||
ऐसे लाभे मन | संचिताने ||२||
पाप-पुण्य खेळ | नसे दुजा काही ||
संगतीचे ठायी | पट सारा ||३||
मना लागो छंद | सात्विकांचा देवा ||
नको हेवा दावा | क्षणभर ||४||
ज्ञानाचे शिंपण | व्हावी सर्वकाळ ||
सोन्याचा पिंपळ | सळाळू दे ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# निरूपण


आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

दातारौ पितरौ वन्दे
युवामहं सदा सदा।
स्वीकार्यश्च प्रणामो मे
प्रार्थयेऽहं युवां हृदः ॥6॥
हे दातृत्वयुक्त मातापित्यांनो, तुम्हा दोघांना मी नेहमी नेहमी वंदन करतो. तुम्ही दोघांनी माझा प्रणाम स्वीकारावा, अशी मी तुम्हा

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !




स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्‌गुरू सदाफल देवजी महाराज

धनमद बलमद जातिमद, विद्यामद सब त्याग। तब मानव जीवन वने, सन्त चरण अनुराग ।।२२।।(स्वर्वेद तृतीय मण्डल नवम अध्याय) ०३/०९/२२

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद:
धन, बल, वर्ण आणि विद्या यांच्या सर्व अभिमानांचा त्याग करून जेव्हा संत-चरणात प्रेम उत्पन्न होते, तेंव्हाच मानव जीवन निर्माण होते.

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

# काव्य-चरितावली



पुष्प २०वे

आधुनिक केसरी



अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

गुरू चिन्मयानंदांचा-अनुग्रह होता
"श्रीतुकारामचैतन्य हो जाहले,
सकलांशी परमहंस वृत्तीने वागू लागले
भक्तजन त्यांना "तुकामाय म्हणू लागले ।।

सुखाच्या मृगजळापाठी धावत्या जना
तुकामाई म्हणे-प्रपंचाचा मोह सर्वांना
वाईट वाटे पाहुनी लोकांची मन दैना
तुकामाई उपदेशाचे बोल बोले सर्वांना ।।

शिष्य व्हावे तुकामाईचे ईच्छा बहुतांची
परी कठीण परीक्षा घेत ते भक्तांची
कसोटीच मोठी असे अनुग्रह मिळण्याची
म्हणून मोठी संख्या नाही शिष्यांची ।।

थोर योगी पुरुष असे हा, कीर्ती पसरली
दूरदूरच्या भक्तांची रांग रोज लागली
तुकामाईच्या परीक्षेत जे उतरले कुणी
ब्रह्मनिष्ठ या सत्पुरुषाची कृपा लाभली ।।

म्हणे- कवी अरुणदास, लेखणीस माझ्या
श्रीगुरुमहिमा लेखनाची गोडी लागली ।।

# 'निजसुखगुणविश्रामा'

आधुनिक केसरी



चैत्र शुध्द नवमी हा दिवस श्रीराम जयंती म्हणून साजरी केली जाते. सर्व प्रथम आपण रामायण व रामाशी संबंधीत गोष्टींचा विचार केला तर असं दिसून येते की राम ही एक विचार शक्ती आहे. घराघरांत वाचले जाणारे रामायण हे आपल्या दैनंदिन जीवनात जगण्याची उर्जा देणारे आहे रामकथेची माहिती घेऊन आपल्या जगण्यात सुख आणता येते व आपली अध्यात्मिक प्रगती साधून विश्वसंकल्पनेत समरस होता येते. रामकथे मागची महासंल्पना या निमित्ताने पाहुयात. अयोध्या नगरीत अयोध्यापतीराजा दशरथ व माता कौसल्याच्या पोटी श्रीराम जन्म घेतला. राम हे जीवन जगण्यातलं तत्व आहे,अंश आहे व सार ही आहे. कसे ते पहा. दशरथ--दाही दिशेला नजर राहु द्या.आयुष्य जगत असताना हे शरीररूपी देह म्हणजे रथ आहे. त्याला वेळीच लगाम घालायला शिका. तुमच्या देहरूपी रथाची भरारी सत्कर्माची पेरणीं करत करा. दशरथ म्हणजे दहा हात कायम एकत्र येऊ द्या एकीचं बळ कायम राहील यासाठी सतत एकोप्याने रहा. कौसल्या-जीवन जगत असताना कुठलीही सल मनात येऊ देऊ नका.मोकळ्या मनाने निर्मळ मनाने सतत सत्कर्माची कास धरा. अयोध्या-अयोध्यापतीराजा व राणी कौसल्या यांची नगरी,याठिकाणी माणसामध्ये भांडणाचा,कुरघोडीचा,लवलेशही नाही. अशी अ-युध्द( अयोध्या )नगरी आहे. राजा व प्रजा एकमेकांवर जीवापाड प्रेम करतात, कुणाला कशाचीही काही कमी नाही. सर्व जण ऐश्वर्यसंपन्न, शुध्दसाधना करत,सदाचारी, सद्विचार असलेली जनता ज्या नगरीत रहाते ती नगरी म्हणजे अयोध्या होय. मित्रांनो मला सांगा असं सुखाचं आयुष्य जगण्याची कल्पनाच किती सुखावह आहे. आणि अशी नगरी ही तर आपल्या आदर्श संस्कृती चा अनमोल ठेवा आहे. मी तर म्हणेन अख्या जगाने या विषयावर चिंतन मनन केले पाहिजे. व सर्वांनी असं जगलं पाहिजे. प्रत्येक नावा मागे एक विचार आहे. श्रीराम-- ही एक प्रगल्भ विचारांची कल्पना आहे. जन्मलेल्या बाळा पासून ते शेवटच्या क्षणापर्यंत मुखातला राम अंतकरणात सतत तेवत ठेवला पाहिजे. आपल्या तील जाणीव,नेणीव,सत्यधर्म, सत्यवचन शेवट पर्यंत केले तरचं जीवनात राम आहे हे कधीही विसरू नये. `सीता- शुध्दशील,शुध्दचारीत्र्य,तपस्या, पत्नीधर्म निभावणारी,केवळ स्वतः चाच नाही तर संपूर्ण कुळाचा विचार करणारी आदर्श भारतीय नारी. मला सांगायला अतिशय खेद होत आहे की आज स्वातंत्र्याच्या नावाखाली मुली,बायकांनी जो स्वैराचार चालवला आहे त्यांनी तर सीतामातेला आपल्या अंतकरणात कायम ठेवले पाहिजे. सीताराम ही महासंकल्पना आहे. 'जेथे राघव तेथे सीता' वाल्याकोळी-रामायणातील ग्रंथकार-- कुटुंबातील पालन पोषणासाठी खुन,दरोडे घालणारा पण राम नामाने पवित्र झालेला आपल्या दुष्कर्माला कुणीही वाटेकरी नाही. हे ध्यानात ठेवायला लावणारा वाल्याची गोष्ट आजच्या भोगवादी युगात डोळ्यात झणझणीत अंजन घावणारी आहे. कुणासाठी काही साठवून ठेऊ नका. विध्वंसापेक्षा स्रुजनशीलता महत्वाची आहे.शबरी,जटायु,सुग्रीव,हनुमान परीट शुर्पणखा,दशानन रावणहे सर्व जण आपापल्या परीने समाजातील नितिमुल्ये जपण्यासाठी अभ्यास साचा विषय आहेत. जो जो जो रे श्रीरामा निजसुखगुणविश्रामा बाळा जो जो रे।। चारी मुक्तिचा विचार चरणीं तुझ्या पाहुदे थोर।। दास गातसे पाळणा।। प्रत्येक जीवा स्वस्वरूपाचा व्हावा बोध।।
श्रीराम जय राम जय जय राम।।
जय जय रघुवीर समर्थ

**सौ.ऊज्वला धर्माधिकारी**

# तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

ढीवर या मत्स्या चारा घाली जैसा । भीतरील फांसा कळों नेदी ॥२॥
खाटिक हा स्नेहवादें पशु पाळी । कापावया नळी तया साठीं ॥३॥

# आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
शुक्रवार, ३१ मार्च २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari


## पाच वर्षीय बालकाला वाघाने उचलून नेले

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** सावली तालुक्यातील वैनगंगा नदीच्या काठावरील



बोरमाळा या गावातून हर्षल संजय कारमेगे या पाच वर्षीय बालकाला वाघ घराच्या अंगणातून उचलून जंगलात घेऊन गेल्याने खळबळ उडाली आहे. या घटनेची माहिती मिळताच वन खाते तथा पोलिस विभागाचे अधिकारी गावात दाखल झाले आहे.हर्षल हा घराच्या अंगणात बुधवारी रात्री आठ वाजताच्या सुमारास असताना तिथे वाघ आला व हर्षलला जंगलात घेऊन गेला. येथे चार ते पाच वर्ष वयोगटातील बालकाला वाघाने उचलून नेल्याची घटना आधीही घडली आहे. संजय कारमेगे यांचा मुलगा वाघाने घरासमोरून उचलून नेल्याचे सांगण्यात येत आहे. आईसमोरच वाघाने हल्ला करून उचलून नेल्याने आईने आरडाओरड केली. परंतू, वाघ बाळाला घेऊन पसार झाला. पोलीस अधिकारी तसेच वन खात्याचे अधिकारी, कर्मचारी लगेच गावात दाखल झाले. वन अधिकारी व गावातील लोक यांच्या साह्याने बाळाचा शोध घेणे सुरु आहे. रात्री उशिरापर्यंत बाळाचा शोध लागला नव्हता, असे गावातील सामाजिक कार्यकर्ते तथा काँग्रेसचे ग्राम पंचायत सदस्य विजय कोरवार यांनी सांगितले.

# पत्रकारांचे प्रश्न सोडविण्यासाठी समन्वयाने काम करणार

## प्रमोद डोईफोडे आणि वसंत मुंडे यांचा निर्णय

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्यातील पत्रकारांचे प्रश्न सोडविण्यासाठी समन्वयाने व्यापक काम करणार असल्याचा निर्णय मंत्रालय, विधिमंडळ वार्ताहर संघाचे नवे अध्यक्ष प्रमोद डोईफोडे आणि महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या संयुक्त भेटीत मुंबई येथे झाला.

महाराष्ट्र मंत्रालय, विधिमंडळ वार्ताहर संघाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल प्रमोद डोईफोडे यांचा महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्याहस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य बाबा श्रीहरी देशमाने, विजय सांगळे यांची उपस्थिती होती. वार्ताहर




संघाच्या मंत्रालयातील कार्यालयात प्रमोद डोईफोडे आणि वसंत मुंडे यांच्यात वार्तालाप झाला. दरम्यान, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे संपूर्ण महाराष्ट्रात मोठे संघटन आहे, अनेक संघटनांचे वेगवेगळे मतप्रवाह असू शकतात, मात्र पत्रकारांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी एकजूट करण्याची गरज असल्याचे प्रमोद डोईफोडे यांनी सांगितले.

मंत्रालय, विधिमंडळ वार्ताहर संघाची महत्वपूर्ण भूमिका : मुंडे

राज्यातील पत्रकारांचे, प्रामुख्याने ग्रामीण पत्रकारांचे प्रश्न सोडविण्यासाठी मंत्रालय, विधिमंडळ वार्ताहर संघ आणि महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाने समन्वयाने काम करण्याची गरज आहे, यावर मुंडे आणि डोईफोडे यांच्यात एकमत झाले. मंत्रालय विधिमंडळ वार्ताहर संघ हा सरकार आणि प्रशासकीय पातळीवर महत्वपूर्ण संघ आहे. ग्रामीण पत्रकारांचे प्रश्न शासन दरबारी धसास लावण्यासाठी संयुक्तपणे प्रयत्न करू, प्रसंगी व्यापक लढा उभा, असे महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी सांगितले.






## पाण्यात पडल्याने दोन जणांचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** जिल्ह्यात वेगवेगळ्या ठिकाणी पाण्यात पडल्याने दोन जणांचा मृत्यू झाला. या प्रकरणी पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे.पंकज देशमुख (२०, रा. जोपुळ रोड) हा गतीमंद युवक घरातून निघून गेला होता. त्यानंतर तो चिंचखेड चौफुली येथे पाटाच्या पाण्यात पडलेला मिळून आला. त्याला पिंपळगाव प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले असता डॉक्टरांनी तपासून मयत घोषित केले. या प्रकरणी पिंपळगाव पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू म्हणून नोंद करण्यात आली आहे.

दुसरी घटना कळवण तालुक्यात घडली. योगेश मार्कंड हा पाझर तलाव येथे मेंढ्याना पाणी पाजण्यासाठी गेला असता पाण्याचा अंदाज न आल्याने पाय घसरल्याने तलावात पडला. बुडून त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी कळवण पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे.

## पत्रकाराला शिविगाळ; सरपंच पती देवचंद पवार, अमोल बहाळे यांच्यावर गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** आधुनिक केसरी वृत्तपत्राचे बुलढाणा जिल्हा प्रतीनीधी सागर झनके यांना अमोल बहाळे व सरपंच पती देवचंद पवार यांनी २९ मार्च रोजी त्यांच्या राहत्या घरी येवून शिविगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली.

पत्रकार सागर झनके हे जिल्ह्यातील एक अभ्यासू पत्रकार असून ते आपल्या लिखाणातून सातत्याने विविध विषयावर लिखाण करत जणतेच्या प्रश्नांना वाचा फोडत असतात.दादुलगाव ग्रामपंचायत अंतर्गत येत असलेल्या गौलखेड येथे डॉं. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला लागून असलेल्या सरकारी जागेवर गावातील राजेश रणीत या व्यक्तीने अवैधपणे शौचालयाचे बांधकाम केले होते. त्या संदर्भात पत्रकार सागर झनके यांनी त्याची तक्रार करत ग्रामपंचायत प्रशासनाला कार्यवाही करण्यास भाग पाडले,तसेच ग्रामपंचायत अंतर्गत दलित वस्तीमध्ये होत असलेल्या विकास कामाच्या भ्रष्टाचारा बाबत सातत्याने प्रसारमाध्यमामध्ये बातम्या दिल्या आहेत.याच सुड भावणेतून सरपंच पती देवचद रामभाऊ पवार आणि उपसरपंच असलेल्या जिजाबाई बहाळे या महिलीचा मुलगा अमोल बहाळे हे दोघेही २९ मार्च रोजी सागर झनके यांच्या घरी दारू पिवून येवून तुझ्या घराचे समोर पडलेले बांधकामाचे मटेरियल तात्काळ उचल नाही तर आम्ही आमच्या जेसीपी ने रोडच्या बाजूला फेकून देवू,अशा शब्दांत धक्का बुक्की करत जीवे मारण्याची धमकी दिली. वास्तविक हे दोघेही ग्रामपंचायतीचे पदाधिकारी, सदस्य नाहीत तरिही त्यांनी दादागीरी करत पत्रकार सागर झनके यांना शिविगाळ करत लोटपाट केली. याबाबतची तक्रार सागर झनके यांनी पोलीस स्टेशनला २९ मार्च रोजी दिली असून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पत्रकारांना धमकावण्याच्या, शिविगाळ करण्याच्या,वाहणाने उडून देवून जीवे मारण्याच्या घटणा घडत आहेत. त्यामुळे पत्रकार बांधवामध्ये अस्वस्थता दिसून येत आहे. अशा या घातक प्रवृत्तीच्या लोकांवर वेळीच कार्यवाही केली नाही तर लोकशाहीचा चवथा आधारस्तंभ असलेल्या पत्रकांना जीवाने मुकावे लागणार ऐवढ मात्र खरे.

# रहिवासी प्रमाणपत्रासाठी 100 ऐवजी 20 रुपये घेणार

## दैनिक आधुनिक केसरी दणका : फुलंब्री नगरपंचायतीचा निर्णय

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**फुलंब्री :** मागील दोन ते तीन दिवसांपूर्वी दिनांक 27 मार्च रोजी दैनिक आधुनिक केसरी मध्ये रहिवासी प्रमाणपत्र देण्याच्या नावाखाली गोरगरीब नागरिकांकडून अर्थीक लुट, फुलंब्री नगरपंचायतीचा भोंगळ कारभार अशा मथळ्याखाली वृत्त प्रकाशित करण्यात आली होती.तसेच शहरातील सामाजिक कार्यकर्ते सय्यद जुल्फिकार यांनी औरंगाबाद विभागीय आयुक्तांकडे तक्रार केली होती.या तक्रारीची दखल घेत फुलंब्री नगरपंचायतीच्या मुख्याधिकारी तथा प्रशासक ऋषिकेश भालेराव यांना तंबी देत प्रति रहिवासी प्रमाणपत्राचे 100 रुपये न घेण्याचा सांगितले. या वर प्रशासकांनी 20 रुपये घेणार आहे असे आश्वासन पत्रात म्हटले आहे.

सदर या प्रकरणी सामाजिक कार्यकर्ते सय्यद जुल्फिकार यांनी आवाज उठवला आणि औरंगाबाद विभागीय आयुक्तांकडे तक्रार केली. लगेच प्रशासन खडबडून जागे झाले. फुलंब्री नगरपंचायतीच्या कारभारा विरोधात शहरातील नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे . नगरपंचायतीच्या मनमानी कारभाराने सर्व सामान्य नागरिक वैतागले होते.आता नरमाईची भुमिका घेत 100 रुपये मधून 80 रुपये कमी केले व 20 रुपये प्रति रहिवासी प्रमाणपत्राचे फीस घेण्यात येईल असे म्हटले आहे. मागील दोन ते तीन दिवसांपूर्वी दिनांक 22 मार्च रोजी दैनिक आधुनिक केसरी मध्ये रहिवासी प्रमाणपत्र देण्याच्या नावाखाली गोरगरीब नागरिकांकडून अर्थीक लुट, फुलंब्री नगरपंचायतीचा भोंगळ कारभार अशा मथळ्याखाली वृत्त प्रकाशित करण्यात आली होती.तसेच शहरातील सामाजिक कार्यकर्ते सय्यद जुल्फिकार यांनी औरंगाबाद विभागीय आयुक्तांकडे तक्रार केली होती.या तक्रारीची दखल घेत फुलंब्री नगरपंचायतीच्या मुख्याधिकारी तथा प्रशासक ऋषिकेश भालेराव यांना तंबी देत प्रति रहिवासी प्रमाणपत्राचे 100 रुपये न घेण्याचा सांगितले. यावर प्रशासकांनी 20 रुपये घेणार आहे, असे आश्वासन पत्रात म्हटले आहे. सदर या प्रकरणी सामाजिक कार्यकर्ते सय्यद जुल्फिकार यांनी आवाज उठवला आणि औरंगाबाद विभागीय आयुक्तांकडे तक्रार केली. लगेच प्रशासन खडबडून जागे झाले. फुलंब्री नगरपंचायतीच्या कारभारा विरोधात शहरातील नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे . नगरपंचायतीच्या मनमानी कारभाराने सर्व सामान्य नागरिक वैतागले होते. आता नरमाईची भुमिका घेत 100 रुपये मधून 80 रुपये कमी केले व 20 रुपये प्रति रहिवासी प्रमाणपत्राचे फीस घेण्यात येईल असे म्हटले आहे.



# 'आप'कडून आश्वासनांची खैरात

आधुनिक केसरी

आम आदमी पक्षाने (AAP) कर्नाटक विधानसभा निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला आहे. १० मे रोजी होणाऱ्या निवडणुकीसाठी 'आप'ने बुधवारी (दि. २९ मार्च) राज्यसभेचे खासदार संजय सिंह यांच्या उपस्थितीत आपला जाहीरनामा प्रसिद्ध केला. अरविंद केजरीवाल यांच्या पक्षाने आपल्या जाहीरनाम्यात विविध क्षेत्रांसाठी ६१ आश्वासने दिली आहेत. जर आप सत्तेत आली तर या आश्वासनांची पूर्तता करण्यात येईल, असे वचनही दिले आहे. दिल्लीमध्ये 'आप'ने जी आश्वासने दिली होती. त्याचप्रकारची आश्वासने कर्नाटकातही देण्यात आली आहेत. प्रत्येक नागरिकाला ३०० युनिटपर्यंत मोफत वीज, खासगी शाळांपेक्षा सरकारी शाळांचा दर्जा सुधारण्यावर भर, विद्यार्थ्यांसाठी शहरातील बसप्रवास मोफत, मोहल्ला क्लिनिक, प्रत्येक वर्षी दोन लाख नव्या रोजगारांची निर्मिती, रोजगार मिळेपर्यंत प्रत्येक बेरोजगाराला रुपये तीन हजारांचा भत्ता आणि महिलांना सरकारी नोकऱ्यांत ३३ टक्के आरक्षण... अशी काही प्रमुख आश्वासने 'आप'ने दिली आहेत. जाहीरनाम्याचे प्रकाशन करत असताना खासदार संजय सिंह म्हणाले, "कर्नाटकातील भ्रष्टाचाराचे उच्चाटन करण्याचे आश्वासन 'आप'ने दिले आहे. ते पूर्ण करण्यासाठी आम्ही प्रयत्न करू. ४० टक्के कट कमिशन घेणारे राज्य म्हणून कर्नाटकची ओळख झाली आहे, ही ओळख पुसण्याचे काम आम्ही करू. तसेच लोकायुक्तला सक्षम करण्यासाठी आर्थिक मदत दिली जाईल आणि भ्रष्टाचाराविरोधातील चळवळ आणखी बळकट केली जाईल. शिक्षणाची हमी, या नावाखाली 'आप'ने शैक्षणिक क्षेत्रात काय करणार? याची जंत्री दिली आहे. उच्चशिक्षण घेण्यासाठी बँकांकडून कर्ज उपलब्ध करून देण्याचे आश्वासन, खासगी शाळांतील शैक्षणिक शुल्काचे नियमन करण्यासाठी समितीची स्थापना आणि कंत्राटी शिक्षकांना कायमस्वरूपी नोकरी अशी काही आश्वासने शिक्षण क्षेत्रासाठी देण्यात आली आहेत. वैद्यकीय क्षेत्रासाठी दिल्लीच्या धर्तीवर १० पॉलिक्लिनिकची स्थापना आणि प्रत्येक विधानसभा मतदारसंघात एक सुपर स्पेशालिटी रुग्णालय उभारणार असल्याचेही या वेळी सांगण्यात आले. महाराष्ट्राचे अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थसंकल्प मांडत असताना महिलांना एसटी महामंडळाच्या बसभाड्यात ५० टक्के सवलतीची घोषणा केली होती. या निर्णयाला ग्रामीण भागात महिलांनी चांगला प्रतिसाद दिला. याच धर्तीवर 'आप'ने महिलांना शहरामधील बसप्रवास मोफत करण्याचे आश्वासन दिले आहे. तसेच द्रारिद्र्यरेषेखालील १८ वर्षे पूर्ण केलेल्या महिलांना 'सबलीकरण भत्ता' देण्यात येईल. यासोबतच तीन कृषी कायदे रद्द करण्यात येतील आणि शेतकऱ्यांना स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशीनुसार किमान आधारभूत किंमत देण्याची तरतूद केली जाईल, असेही आश्वासन दिले. तसेच छोट्या शेतकऱ्यांना एका वेळेसची कर्जमाफी देण्यात येईल.

# शिंदे-फडणवीस सरकारचे एक पाऊल पुढे



राम कुलकर्णी,
भाजपा राज्य प्रवक्ता
संपर्क 9422742577

आधुनिक केसरी

**सत्ताबदलानंतर नव्याने मायबाप म्हणून ज्यांनी राज्याचा कारभार हाती घेतला त्या शिंदे-फडणवीस सरकारने शेतकऱ्यांच्या उन्नतीला प्राधान्य देताना अनेक महत्वपुर्ण निर्णय अवघ्या आठ महिन्यात घेतले. केंद्र सरकारच्या धर्तीवर नमो शेतकरी हा सन्मान निधी ज्यात राज्य सरकारने 6000 रूपयांची केलेली वाढ अधिक आता प्रति शेतकरी वर्षाकाठी 12000 रूपये मिळणार. केवळ 1 रूपायात पिक विमा ज्याचा भुर्दंड शेतकऱ्यांवर बसणार नाही. हा स्तुत्य निर्णय खरंच बळीराजाचा सन्मान वाढवणारा म्हणावा लागेल.**

मागेल त्याला शेततळे तर शेती पुरक यंत्रसामुग्री, फळबाग ठिबक सिंचन यांच्यापासुन ते पेरणी यंत्रापर्यंत एवढेच नव्हे तर गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार यातुन सिंचनासाठी केलेली मोठी तरतुद. निर्णय गतिमान आहेत. बोलाचा कढी, बोलाचा भात अजिबात नाही. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी नुकत्याच जाहिर केलेल्या अर्थसंकल्पात या कल्याणकरी गोष्टींची तरतुद सुद्धा मोठ्या प्रमाणावर केली. राज्याचे अर्थसंकल्प अनेकदा पूर्वी जाहीर झाले. पण असा आगळावेगळा अर्थसंकल्प ज्यात शेतकऱ्यांच्या प्रश्नाचा स्वतंत्र विचार आणि त्यांच्या जीवनात परिवर्तन घडवणारे निर्णय असे निर्णय स्वातंत्र्यानंतर प्रथमच यंदाच्या अर्थसंकल्पात पहायला मिळाले. अर्थव्यवस्थेचा कणा शेतकरी म्हटल्या जातो. पण शेतकऱ्यांचं उत्पादन वाढवण्यासाठी नेहमीच माय-बाप उदासीन राहिले. पण अवघ्या आठ महिन्यापूर्वी सत्तेवर आलेल्या शिंदे-फडणवीस सरकारने शेतकऱ्यांच्या कल्याणाचा जणुकाही विडा उचलला. मागच्या आठ-नऊ वर्षापासून केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील शेतकऱ्यांना न्याय मिळवुन देण्याची खऱ्या अर्थाने भुमिका घेतली. शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव मोठ्या प्रमाणावर वाढवले. उत्पादनाला बाजारपेठ निर्माण करून देताना प्रतिष्ठाही वाढली पाहिजे. मुक्त अर्थव्यवस्था खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांच्या फायद्याची. वास्तविक पहाता मध्यंतरी केंद्र सरकारने शेतकऱ्यांच्यासाठी केलेले कायदे ज्याला काँग्रेसवाल्यांनी राजकिय वळण देवुन हाणुन पाडले. खरं म्हणजे काँग्रेस दुष्ट म्हणावी लागेल. कारण तीन कायदे शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक परिवर्तन करणारे ठरले. विरोधकांनी जरी आंदोलन किंवा इतर शेतकरी संघटना हाताशी धरून यश मिळू दिले नाही. पण स्वतः पंतप्रधान नरेंद्र मोदींनी अनेक अशा गोष्टी शेतकऱ्यांसाठी करून ठेवल्या. या देशात पुर्वी कुठल्याही सरकारने केल्या नव्हत्या. खरं म्हणजे शेतकरी सन्मान निधी मागच्या काही वर्षापासून देशातील करोडो शेतकऱ्यांना ज्यातून जणू काही सरकारी पगार असल्यासारखे खात्यावर पैसे जमा होतात. प्रतिवर्षी 6000 रूपये केंद्र सरकार देतात. याचा फायदा गोरगरीब शेतकऱ्यांना निश्चित होताना दिसतो. ऊसाच्या एफआरपीत केलेली वाढ देखील अत्यंत महत्वाची म्हणावी लागेल. केंद्र सरकार जर शेतकऱ्यांना एक पाऊल पुढे येत असेल तर मग राज्यात देखील शिंदे-फडणवीस सरकार शेतकऱ्यांच्यासाठी काम करतं हे खऱ्या अर्थाने उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी दाखवून दिलं. नुकत्याच जाहीर झालेल्या अर्थसंकल्पात राज्यातील शेतकऱ्यांना मोकळा हात सोडून केलेली मदत ज्याचं स्वागत सर्वत्र होत आहे. केंद्र सरकारच्या धर्तीवर नमो शेतकरी महासन्मान निधी ही योजना ज्या अंतर्गत केंद्राप्रमाणे 6000 रूपये प्रतिवर्षी शेतकऱ्यांना मिळणार म्हणजेच केंद्राचे सहा अधिक राज्याचे सहा एकूण बारा हजार रूपये प्रतिवर्षाला राज्यातील शेतकऱ्यांना देण्याची व्यवस्था यातून होऊन बसली. खरं म्हणजे हा अतिशय क्रांतीकारक आणि दुरगामी कल्याणकारी निर्णय म्हणावा लागेल. एकूण बारा हजार रूपये ही मदत ज्याचं वर्णन करणं देखील शब्द कमी पडू शकतात. ज्या शेतकऱ्यांना एक एक रूपायाची किंमत असते त्यांच्यासाठी मासिक हजार रूपये महिना याचाच अर्थ  पगारी नोकरदारासारखा मदतीचा हात पुढे येवु शकतो. राज्यातील शेतकऱ्यांना देखील सरसकट कर्जमाफी देण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सरकार असतानाच घेतला होता. अर्थसंकल्पात अशा अनेक गोष्टी ज्या खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांसाठी वरदान म्हणाव्या लागतील. अनेकदा पिक विमा काढण्यासाठी बिचाऱ्या गरीब शेतकऱ्यांजवळ दमडा नसतो त्यावेळी केवळ पिकविमा न भरल्याने नुकसान भरपाई मिळाली नाही. अर्थात भांडवलदार शेतकऱ्यांनी फायदा उचललेला असतो तो भाग वेगळा. पण गरिब शेतकऱ्यांचा विचार करून एक रूपायांत पिक विमा कुठलाही भुर्दंड शेतकऱ्यांना नाही. 3312 कोटी रूपये राज्य सरकार भरणार.



हा निर्णय खऱ्या अर्थाने बळीराजासाठी अत्यंत फायद्याचा म्हणावा लागेल ज्याचं स्वागत शेतकऱ्यांमधून खूप होताना दिसतेय. शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक क्रांती वाढवायची असेल तर सिंचन वाढवल्याशिवाय पर्याय नाही हा दृष्टीकोन मुळात भाजपाचा वर्षानुवर्षापासून राहिला. अगदी जिथे भाजप विचाराची सरकार तिथे सिंचनाला खुप महत्व दिल्याचे लक्षात येतं. म्हणून या सरकारने मागेल त्याला शेततळं कारण फळबाग, ठिबक सिंचन, शेड नेट, हरितगृह आदींचा समावेश विविध योजनेअंतर्गत करून अनुदानाच्या स्वरूपात शेतकरी स्वयंसिद्ध होण्यासाठी या सरकारने केलेला दिसतो. राज्यात जलयुक्त शिवाराची कल्पना 2014 साली महायुतीचं सरकार आल्यानंतरच हाती घेतली होती. प्रभावी योजना राबवल्यामुळे राज्याचे सिंचन क्षेत्र मोठ्या प्रमाणावर वाढलं, पाण्याची पातळी वाढली पण मध्यंतरी शिवसेनेने धोका दिल्यानंतर अपघाताने महाविकास आघाडी सरकार सत्तेवर आलं आणि ठाकरे सरकारने जलयुक्त योजना गुंडाळुन टाकली होती पण शिंदे-फडणवीस सरकारने पाच हजार गावी जलयुक्त शिवार योजना प्रभावीपणे राबवण्याचा निर्णय घेतला. मग गाळमुक्त धरण असेल किंवा अन्य सिंचनाचे प्रयोग असतील. उदा.मराठवाडा विभागात ठाकरे सरकारने स्थगिती दिलेल्या वॉटरग्रीड योजनेलाही पुनर्जिवीत करण्याचे काम या सरकारने केलं. केंद्र सरकार समभाग योजने अंतर्गत 20,000 कोटी रूपायांची तरतुद अर्थसंकल्पात करून ठेवली. येथे पाहिजे जातीचे, येरा गबाळ्याचे काम नोहे, समाजातील अठरापगड जातीधर्माच्या लोकांना न्याय मिळवुन देणारा अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर ज्यात शेतकऱ्यांच्या कल्याणाचा आणि आर्थिक उन्नतीचा स्वतंत्र विचार या सरकारने केलेला दिसतो. विरोधक बोलायचं म्हणुन बोलत असले तरी ज्यांच्यासाठी योजना हाती घेतली त्या शेतकरी वर्गातून मात्र गतिमान निर्णयाचं जोरदार स्वागत होताना दिसतं. माय-बाप सरकार आणि त्यांच्या अंगी असलेली दृष्टी ही जर कल्याणकारी असेल तर सर्वच घटकांना न्याय मिळु शकतो हे दर्शविणारा अर्थसंकल्प निश्चित म्हणावा लागेल. असो. शेतकऱ्यांचा विचार सरकार करू लागले केवळ बोलणे नव्हे तर प्रत्यक्ष आर्थिक तरतुद करून जाहिर झालेल्या योजना शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक क्रांती घडवणाऱ्या निश्चित म्हणाव्या लागतील.दुसरी बाजु पाहिली तर शेतकरी निसर्गाच्या नेहमीच कचाट्यात सापडलेला असतो. त्यांच्या सरकारमार्फत देण्यात येणाऱ्या अनुदान निधीमध्ये देखील मोठ्या प्रमाणावर वाढ ही खऱ्या अर्थाने जमेची बाजु. स्व. गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजना अगोदर केवळ एक लाख रूपये ते देखील वर्षानुवर्षे मिळायचे नाहीत. या सरकारने त्याच्यात दुप्पट वाढ केली आणि प्रकरणे निकाली काढुन तात्काळ मदत देण्याचे आदेश काढले आहेत. विरोधकांनी कितीही राजकारण केलं पण कोण आपल्यासाठी खऱ्या अर्थाने पुढे येतं आणि गतिमान निर्णय घेतं याचि देहि, याचि डोळा राज्यातील जनता जनार्धन पहाते हे तितकेच खरं.

# गिरीश बापट: जमिनीवर पाय असलेला नेता



सिद्धेश्वर पवार
संपर्क क्र. 9422880080

आधुनिक केसरी

**मृत्यूशी सुरू असलेली झुंज थांबत अखेर गिरीश बापट यांनी आज शेवटचा श्वास घेतला. गिरीश बापट यांच्याशी निगडित माझ्या ज्या आठवणी आहेत त्या कायमस्वरूपी माझ्या स्मरणात राहणाऱ्या आहेत. पत्रकारितेच्या क्षेत्रात काम करत असतांना दीड दोन वर्षांसाठी मला पत्रकारिता सोडावी लागली आणि एका वेगळ्याच क्षेत्रात मला जावं लागलं. स्व सुभाषराव झनक रिसोड विधानसभा मतदारसंघातून विजयी झाले आणि अशोकराव चव्हाण यांच्या मंत्रिमंडळात त्यांचा समावेश झाला.**

मित्रमंडळी आणि मी शिर्डी ला दर्शनाला जात असतांना झनक साहेबांच्या मंत्रिमंडळातील समावेशाची बातमी मला समजली आणि त्यांचे अभिनंदन करण्यासाठी मी त्यांना कॉल केला. अभिनंदनाचा स्वीकार करत असतांना झनक साहेब मला म्हणाले, सिद्धेश्वरजी, तुम्ही कुठे आहात..? म्हटलं साहेब मी शिर्डी जात आहे.त्यावर ते म्हणाले, शिर्डी नंतर जाता येईल, तुम्ही सरळ मुंबईला निघून या व सकाळी मला भेटा. त्याच वेळी साहेबांचे काका स्व दिनकरराव झनक हे देखील साहेबांच्या शपथविधी ला हजेरी लावण्यासाठी मुंबई निघाले होते, त्यांनी देखील मला कॉल केला व तुला मुंबईला यायचे आहे असे सांगितले आणि मी त्यांच्या सोबत सकाळी सकाळी मुंबई ला पोहचलो,आणि साहेबांनी मला त्यांचा पी.ए. होण्यासबंधाने कागदपत्रे त्यांचे मुंबई येथील पी.ए.  दिलीप नानोटे यांच्याकडे जमा करायची सांगितली. कुठेही मनात नसतांना, आणि या आधी साहेब माजी आमदार असतांना विनम्रपणे त्यांना माझी जी अडचण आहे ती सांगून नकार दिलेला असताना झनक साहेबांनी जो विश्वास दाखवला त्या विश्वासाचा आदर करत मी राज्याच्या महिला व बालविकास मंत्र्यांचा अशा अनाहूत पद्धतीने पी ए झालो आणि एका वेगळ्याच क्षेत्रात सामील झालो. झनक साहेबांचा पी ए म्हणून काम करत असतांना त्यांच्या यशवंतराव चव्हाण सभागृहाजवळील सारंग-५ या बंगल्यावरून मी मॅजेस्टिक ला आ श्री.संजय रायमूलकर यांच्या आमदार निवासात खा श्री.प्रतापराव जाधव यांना भेटायला गेलो.खा जाधव यांच्या शारंगधर ऊस कारखान्या संदर्भात लॅब च्या काही रिपोर्ट आणि त्या कारखान्यातून तयार झालेली गुळ पावडर केमिकल विरहित असल्याचे रिपोर्ट दाखविण्यासंदर्भात त्या अनुषंगाने त्यांनी मला बोलावले होते. त्याच दरम्यान आ श्री.संजय रायमूलकर यांच्या रूम समोरच आ गिरीश बापट यांची रूम होती. प्रतापराव जाधव दिसल्याने आ गिरीश बापट, खा. प्रतापराव जाधव, आ श्री संजय रायमूलकर, मी, आणि माझ्या समवेत असलेले राजेश खिल्लारी आम्ही सर्वजण बोलत होतो.दोन्ही रूमच्यामध्ये जो रस्ता होता,त्या मध्ये मोठ्या वजनाचा जुना फॅन सुरू होता.
गप्पा सुरु असताना खाली फॅक्स वरून ते सगळे रिपोर्ट खा जाधव साहेबांचे तत्कालीन स्वीय सहाय्यक स्व.सुभाष शिंगणे ते सर्व रिपोर्ट घेऊन आल्याने आम्ही आत रूम मध्ये गेलो आणि बापट त्यांच्या रूम मध्ये गेले.आम्ही सर्वजण आत येत नाही तोच तो प्रचंड वजन असलेला जुना पंखा खाली कोसळला. जिथे गिरीश बापट उभे होते तिथेच तो पडला. जर ते रिपोर्ट केवळ अर्धा मिनिटं जरी उशिरा आले असते किंवा तरीही गप्पा सुरु असत्या तर त्याच ठिकाणी तो फॅन श्री गिरीश बापट यांच्या डोक्यावर पडून त्यांच्या जीवाला धोका निर्माण झाला असता आणि आम्ही इतर जण देखील जखमी झालो असतो. ह्या प्रसंगामुळे गिरीश बापट चांगलेच स्मरणात राहले. ज्या ज्या वेळी त्यांना भेटायचो याबाबत विषय निघताच ते म्हणायचे,आपली काळजी त्या परमेश्वराला आहे. लोकांची सेवा मनोभावे करत रहायचे, आपण लोकांची काळजी घेतली की तो वरचा आपली काळजी घेतोच हा विश्वास ते व्यक्त करायचे. ह्या प्रसंगाच्या पलीकडे जाऊन ते हृदयात कायमचे घट्ट राहले ते त्यानी संबंध पी ए साठी केलेल्या कामामुळे. मी पी ए असताना मला पगार केवळ 8 हजार होता. आज तो 25 हजारच्या वर जाऊन पोहचला आहे व त्याचे श्रेय स्व बापटांना जाते. प्रत्येक आमदारासाठी महत्वाचा असणारा त्यांचा पी ए हा किती महत्वाचा आहे,त्यांच्या राजकारणात त्याचे किती योगदान आहे याची जाणीव ठेवून त्यांनी विधानभवनात सबंध पी.ए.साठी प्रशिक्षण शिबीर ठेवले होते. दोन दिवसीय शिबीर विधानभवनात असल्याने तिथे बसण्याचा आनंद वेगळाच होता. जिथे बसण्यासाठी अनेकजण कोट्यवधी रुपये खर्च करतात,आयुष्य खर्ची घालतात त्या ठिकाणी बसण्याचे भाग्य आम्हा सर्व स्वीय सहायकांना मिळाले होते. माजीमंत्री खा शरद पवार यांचे पी ए राहलेले आणि त्यावेळी विधानसभा अध्यक्ष असलेले श्री दिलीप वळसे पाटील यांचे भाषण,राज्यसभा सदस्य वंदना चव्हाण यांचे पाण्या संदर्भातील आणि ग्लोबल वार्मिंग मुळे येणाऱ्या काही वर्षांत मुंबई सह जगभरातील अनेक शहरे पाण्याखाली कसे जातील याबाबतीतील व्याख्यान अशी वेगवेगळी मेजवानी त्या प्रशिक्षण शिबिरात आम्हाला मिळाली होती. आमदारांच्या मागण्या त्वरित मंजूर होतात,पी.ए च्या देखील काही गरजा आहेत.त्याला चांगला पगार / मानधन मिळाले तर चुकीच्या मार्गाने त्याला पैसे घेण्याची गरज पडणार नाही, अशा अनेक बाबींवर त्यांनी प्रकाश टाकला, परिणामी स्वीय सहायकांच्या मानधनात सरकारने  वाढ केली.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं  ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739



# ऋषी महाराज आदर्श विद्यालयात सायकल वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजूर :** मुलींना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी राज्य शासनाच्या मानव विकास कार्यक्रमांतर्गत इयत्ता आठवी ते बारावीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींना शाळेत जाण्यासाठी सायकल दिल्या जातात. त्याचाच एक भाग म्हणून बावणे पांगरी येथील ऋषी महाराज आदर्श विद्यालयात शाळकरी मुलींना सत्तावन्न सायकलीचे वाटप करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष सुभाष बोडखे, उपाध्यक्ष सारंगधर बोडखे, व्यापारी संघाचे उपाध्यक्ष सुखानंद पारवे, सचिव रामेश्वर कढवणे, कोषाध्यक्ष भिमाशंकर दारुवले, सामाजिक कार्यकर्ते प्रा.बाळासाहेब बोराडे, भगवान शिंदे, सुनील बोर्डे आदी मान्यवरांच्या हस्ते मुलींना सायकल वाटप करण्यात आल्या. त्याचप्रमाणे नवनिर्वाचित व्यापारी महासंघाच्या पदाधिकाऱ्यांचा सत्कारही करण्यात आला. ऋषी महाराज आदर्श विद्यालयात येणाऱ्या विद्यार्थिनी ह्या परिसरातील खेड्यावरून शिक्षणासाठी येतात.शाळेत येण्यासाठी वेळवर वाहन उपलब्ध होत नसल्या कारणाने मुलींना शाळेत जायला अडचणी येत होत्या.काही मुलींच्या शिक्षणात खंड पडत होता. मानव विकास योजनेच्या माध्यमातून विद्यालयाने शाळेपासून अंतरावर राहणाऱ्या ग्रामीण भागातील गरजू मुलींना सत्तावन्न सायकली वाटप करण्यात आल्या. सायकली मिळाल्या बद्दल विद्यार्थी आणि पालकांनी समाधान व्यक्त केले. यावेळी कार्यक्रमास प्राचार्य कृष्णा जाधव, उपप्राचार्य संदीप सोनुने, प्रदीप पाटोळे, लक्ष्मी सोनवणे, शिल्पा जाधव, गुलाब राठोड, अमोल पाटोळे यासह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डोळ्याचे पारणे फेडणारी होणार वाटूरची रामनवमी

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** गुढीपाडव्यापासून वाटूर येथे श्रीराम नवमीचे भव्य असे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये अखंड हरिनाम सप्ताह, वेदशास्त्र संपन्न सुनील महाराज यांच्या सुश्राव्यवाणीतून नऊ दिवस श्रीराम कथेचे आयोजन करण्यात आले आहे.दररोज सायंकाळी सहा वाजता हरिपाठ, विविध नामस्मरणाचे कार्यक्रम,या सोबतच रामनवमीच्या निमित्ताने महिला,बालगोपाल गावातील ग्रामस्थांसाठी स्पर्धाचे देखील आयोजना सोबतच रात्री नऊ ते अकरा पर्यंत हरी किर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. गावातील सर्व तरुण मंडळी आणि ग्रामस्थांनी यावर्षी कोरोनाच्या काळानंतर प्रथमच रामनवमी येत असल्याने मोठ्या उत्साहात आणि भव्य स्वरुपात आयोजन केले आहे. वाटुर येथे पुरातन प्रल्हाद महाराज साखरखेर्डा यांच्या हस्ते श्रीराम मंदिराची स्थापना झालेली आहे राम-लक्ष्मण सीता यांची सुंदर मूर्ति असलेले मंदिर वाटुर येथे स्थापन झालेले आहे. दररोज या ठिकाणी हरिभक्त परायण गणेश महाराज रामदासी  यांच्याकडून नित्य उपासना आणि मंदिर परिसरात श्रीराम नाम जप करण्यात येतो. सोबतच भारतातील प्रसिद्ध असलेल्या स्थळांपैकी शेषनारायण भगवान शयन अवस्थेमध्ये असलेल्या मूर्तीचे देखील या ठिकाणी जागृत मंदिर आहे. पंचक्रोशीतील भाविक भक्त या ठिकाणी नेहमीच दर्शनासाठी वर्दळ करत असतात. श्री रामनवमीच्या निमित्ताने वाटुर येथे नऊ दिवस भक्तिभावाने श्री रामनाम जप,आणि नितयपासना सध्या चालू आहे. भावीक भक्तांची रेघ या ठिकाणी दर्शनासाठी लागत असते. यावर्षीचे आकर्षण म्हणजे रामनवमी च्या दिवशी पंधरा फूट श्रीराममूर्ती ची भव्य शोभा यात्रा ग्रामस्थ मंडळी कडून काढण्यात येणार आहे. वाटुर येथील श्रीराम मंदिरापासून पासून ते छत्रपती शिवाजी महाराज चौक पर्यंत या शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. तरी पंचक्रोशीतील भावी भक्तांनी  रामनवमीच्या दिवशी शोभायात्रेमध्ये सहभागी होण्याचे आवाहन. समस्त वाटूर ग्रामस्थांनी तरुण रामभक्त मंडळीकडून करण्यात आले आहे.

## श्रीयशच्या विद्यार्थ्यांची ओएमआर बागला व औरंगाबाद ऑटो अँसिलरीमध्ये निवड

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** श्रीयश प्रतिष्ठानच्या सेंट्रल ट्रैनिंग अँड प्लेसमेंट विभागातर्फे अभियांत्रिकी आणि तंत्रविद्यानिकेतनच्या तांत्रिकी विभागाच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी परिसर मुलाखतीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी चितेगाव येथील ओएएमआर बागला ऑटोमोटिव्ह सिस्टिम्स इंडिया लिमिटेड व औरंगाबाद ऑटो अँसिलरी प्रायव्हेट लिमिटेड तर्फे विद्यार्थ्यांच्या परिसर मुलाखती घेण्यात आल्या होत्या. एकूण विद्यार्थ्यांपैकी बावीस विद्यार्थ्यांची निवड दोन्ही कंपन्या मिळून झाली. कंपनीच्या वतीने सतीश कुबेर व दिप्तेश दिक्षीत ह्यांनी मुलाखती घेतल्या. कंपनीमार्फत मुलांना त्वरित नियुक्तीपत्र देखील देण्यात आले.  ह्या मुलाखतीचे आयोजन करण्यासाठी सेंट्रल ट्रैनिंग अँड प्लेसमेंट विभागाचे प्रमुख प्रा. अनिल पालवे, यांत्रिकी विभागाचे प्लेसमेंट समन्वयक प्रा. ब्रिजभूषण शुक्ला व प्रा. संभाजी साठे ह्यांनी यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. संस्थेचे अध्यक्ष मा. बसवराज मंगरुळे, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कर्नल जॉय डॅनियल, अभियांत्रिकीचे प्राचार्य डॉ. बी. एम. पाटील, तंत्रविद्यानिकेतन महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. संदीप खंडागळे, ॲडमिनिस्ट्रेटिव्ह मॅनेजर अनिल तायडे ह्यांनी एकाच वेळी मोठ्या संख्येने निवड झाल्याबद्दल विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



## नऊ वर्षांच्या बालकाने ठेवला पहिला रोजा

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** इस्लाम धर्मात पवित्र मानल्या



जाणाऱ्या रमजान महिन्यात ' रोजा'ला विशेष महत्त्व आहे. या महिन्यात लहान मुलांपासून ते वृद्धापर्यंत सर्वच पहाटे सहेरी करून रोजा (उपवास) ठेवतात. फुलंब्री तालुक्यातील बाबरा गावातील नऊ वर्षीय अबुजर सलीम पठाण या चिमुरड्याने अवघ्या वयाच्या नव्या वर्षी जीवनातील पहिला रोजा दि. २५ मार्च शनिवार रोजी पूर्ण केला. विशेष म्हणजे या वर्षी रमजान महिना मार्च महिन्यात कडक उन्हात आला आहे. या तळपत्या उन्हात या चिमुरड्याने मुलाने रोजा ठेवून एक आदर्श निर्माण केला आहे. रखरखत्या उन्हात पवित्र रमजान बद्दल असणारी प्रबल ईच्छा शक्तीच्या जोरावर दिवशभरात अन्नाचा एकही कण न खाता व पाण्याच्या घोट न पिता जवळपास दिवसाचे चौदा तास उपाशी राहून चिमुकल्या अबुजर पठाण ने पहाटे चार वाजता उठून आपल्या कुटुंबियांसोबत सहेरी केली होती.

सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास आपल्या कुटुंबियांसोबत त्याने रोजा इफ्तारी केली. कमी वयात अबुजर याने रोजा पूर्ण केल्याबद्दल सर्वत्र कौत केले जात आहे.

महाराष्ट्र Business Katta












# सरकार सुप्रीम कोर्टाचा सन्मान करेल का ?



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**सध्या राज्यातच नव्हे तर देशामध्ये राजकीय वातावरण एवढे मलीन आणि दूषित केले आहे की जनतेचा राजकीय नेते व राजकारण यावरचा विश्वास उडाला आहे. राजकारणाला दिशा व उद्देश राहिलेला नाही. लोकविकास राष्ट्रप्रेम तर्क विज्ञान आणि सामाजिक न्याय या गोष्टी कार्यातून व चर्चेतून बाद झालेले आहेत. देशप्रेमाची व्याख्याच बदलून टाकलेली आहे. जो पाखंड अंधविश्वास यांना प्रोत्साहन देईल समर्थन करेल आणि सरकारच्या आवाजात आवाज मिसळवेल तेच खरे राष्ट्रप्रेम. सरकारच्या ध्येय धोरणावरती कोणीही प्रश्न विचारले वा पाखंड, अंधविश्वास याला विरोध करून विज्ञानवाद सांगण्याचा प्रयत्न केला तर तो देशद्रोही.**

जनतेने महागाई, बेरोजगारी, शिक्षण, आरोग्य यावर न बोलता धर्मावर बोलून धर्माच्या रक्षणासाठी सज्ज व्हावे व सरकार धर्माचे रक्षण करण्याकरिता सर्वतोपरी प्रयत्न करेल अशाच पद्धतीचे वक्तव्य, कृत्य सरकारकडून होत आहे. सत्तेचा उपभोग घेण्यासाठी लोकांना धर्मांध करून त्यांच्यापासून रोजगार, शिक्षण, आरोग्य सुविधा हीराहून घेऊन त्यांना महागाई मध्ये होरपळवले जात आहे. आणि धर्माच्या नावाखाली अंध झालेल्या जनतेला शिक्षण, रोजगार, आरोग्य सुविधा देण्याची जबाबदारी सरकारची असून सरकार ते देण्यासाठी निष्क्रिय ठरत आहे. आणि आपण या गोष्टी मिळवण्यासाठी सरकारला प्रश्न विचारायला पाहिजेत याची जाणीवच राहिलेली नाही. महाराष्ट्र हे देशातील एक पुढारलेले राजकीय आणि सामाजिक दोन्ही दृष्टीने सुसंस्कृत आणि वैचारिक राष्ट्र म्हणून मानले जाते. परंतु याच महाराष्ट्रामध्ये राजकारणामध्ये वैचारिकता राहिली तर नाहीच, परंतु राजकीय नेत्यांनी वातावरण दूषित करून जनतेच्या डोक्यातील वैचारिकता सुद्धा बदलून त्यांना अंधभक्त बनवण्याचे काम केले आहे. आणि लोक अंध भक्त होऊन, धर्माच्या नावाखाली बुद्धीला न पटणाऱ्या गोष्टीचा स्वीकार करून आपले अज्ञान व मानसिक गुलामगिरी सिद्ध करत आहे. लोकशाहीमध्ये नागरिक हा जागृत तर्कवादी व प्रश्न विचारणारा पाहिजे परंतु या ठिकाणी नागरिक शिकलेले आहेत परंतु जागृत नाहीत. आणि जागृत नसल्यामुळे आणि सरकारने धर्माचे वलय निर्माण केल्यामुळे आणि सरकार धर्माचे रक्षण करणारे आहे असे सरकारने भासवल्यामुळे सरकार विरोधात प्रश्न विचारण्याची आपली सत्य बाजु मांडण्याची मानसिक कुवत त्यांच्यामध्ये राहिली नाही. आणि त्यामुळे राज्यातील व देशातील सामाजिक वातावरण मलीन होऊन राजकीय लोकांच्या सत्तेसाठी उपयुक्त असे वातावरण निर्माण होत आहे. परंतु हे वातावरण फक्त नेत्यांचे व धर्मांचे भक्त यांच्या पुरते मर्यादित आहे. आज देशातील बराच मोठा वर्ग जागृत, सुशिक्षित, तर्कवादी, विज्ञानवादी, समतावादी, मानवतावादी व देशहीत जोपासणारा आहे. परंतु अशा लोकांना राजकीय नेते प्रस्थापित प्रसारमाध्यमे समोर येऊ देत नाहीत. किंवा त्यांना प्रसिद्धी देत नाहीत. प्रसारमाध्यमांनी तर सर्व मर्यादा ओलांडून सत्ताधाऱ्यांची एवढी लाचारी स्वीकारलेली आहे की गेल्या काही वर्षांमध्ये प्रसारमाध्यमांनी फक्त सरकारचा समाजात भेद निर्माण करणारा अजेंडा, धार्मिक तेड निर्माण करणारे विचार पेरण्याचे काम व त्यावर चर्चा घडवून आणून सरकार प्रती आपली प्रामाणिकता सिद्ध केलेली आहे. सरकारच्या व राजकारणाच्या या दूषित वातावरणामुळे जागृत सुशिक्षित व लोकशाहीवादी नागरिक हताश झालेला आहे. कारण आज राजकारणाची परिस्थिती बघितली तर सर्वजण ध्येय, उद्देश, जनकल्याण, संविधान, लोकशाही ,शिक्षण ,रोजगार , महागाई ,सामाजिक न्याय या गोष्टी बाजूला सारून स्वार्थासाठी राजकारण करून सत्ता मिळवण्याचा व सत्तेच्या मार्फत आर्थिक भरभराट करण्याचा प्रयत्न करत आहे. म्हणून एकेकाळी सत्ताधारी पक्षांना कठोर शब्दात विरोध करणारे, लोकशाहीला मानणारे, संविधानाला मानणारे लोक आज जर संविधान विरोधी आणि लोकशाही विरोधी पक्षांच्या गटात सामील होत असतील तर नक्कीच त्या ठिकाणी सामाजिक न्याय , सामाजिक प्रश्न यांना कुठेही धारा नसेल. आणि यामध्ये फक्त राजकीय नेत्यांचे आर्थिक हित साध्य होईल ही गोष्ट आज नागरिकांना कळून चुकली आहे. राजकारणातील विरोधी पक्ष स्वार्थापायी लालसेपायी, जनकल्याणाच्या बाबी नष्ट झालेल्या आहेत. आणि ही बाब लोकशाहीसाठी घातक आहे. देशामध्ये लोकांनी रोजगार, शिक्षण, आरोग्य, सुविधा न मागता महागाईवर न बोलता इतर बाबींवर लक्ष केंद्रित करण्याकरिता लोकांच्या भावनेशी व धर्माशी जुळलेले वक्तव्य करून समाजामध्ये फक्त आणि फक्त धार्मिक वातावरण दुषीत करून त्यावर चर्चा घडवून आणण्यासाठी सरकार सर्वतोपरी प्रयत्न करत असते. सरकारने सांगितलेली चुकीची, खोटी, काल्पनिक, कोणतीही गोष्ट जशीच्या तशी मान्य केली तरच तो राष्ट्रभक्त अथवा तो देशद्रोही. अशीच व्याख्या झालेली आहे. म्हणून मागच्या काही महिन्यातील आपण वादग्रस्त वक्तव्य बघितले तर सत्ताधारी पक्षातील नेत्यांनी वादग्रस्त विधाने करून महापुरुषांचा अवमान केला. व बरेचसे दिवस त्यावरती चर्चेत खर्च झालेत. ज्या लोकांनी महापुरुषांचा अवमान केला त्या सत्ताधारी लोकांनी माफी तर मागितली नाही परंतु पक्षातील काही वयाने लहान पण पक्षातील



ज्येष्ठ लोकांनी त्यांची बाजू सावरून त्यांना सुरक्षित केले. ज्यावेळेस छत्रपती शिवाजी, महाराज छत्रपती संभाजी, महाराज संत तुकाराम महाराज, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, कर्मवीर, शिक्षण महर्षी भाऊराव पाटील, यांचे आव्हान झाले त्यावेळेस सत्तेतील पक्षाने अवमान करणाऱ्यांचे समर्थन करून लोकांच्या जनभावना लक्षात न घेता वातावरण दूषित केले. आणि सध्या राहुल गांधीच्या एका वक्तव्यावरती सरकार रस्त्यावर उतरून पुन्हा एकदा धार्मिक वातावरण दूषित करण्याचा प्रयत्न करत आहे. जे लोक छत्रपती शिवरायांपासून तर कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यापर्यंत जेव्हा चुकीचे वक्तव्य करून त्यांचा वैचारिक अवमान करतात, तेव्हा गप्प बसलेले लोक सावरकरांच्याच वेळी समोर का? येतात असा प्रश्न जनतेने जर विचारला तर आपोआप धार्मिक वातावरण दूषित होऊन समाजामध्ये दुफळी निर्माण होते. आणि सरकारला हेच अपेक्षित आहे. मुळात राहुल गांधी यांनी सावरकर यांना माफी वीर म्हटले आहे, बरं राहुल गांधी यांनी सावरकरांना माफी वीर म्हणण्याची ही पहिलीच वेळ नाही. आणि सत्तेतील लोकांनी राहुल गांधीच्या या वक्तव्यावर रस्त्यावर उतरण्याची ही सुद्धा पहिलीच वेळ नाही. आणि एकच वाक्य राहुल गांधी नेहमी नेहमी बोलत असतील आणि सत्ताधारी पक्ष त्यांच्या एकाच वाक्यावर नेहमी रस्त्यावर उतरत असतील आणि सावरकरांचा अवमान सावरकरांबद्दल चुकीचे वक्तव्य खपवून घेतले जाणार नाही असे मत सरकारकडून व्यक्त केले जात असेल, आणि सावरकरांचा खरंच अवमान होत असेल तर राहुल गांधी यांच्यावर सावरकरांचा अवमान केल्याप्रकरणी कोर्टामध्ये केस करून न्यायालयीन प्रक्रियेने का लढत नसतील. आणि जर राहुल गांधी यांचे विधान न्यायालयीन प्रक्रियेत बसत नसेल तर त्यावर रस्त्यावर उतरून सामाजिक जनजीवन व समाजामध्ये द्वेष भावना पसरवणे सरकारने बंद केले पाहिजेत. सावरकरांनी ब्रिटिशांना माफी मागितली नाही किंवा माफीचा आणि सावरकरांचा काहीही संबंध नसताना राहुल गांधी जर त्यांना माफी वीर म्हणत असतील तर ही केस कोर्टामध्ये दाखल करून राहुल गांधी यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. अन्यथा हा विषय बंद करावा. कारण या विषयामुळे धार्मिक व सामाजिक वातावरण मलिन होते. या विषयाचा राजकीय लोकांना त्यांच्या स्वार्थासाठी फायदा होतो, परंतु राजकीय फायद्यासाठी सर्वसामान्य जनतेला समस्यांमध्ये ढकलणे योग्य नाही. म्हणून हा विषय बंद करावा. याच संदर्भात सुप्रीम कोर्टाने महाराष्ट्र सरकारला चांगलीच झापले आहे, कमीत कमी महाराष्ट्र सरकार सुप्रीम कोर्टाचा आदर करून सुप्रीम कोर्टाने जे काही विधान केले त्या विधानाला न्याय देण्यासाठी, आपले वर्तन बदलून सर्वोच्च न्यायालयाचा सन्मान करेल का? हा सर्वात मोठा प्रश्न आहे. जर महाराष्ट्र सरकारकडून सर्वोच्च न्यायालयाचा सन्मान जर होत नसेल, तर हे सरकार जनता व लोकशाही विरोधी आहे हे अजून सिद्ध होईल. कोणाच्याही सरकारने संविधानिक पद्धतीने लोक मताचा लोकभावनेचा आदर करून येथे समाज व्यवस्था निर्माण करायची असते, परंतु सरकार द्वारे शांतता सुव्यवस्था प्रस्थापित न करता सरकारच धार्मिकतेत निर्माण करून राजकीय पोळी भाजून घेत असेल तर लोकशाही विरोधी आहे. आणि याची जाणीव बऱ्याच लोकांना झालेली आहे. सरकारने सर्वोच्च न्यायालयाचा सन्मान ठेवून राज्यामध्ये धार्मिक तेढ निर्माण होणार नाही व सामाजिक वातावरण दूषित होणार नाही, याचा प्रयत्न करावा. आणि लोकांनी एक गोष्ट लक्षात घ्यावी ज्यावेळेस छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज संत तुकाराम महाराज, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले,सावित्रीमाई फुले, कर्मवीर भाऊराव पाटील यांचा अवमान झाल्यावरती कुणीही रस्त्यावर येत नाही. कोणी माफी मागत नाही. मग सावरकरांविषयी बोलल्यावरच एवढे वातावरण का पेटवले जाते? तर हे वातावरण पेटवून यांना फक्त राजकीय पोळी भाजायची आहे. लोकांच्या समस्या सोडवायच्या नाहीत. याची जाणीव लोकांना जर झाली तरच आपण जागृत आहोत याची पावती मिळेल. आणि धार्मिक तेड, व धर्माचे राजकारण बंद केले तरच सर्वोच्च न्यायालयाचा सन्मान होईल.

# पुरुषोत्तम श्रीराम आणि ताणतणाव व्यवस्थापन



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**महापुरुषांच्या दोषांना सुद्धा लोक न्यायालयाने क्षमा केली नाही! एखाद्या महापुरुषाची जयंती-पुण्यतिथी का साजरी करायची? याचे उत्तर म्हणजे 'त्या महापुरुषाच्या जीवन-कार्याचे अवलोकन करून आपल्या जीवनाचे व्यवस्थापन करून आपला मर्यादित संसार आणि भोवताल आनंदी करणे' बस्स! अयोध्येचा आदर्श राजपुत्र, पुरुषोत्तम श्रीरामचंद्र यांची जयंती म्हणजेच रामनवमी आज मोठ्या जल्लोषात संपन्न होत आहे. रामजन्माचा आनंद सोहळा सर्वत्र मोठ्या उत्साहात, मिरवणुका, ढोलताशे, फटाके फोडून, आकर्षक वेशभूषा करून साजरा होत आहे! परंतु हा उत्सव केवळ आजच्या दिवसापुरता केला जातो.**

रामराज्य निर्माण करणारा आदर्श राजा, गुरुसेवक, अभ्यासू विद्यार्थी, दिनचर्या पाळणारा, आज्ञाधारक पुत्र, प्रेमळ बंधू, एकनिष्ठ पती, निसर्गप्रेमी वनवासी, प्राणीमात्रांचा सखा, भावनिक व्यक्तिमत्व, धनुर्धारी शूर योद्धा, वात्सल्यपूर्ण बाप, धर्मसहीष्णू महापुरुष ही वैशिष्ट्ये आपण वर्षभर लक्षात ठेवतो का? आपण राजा श्रीरामचंद्र यांच्याकडून काही आदर्श समोर ठेवून आपले जीवन आदर्श करण्याचा प्रयत्न करतो का? आपल्या जीवनाचे व्यवस्थापन करतो का? लोकांनी एक आदर्श पुत्र-पती-भाऊ-राजा देव केला! त्यांना मंदिरात-फोटोत मर्यादित करून आपण खुशाल अमर्याद जीवन जगत आहेत! खरंच, हे मनाला पटते का?

परिस्थिती केंव्हाच आलबेल नसते. प्रत्येक क्षण काहीतरी आव्हाने घेऊनच आलेला असतो. तो इथल्या धीर गंभीर, विचारवंत, ज्ञानी, प्रगल्भ लोकांची परीक्षा पहात असतो. त्यातून हे लोक कसा सकारात्मक मार्ग काढून आपले आणि आपल्या भोवतालच्या लोकांचे जीवन कसे सुखकर करतात( ?) याची परीक्षा पहात असतो. जे परिस्थितीला शरण जातात त्यांची नोंद काळ घेत नाही, आणि जे परिस्थितीवर मात करून आपली ओळख निर्माण करतात त्यांचे नाव मात्र अजरामर राहते. आज सर्वत्र साधनांची रेलचेल आहे. सुख-सोयी-सुविधा भरपूर असून देखील सर्वत्र रोग्यांनी दवाखाने खचाखच भरले आहेत. नाते संबंध सुरळीत नाहीत. माणसा माणसातील संवाद खुंटला आहे. माणसाचे नैसर्गिक-निरागस-निखळ हास्य लोप पावले आहे. सर्वत्र रंगवलेले-बेगडी चेहरे दिसत असून माणसांच्या चेहऱ्यावरील उत्स्फूर्त झळाळी गायब झाली आहे. स्त्रीयांचे दैवी सौंदर्य घटले आहे. तरुणांचे तारुण्य विरले आहे. तरुणींचे निखळ स्मित, लज्जा, मधुर भाष्य, ईश्वरी सौंदर्य लुप्त झाले आहे. बलदंड, पिळदार, प्रसन्न देहयष्टी असणारी माणसे कुठेच दिसत नाहीत. सगळीकडे किडकिडीत आणि चिडचिड करणारी माणसं हातात क्षणिक सुख देणारा मोबाईल नावाचा निर्जीव डब्बा घेऊन त्यातच आनंद शोधत आहेत! सगळीकडे मोबाईल वेडेच वेडे! हे मोठे भयंकर चित्र आहे! साधारणतः सर्वच नैसर्गिक बाबी रुक्ष, क्षीण झाल्या आहेत! सांप्रतकाळी मानवी जीवनात असा विरोधाभास का? याची उतरे पुरुषोत्तम राजा श्रीरामचंद्र यांच्या जीवनात आणि त्यांनी उभे केलेल्या आदर्श रामराज्यात आहेत. अयोध्यापती राजा श्रीरामचंद्र हे मर्यादा पुरुषोत्तम आहेत. आज आपण राम नवमी साजरी करतांना अमर्याद जीवन जगण्यामुळे अनंत समस्यांनी ग्रस्त आहोत. आज मानवी जगण्याला यम-नियमांची नितांत गरज आहे. माणसाने मर्यादा सोडल्याचे परिणाम म्हणजे आज माणसांना अनंत व्याधींनी ग्रासले आहे. नसणारे नवनवे रोग निर्माण झाले ते ही मर्यादा उल्लंघन केल्यामुळेच! एकनिष्ठता, प्रामाणिकपणा, ब्रह्मचर्य इत्यादी बाबींचे उल्लंघन झाले आणि माणूस अवनत झाला. त्यासाठी जीवनात मर्यादा असणे महत्वपूर्ण असून ज्ञानेश्वरीमध्ये

**पर्वतीं बैसका न संडावी ।समुद्रीं रेखा नोलांडावी ।पृथ्वीया भूतें वाहावीं ।हे आज्ञा माझी ॥**

ही ओवी लिहून पर्वत, नद्या आणि समुद्र यांनी सुद्धा आपली मर्यादा सोडू नये आणि सोडल्यास भूकंप, त्सुनामी सारखी भयानक संकटे पृथ्वीवर आल्याशिवाय राहणार नाहीत. यासाठी मर्यादा तत्वाचे काटेकोरपणे पालन करून आनंदी जीवनाचे सुनियोजन करावे. शिवाय श्री रामचंद्र यांचा कृतज्ञभाव हा अत्यंत महत्वपूर्ण सद्गुण असून त्याद्वारे आज माणसाने आपल्या जीवनात हा सद्गुण अंगी बाळगावा जेणेकरून आपल्याकडून कुणाचाही उपमर्द होणार नाही. निसर्ग, सूर्य, पाणी, हवा, पृथ्वी, आई-वडील, जेष्ठ, गुरुजन आणि ज्यांनी ज्यांनी आपल्यावर कृपा केली आहे आणि करत आहेत अशा सर्वांच्या प्रती आपण कृतज्ञ भाव जपावा आणि आपले आणि इतरांचे जीवन आनंदी करावे! राजा श्रीरामचंद्र आपल्या सावत्र आईच्या इच्छेखातर स्वतःचा राज्याभिषेक होण्याच्या वेळेला १४ वर्षांसाठी वनवास पत्करतात यावरून आपल्याला राजा श्रीरामचंद्र यांचा असीम कृतज्ञभाव आणि आज्ञाधारकता लक्षात येते. आज माणूस हा मुळस्वभाव सोडून वर्तन करतोय, परिणामी सर्व सुखसोयी असुनसुद्धा सर्वच माणसे दुःखपूर्ण जीवन जगत आहेत. याचबरोबर आज माणूस संयम हरवून बसला आहे. उतावीळपणा, चिडचिड, घाई-गडबड, तात्काळ फलप्राप्तीसाठी जो तो धावतो आहे, परंतु असे कधीच होत नसते. श्रीमद् भगवद्गीतेमध्ये श्रीकृष्ण संयमाचे महत्व विषद करतांना अर्जुनाला सांगतात,

**यस्त्विन्द्रियाणि मनसा नियम्यारभतेऽर्जुन। कर्मेन्द्रियैः कर्मयोगमसक्तः स विशिष्यते।।**

म्हणजेच जो मनुष्य आपल्या इंद्रिय, मन, भावना, विचार यांवर नियंत्रण ठेवून आपली दैनंदिन कामे इमानेइतबारे करतो तोच आपले जगणे आनंदी करू शकतो, ताणतणाव मुक्त राहू शकतो.



याशिवाय विवेकशील विचार हा श्री रामचंद्रांचा महत्वपूर्ण गुण असून दूरदृष्टीने ते आपल्या समोरील आव्हान, परस्थितीचे अवलोकन करून निर्णय घेतात. यासाठी

**तुलसी असमय के सखा , धीरज धर्म विवेक ।साहित साहस सत्यव्रत , राम भरोसो एक ॥**

अशी ओळ रामायणात लिहून धैर्य, धर्म, विवेक, साहस आणि सत्यवृत्त हे अत्यंत महत्वपूर्ण गुण असून ज्यांनी या सर्वच सद्गुणांची कास धरून जीवन जगतात तेच जीवनात यशस्वी, आनंदी झाल्याशिवाय रहात नाहीत. याशिवाय शांतता प्रीती, सदाचारी, विद्वतप्रचुरता, ज्ञानी, प्राणी मात्रांवर प्रेम करणे, अन्यायाचा प्रतिकार करणे, शत्रूचा सन्मान करणे, वीर्यवान, धैर्यवान, कुटुंब वत्सल, लोकमताचा सन्मान करणारा राजा आणि १४ वर्ष्यांच्या वनवासानंतर श्री रामचंद्रांनी आपल्या राज्यांत सर्वांना समान संधी, न्याय, सन्मान देऊन आपले आदर्श रामराज्य प्रस्थापित केले. हा आपला आदर्श भूतकाळ आहे!

आज पुरुषोत्तम राजा श्रीरामचंद्र यांची जयंती-रामनवमी साजरी करतांना सर्वच स्थरांवर आपल्याला राजा श्रीरामचंद्राच्या सद्गुणांची नितांत आवश्यकता आहे. संयम, धैर्य, शांती, कुटुंबवत्सलता, कृतज्ञता, कर्तव्यपरायणता, निसर्ग-प्राणीमात्र प्रेम, बंधूप्रेम, त्याग, सामर्थ्य, लोकमतादर, विवेक, प्राज्ञ, दयार्दभाव, मित्रत्व, युद्धकुशल, नेतृत्व, समयसूचकता, दृढनिश्चय, आत्मभान, यम-नियम, व्यायाम, ध्यान, धारणा इत्यादी महत्वपूर्ण सद्गुण अंगीकारल्यामुळे माणसांच्या जीवनात सर्वकाळ आनंद प्रस्थापित झाल्याशिवाय राहणार नाही. तसेच सांप्रतकाळी राजकारणी मंडळींनी श्रीरामनवमी सोहळा आणि राममंदिराबरोबरच देशात रामराज्य प्रस्थापित करण्यासाठी आटोकाट प्रयत्न करावेत. देशामध्ये सहिष्णूता प्रस्थापित करून हा देश सर्व धर्मियांचा असून आपले पूर्वज आदर्श राजा श्रीरामचंद्र होते हा भाव प्रत्येक नागरिकाच्या मनामनात रुजवण्यासाठी प्रयत्न करावेत. राजकीय प्रगल्भता प्रस्थापित करून महागाईवर नियंत्रण, तरुणांना नौकऱ्या, शेतमालाला योग्य भाव, स्त्री सन्मान इत्यादी बाबी रुजवून रामराज्य आणावे हीच माफक अपेक्षा! असे होणे म्हणजेच खऱ्या अर्थाने रामनवमी साजरी करणे होईल अन्यथा आणखी एक मिरवणुक-उत्सव बस्स! जय श्रीराम!

# ओला स्पर्श



रंजना सानप
संपर्क क्र. ९०४९५४८३२३

आधुनिक केसरी

**घराच्या उंबऱ्यातच अडकून बसलेली माधवी दिवसभर कुटुंबासाठी खपायची. वर्ण गोरा गोमटा,कुरळे केस, सुडौल बांधा, बोलके डोळे, उंचापुरी अशी ती. तिचं सौंदर्य अगदी साध्या साडीतही खुलून दिसायचं. मनात असतानाही साजशृंगार करायला स्वतःकडे लक्ष द्यायला तिला वेळच मिळायचा नाही. कितीतरी आवडीच्या गोष्टींना नाईलाजाने ती मुरड घालायची. तिची दिवसाची सुरुवात सूर्य उगवण्याआधीच व्हायची. अंगण झाडात झाडता झाडीतून तिला भास्कर खुणावत असल्याचा भास व्हायचा. तिलाही त्याचं सोनेरी रूप आवडायचं अन ती त्याच्यावर फिदाही व्हायची. थोडं तरी त्याला आपल्या नजरेत भरावं यासाठी तिची धडपड चाललेली असायची. तोवरच आतून सासऱ्यांचा आवाज यायचा.**

सुनबाई अंघोळीला पाणी काढलं की नाय अजून ?कुठं झाडीत डोळं लावून बसला हायसा. त्या आवाजाने माधवी भानावर यायची. अंघोळची पाणी नान्हीत ठेवून घरात जाताना तिची नजर गोठयातल्या गाईकडे जायची.तिचं वासराला जवळ घेऊन चाटत असताना फुटणारे वात्स्यल्य सडातून पाझरायचं.तो मायेचा पाझर तिला माहेरच्या वाटेवर घेऊन जायचा.धार पिळतानाचा येणारा चूळ चूळ आवाज तिच्या मनात खोल एक विशिष्ट नाद निर्माण करायचा.

तोवर सासूबाई काठी आपटतच बाहेर यायच्या. चहा लवकर ठेवून स्वयंपाकाला लाग बरं.दिवस कुठं आलाय त्याकडं बघावं जरा. माधवला कामाला जायचं हाय.लेकरं उठायच्या आतच भरभर उरकावीत होतील तेवढी कामं."

ती काहीच न बोलता घरात जायची. चहा ठेवून स्वयंपाक करण्यात गुंतायची.लगेच मनीमाऊ तिच्या पायाशी लुडबुड करायची.तिची मुकी भाषा जणू तिला कळत होती. तसं तर त्या दोघींची छान गट्टीच जमली होती.माऊच्या पुढे दूध ठेवताच डोळे झाकून मिटक्या मारत ते प्यायची. तिला ती निरखायची. मऊ कापसाचा गोळा ठेवल्यागत तिला वाटायचं. तिचं आतून गुरंगुरण खूप भावायचं.

माधव तिला बाथरूम मधूनच आवाज द्यायचा. "माझे कपडे आणून देतेस का माधवी ?"

तशी ती हातातलं काम सोडून धावतच त्याच्याकडे जायची. कपडे हातात देताना त्याच्या डोळ्यात डोळे घालायची. तिला आपलं सगळं जगच त्या डोळ्यात दिसायचं. तिची सगळी स्वप्ने त्या डोहाताच सामावली असल्याचा भास तिला व्हायचा. नकळत होणारा त्याचा ओला स्पर्श तिच्या सर्वांगाला शहारून जायचा. कुठेतरी दूर निसर्गाच्या कुशीत त्याच्यासोबत एकांतात हरवून जावं. पावसाच्या सरीत दोघांनी ओलेचिंब व्हावं .सहचारिणी तर कधी मैत्रीण होऊन अल्लड चाळे करावेत. मनसोक्त हसावं तर कधी आत दाबलेल्या हुंडाक्याला मोकळी वाट करून द्यावी. तो हात काही क्षण तरी माझ्या हातात असावा.असं तिला किती वेळा वाटायचं. एक दिवस तरी वर्षातला माझ्या मनासारखा असावाअसं ती माधवला बोलून जायची. खूप कामं असतात गं ऑफिसमध्ये जाऊ कधीतरी. असं म्हणत तो विषय बदलायचा.

मुले हळूहळू मोठी होत गेली. त्यांनी चांगलं घडावं यासाठी ती आपल्या जीवाचं रान करत होती. त्याचं शिक्षण,खाणं पिणं, हट्ट, लाड तिच पुरवत होती. सुट्टीच्या दिवशीच थोडा बहुत वडिलांचा सहवास त्यांना लाभत होता.शेतातील कामाचे नियोजनही आई वडील थकल्याने त्यालाच पहावे लागत होते. मुले मोठी होताच शिक्षणासाठी बाहेर पडली. आईच्या भोवती गलका करणारी ती आता स्वतःच्या विश्वात गुंग झाली होती. तिला मात्र जवळचं काहीतरी हरवलंय असं वाटू लागलं. सासरे सासूबाईची सेवा व घरकाम करत ती दिवस ढकलत होती. अधूनमधून घरासमोर लावलेल्या फुलांच्या छोट्या बागेत ती चकरा मारायची.तो फकत तिच्या आवडीचा,आनंदाचा क्षण असायचा. पानांफुलावरून मायेने हात फिरवायची. वाऱ्याची मंद झुकूळ अंगावर झेलत ती काहीतरी पुटपुटत राहायची.फुलांच्या पाकळ्या ओंजळीत घेऊन सुगंध खोल श्वासात भरायची. त्याच पाकळ्या आपल्याच अंगावर टाकायची. सुकलेल्या तिच्या चेहऱ्यावर एक वेगळेच तेज झळकायचे.

माधव सेवानिवृत्त झाला. मुले आता नोकरीला लागली. माधववरची जबाबदारी कमी झाली. मुलांबाबतचे माधवीचे स्वप्नही पूर्ण झाले होते. आता तरी माधव माझ्यासाठी वेळ देईल .तारुण्याच्या वेलीवर पाहिलेलं स्वप्न आयुष्याच्या या वळणावर तर साकार होईल असं तिला सारखं वाटत होतं. माधवकडे तिला सांगायला तसं कारणही आता उरले नव्हते ."नक्की जाऊ" असा माधवने तिला शब्द दिला होता.सगळे कसे छान चालले होते.पुढे वृद्धापकाळाने सासू सासरे देवाघरी गेले. मुलांची लग्ने थाटामाटात झाली.मुले सुना नोकरीच्या गावी राहू लागली.माधवी आणि माधव अधूनमधुन त्याच्याकडे जात असत.पण लगेच परत येत कारण, गावाकडची माणसं अन मातीवर त्यांचे मनापासून प्रेम होते. सिमेंटच्या भिंतीत त्यांचे मन कधी रमतच नव्हते. एक दिवस माधवी लवकर उठली.आज तिचा तो स्वप्नातला दिवस प्रत्यक्षात साकार होणार होता. काळेपांढरे झालेले केस तिने धुवून मोकळे सोडले होते. तिला आवडणारी निळ्या रंगाची साडी घातली होती.माधवला हाक मारली आणि ती अंगणात गेली.मोगऱ्याच्या फुलांचा सुवास श्वासात भरला. त्याचा गजरा करून ती आज केसात माळणार होती. अंगण झाडून सडारांगोळी झाली. तरी माधव-अजून का उठला नाही म्हणून परत तिने हाक मारली. काहीच प्रतिसाद नाही. तशी ती थोडी घाबरलीच. जवळ जाऊन तिने त्याला जोरात हलवले. तरी त्याची काहीच हालचाल दिसली नाही तशी ती जोरात



किंचाळली.आजूबाजूचे शेजारी पळतच त्यांच्याजवळ आले. डॉक्टराना बोलवण्यात आले. डॉक्टरांनी तपासणी करताच माधवला झोपेत मृत झाल्याचे घोषित केले. मृत्यूचे कारण बहुतेक ह्रदय विकार असावा असे बोलून ते निघून गेले.तसं तिथे उभा असलेली माधवी एकदम कोसळली.तिला आता अवतीभोवती सगळा अंधार दिसू लागला. ती रडत होती, ओरडत होती. माधवला जोरजोरात हलवत होती. असं कसं झालं? सगळंच कसं संपलं.आता मी कोणासाठी जगावं असं म्हणत ती आक्रोश करत होती, किंचाळत होती. मोगऱ्याची फुले हातातलं ताट निसटून तिथेच विखुरली होती. जसं तिचं स्वप्नच तुटाव. ती विन्मुख झाली पण काहीच उपयोग नव्हता. वास्तव तर स्वीकारावे लागणारच होते.मुलांना ,नातेवाईकांना कळविण्यात आले. हे असे माधवचे जाणे अनपेक्षित घडल्याने सर्वांसाठी हा मोठा धक्काच होता. सर्व विधी उरकण्यात आले. मुलांना फार काळ गावाकडे रहाणे जमणार नव्हते. आईला एकटेच गावाकडे कसे ठेवायचे म्हणून त्यांनी तिला सोबत नेण्याचे ठरवले. माधवी एकदम शून्यात हरवल्यासारखी झाली होती. तिच्या मनात नसतानाही ती मुलांसोबत शहरात गेली. पण तिचं मन गावाकडे धाव घेत होते. माधवसोबतच्या अनेक आठवणी मनाला पोखरत होत्या. तिला अन्नपाणी गोड लागत नव्हते. सुना मुलांनी तिला खूप समजावले पण तिच्यात काहीच फरक पडत नव्हता.तिचे डोळे खोल खोल गेले होते. शरीर अगदीच कृश झाले होते. दुपारची वेळ होती. आजूबाजूला शांतता होती. माधवी बाहेर हॉलमध्ये बेडवर पडून होती. त्या शांततेत एक सुरेल स्वर तिच्या कानी पडला. तिला काहीतरी गवसल्याचा भास झाला.तिने खिडकीतून खाली पाहिले. इमारतीच्या खाली असणाऱ्या छोट्या बागेत बाकड्यावर एक आजी बसल्या होत्या. त्या गाणे गात होत्या. माधवीला त्यांना भेटावं असं वाटू लागलं. अंगात अवसान आणून हळूहळू ती खाली आली. साधारण ऐशीच्या वयातल्या त्या असाव्यात. त्यांनी अंगावर फिक्कट गुलाबी रंगाची साडी घातली होती. पांढऱ्याशुभ्र केसांचा चापून चोपून अंबाडा बांधला होता.त्यावर खोचलेले लाल रंगाचे फुल फारच शोभून दिसत होते. चेहऱ्यावर सुरकुत्या होत्या पण तेज होते. गोऱ्या रंगावर लाल कलरची टिकली शोभून दिसत होती. माधवी त्यांच्या समोरच्या बाकड्यावर बसली आणि त आजीकडे एकटक नजर लावून पाहू लागली. आजी गाणे गाण्यात तल्लीन झाल्या होत्या. माधवीही त्या गाण्यात हरवून गेली होती. विस्कटलेले केस, चुरगळलेला पदर ती कसातरी सावरत होती. थोडया वेळाने आजींनी डोळे उघडले. तशी माधवी त्यांना पुढे दिसली. जणू तिने काहीच न बोलता तिच्या डोळ्यावरून तिचे दुःख जाणले होते. माधवीला जवळ बोलावताच ती त्यांना बिलगून खूप रडली. आजींने तिच्या सर्वांगावर मायेने हात फिरवला. तिला आपलं दुःख आता हलकं वाटू लागलं. मनातलं सगळं ती त्याच्यापुढे ओकत राहिली. आजी ते शांत चित्ताने ऐकू लागल्या.

"आजींनी तिला एक वाक्य सांगितले. हा जन्म पुन्हा नाही.जी परिस्थिती आपल्या वाट्याला आली आहे ती स्वीकारून पुढे जा. स्वतःच दुःख कधीच मोठं करू नकोस.आयुष्यातील प्रत्येक क्षण भरभरून जग. जोपर्यंत शरीरात श्वास चालू आहे ना तोपर्यंत. माझा एकुलता एक मुलगा अपघातात गेला. दोन वर्षापूर्वी पती गेले.मी आता घरात एकटीच राहते. कोणाचीही सोबत शेवट पर्यंत लाभेल असे होत नाही. मी वास्तव स्वीकारले. स्वतःला वेगवेगळ्या छंदात गुंतवून घेतले. दिवसाचा काही वेळ मी समाजसेवेत घालवते. महिला मंडळ, भजनी मंडळात मी सहभागी होते. एकमेकींशी संवाद साधला की दुःख हलके होते,वेदनेवर फुंकर घालता येते. सुखाचे क्षण अनुभवता येतात.तू टाकून दे तुझ्या मनातील मळम.जग भरभरून. दुःख स्वतःच हसरे करावे लागते बाई. त्यासाठी कोणी दुसरे येत नाही. असं म्हणत आजी उठल्या. त्यांची आश्रमात जायची वेळ झाली होती. माधवी त्या उठल्या तरी तिथेच बसून राहिली. आज कित्येक दिवसांनी ती बाहेरची मोकळी हवा अंगावर घेत होती. तिला आतून एक आवाज येत होता.

"ऊठ माधवी ऊठ. स्वप्न अजून तसंच आहे."

ती उठली घरात जाऊन आरशासमोर उभी राहिली.,स्वतःचे रूप पाहून तिलाच कसतरी झालं. बसलेल्या गालपाडात आणि विस्कटलेल्या केसात ती बेसूर वाटत होती.एवढी तिची अवस्था वाईट झाली होती. तिने आज केस विंचरले,छान साडी घातली. कपाळाला टिकली लावली. तिच रूप त्या ही अवस्थेत छान दिसू लागलं. संध्याकाळी मुले सुना आईत झालेला बदल पाहून अवाक झाली पण, मनातून सगळ्याना आनंद झाला. आईनेच आज सगळ्यासाठी छान स्वयंपाक बनवला. जेवण झाल्यावर तिने आपल्या मनातील विचार मुलांना बोलून दाखवला. "इथे शहरात राहण्यापेक्षा मी गावाकडे एकटी राहीन. तिथेच माझे मन रमते. अधूनमधून तुम्ही मला भेटायला येत चला.कारण माझं उर्वरित आयुष्य मला माझ्या मनासारखं जगायचे आहे." मुलांनीही आईच्या विचारांचे कौतुक केले. ती गावाकडे आली. अंगणात तिला तिचा माधव वाट पाहत असल्याचा भास झाला. पण तिनं स्वतःला सावरलं. घर ,अंगण साफ केलं. तुळशीला ,फुलझाडांना पाणी घातले.सूर्य मावळतीला आला होता. तो सोन्याचा गोळा डोंगराआड जात होता.ती त्याच हे रूप किती वेळ डोळ्यात साठवत होती. तिला उठवणार आज कोणीच तिथे नव्हतं. चुलीवर केलेली भाकरी तिनं चांदण्याच्या प्रकाशात खाल्ली. तो चांदवा तिच्याशी गुज करत होता. हळूहळू तिने महिलांचे बचत गट सुरू केले. कुटुंबाला आर्थिक आधार देता देता त्या एकत्र येऊ लागल्या. अनेक विषयांवर चर्चा होऊ लागल्या. मनातलं सारं माधवी जवळ खोलू लागल्या. ती ही त्यांचा मायेचा आधार बनून गेली होती. आज अचानक आभाळात काळे ढग जमा झाले होते. मातीचा मृदगंध पावसाची चाहूल देऊन गेला. पायरीवर बसून माधवी तो वास खोल श्वासात भरत होती. पावसाची रिमझिम सुरू झाली. त्या पावसात ती भिजत राहिली. तिने डोळे मिटून घेतले. तिचं अपूर्ण स्वप्न आज साकार होत होतं पण तो जवळ नव्हता. तिने आपलाच हात सर्वांगावर फिरवला. त्या पांढऱ्या केसांतून ओघळणाऱ्या थेंबात ती हरवून गेली. हरवून गेली.

# सर्वसामान्य जनता खोदत आहे स्वत: स्वत:ची कबर

आधुनिक केसरी

**मजुर, शेतकरी, लघु उद्योग व किरकोळ व्यापारी या सर्व लोकांना आपलं जिवनमान उंचावण्याचा व उज्वल भविष्य घडविणारा असा आशेचा किरण, दृष्टिपथास पडणारा मार्ग म्हणजे सरकारी नोकरी. जरी बोलतांना नौटंकिबाज बहूसंख्य माझ्या मुलांना मी नोकरी लागावा म्हणून मी शिकवित नाही आहे किंवा मी नौकरीसाठी शिकत नाही आहे असे फेकत असले तरी अंतर्मणातून माझा मुलगा शिकून मोठया नोकरीवर लागावा, नव्हे किंबहूना प्रत्येक शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना वाटत असते. आपण चांगले शिकून छोटी-मोठी नोकरी मिळावी यासाठी प्रयत्न असतो.**

मजूर, शेतकरी कुटुंबातील एक मुलगा जरी नोकरीवर लागला त्याच्या कुटुंबाचा चेहरा मोहरा बदलून जातो. सरकारी नोकरी मिळालेल्या व्यक्तींना समाजात मोठा मानसन्मान मिळतो. सरकारी नोकरी असलेल्या मुला-मुलींना त्यांना हवी असलेली मनासारखी स्थळ मिळतात. दुर्दैवाने सरकारी नोकरीवार असणाऱ्या व्यक्तींचे मृत्यु झाले तर त्यांच्या वारसांना पेंशन मिळतो व अनुकंपा तत्वावर नोकरी मिळतो. एवढेच नव्हे तर सरकारी नोकरीत असणारे क्लॉस 4 पासून ते क्लॉस 1 पर्यंतची पदे ही तीथे मिळणाऱ्या सोई सुविधांनी आपल्याकडे खेचुन घेत असतात. अशा अनेकविध कारणांमुळे समज आल्यापासून आपली योग्यता ओळखून प्रत्येक व्यक्ती या विविध सरकारी नोकऱ्यातील आपले आवडीचे क्षेत्र निवडून त्यात प्रवेश करण्यासाठी पाय रोखून प्रचंड अभ्यास, मेहनत घेत असतात. टॉयपिंग, कॉम्प्युटर अशा, आवश्यक अतिआवश्यक गोष्टीत प्राविण्य मिळवित असतात. सरकारी नोकरी मिळविण्याकरीता प्रचंड स्पर्धा आहे. त्यामुळे त्या क्षेत्रातील अतिशय उच्च दर्जाचे ज्ञान व कौशल्य असलेल्याच व्यक्ती सरकारी नोकरीत येवू शकतात. परंतु यात प्रयत्न करुनही ज्यांना यश मिळाले नाही. त्यांना कुठेतरी प्रायवेट कंपनी वा स्वतःचे उद्योग धंदे टाकून ते यशस्वी चालवू शकतील येवढेतरी ते सक्षम निपजतात. त्यामुळे समाजात, आपल्या देशात स्पर्धा निर्माण झाल्यामुळे प्रत्येक व्यक्ती स्वतःला सिध्द करण्याच्या प्रयत्नात विकसीत होत आहे. त्याचाच परिणाम म्हणून समाजात विकासाची गती जोर धरली आहे. जे मुल एमपीएसी, युपीएससी अशा अतिशय कठिण परिक्षेची तयारी केली परंतु यशस्वी झाले नाही ते मात्र निराश, स्वस्थ बसलेले नाहीत. ते ज्या क्षेत्रात जातील त्या क्षेत्राला ते सोन्याहून पिवळे केलेले आहेत. आपण विविध पेपरमध्ये कुशल शेतकरी यांची गाथा वाचतो. पाच एकर मध्ये एका मुलांनी 35 लाखाची मिरची पिकवली. दोन एकर शेतीतून 7 लाखाचे कोशिंबीर पिकवले. अशी उज्वल स्थिती येणाच्या पार्श्वभूमीत घुसले तर निदर्शनास येतो की सरकारी नोकरीत समाविष्ट होण्यासाठी घेतलेली प्रचंड मेहनत. या सरकारी नोकरीत असणाऱ्या सोयी-सुविधा, सुरक्षितता, उज्वल भविष्य अशा आकर्षित गोष्टींमुळे प्रत्येक सामान्य व्यक्ती आपल्या पाल्यांकडे लक्ष देवून त्यांचे योग्य संगोपन व पोटाला चिमटे काढून त्यांचे शिक्षण पूर्ण करण्याचा प्रयत्न करीत असतो. सरकारी नोकरीत जाण्यासाठी आपल्या मुलांवर कोणते गुन्हे नकोत किंवा आपल्याला नोकरी हवी असेल तर आपल्यावर कोणते गुन्हे नकोत अन्यथा आपल्याला सरकारी नोकरी मिळणार नाही. याकरीता प्रत्येक व्यक्ती स्वतःच्या मुलांना व स्वतःला गुन्हेगारीपासून अलिप्त ठेवतो. त्यामुळे समाजात व देशात सामाजिक नियंत्रणसुध्दा राखल्या जात आहे.

असे अनेकविध फायदे असले तरी सरकारी नोकऱ्या कपात, जुनी पेंशन बंदी, *कंत्राटी नोकर भरती यासारखी पावले सरकार उचलतो आहे. याचे समाजावर पर्यायाने देशावर विपरीत परिणाम होतील. सरकारी नोकरी भरती बंदी व जुनी पेंशन बंदीचे परिणामः आज महाराष्ट्रात जुनी पेंशन लागू करा संदर्भात सर्व कर्मचारी बेमुदत संप पुकारताच समाजमाध्यमावर सामान्य लोकांकडून खुप मोठी विषारी टिका होत आहे. कर्मचाऱ्यांना पगार पाहिजे, लाच पाहिजे, अन् पेंशनही, कर्मचाऱ्यांना पेंशन न देता उलटे लटकवून फटके मारा, लाच घेता, पेंशन घेता, कर्तव्याच काय? अशा कितीतरी टिका अन् जे ते सर्वसामान्य सरकारच्या बाजूनी बोलू लागले. अन् हे टिका करणारे कुणी दुसरे तिसरे नसून एस.सी.,एस.टी., ओबीसी, एनटी, अल्पसंख्यांक, ओपन या सर्वच स्तरातील व्यक्ती आहेत. अन् पेंशन मागणारेही याच वर्गातील आहेत. मग असे का?

आज गॅसच्या किंमती वाढल्या. पण सर्वसामान्य जनता त्यावर ओरळ करत नाही, सरकारी नोकऱ्या बंदी आदेश काढले जाते. सर्वच कॅटेगरी भरतीचा अनुशेष कितीतरी रिक्त आहे. पण त्यावर कुनीही बोलायला तयार नाही कि आपले अधिकार मागावे ते कडत नाही. शेतकऱ्यांना शिव्या देणारे, मजूरांना फुकटच स्वस्थ धान्य खावून माज येतोय बंद करा. यासारखे वक्तव्य करणारे सरकार आवडू लागले. स्वस्थ धान्य मिळेणासे झाले. त्यावर बोलायची उसंत नाही. पण कर्मचाऱ्यांची पेंशन बंद झाली पाहिजे, देवू नका हे सरकारला सांगण्यासाठी, कर्मचाऱ्यांवरती तोंडसुख घेण्यासाठी मात्र थोडं राणं कमी पडत आहे. निवडून येवून पाच वर्षे सेवा देणाऱ्या आमदार, खासदार यांना मिळणाऱ्या लाखो रुपये पेंशन विषयी बोलायची उसंत नाही. सरकारनी साटेलोटे असणाऱ्या कर्ज बुडवणाऱ्या उद्योगपतींचे कर्ज माफ करतो व आपला खिसा गरम करुन देशाची अरबो रुपयाची तिजोरी खाली करतो त्यावर लक्ष जात नाही. अनावश्यक खर्च कुंभमेळाव्यांवर करतो त्यावर बोलायला वेळ नाही. पण अत्यावश्यक सेवा देणाऱ्या सरकारी कर्मचाऱ्यांना जुनी पेंशन द्यायला नको. त्यावर गलिच्छ बोलायला मात्र आपल्याला वेळच वेळ आहे. नेमकं असं का घडत असावं? याच मुख्य कारण म्हणजे सर्वसामान्यांचे अज्ञान. सरकारी कर्मचारी यांना पेंशन, भत्ते का हवेत हे लक्षात आल्यास ते असं बोलूच शकत नाही. भारत स्वतंत्र होण्यापूर्वीसुध्दा ब्रिटिश शासनातसुध्दा शासकिय कर्मचाऱ्यांना पेंशन मिळत असे. भारत स्वतंत्र झाल्यानंतर सुध्दा 2005 पर्यंत पेंशन होती. भारतातील तरुण वर्गात झपाटयांने शिक्षणाचे प्रमाण वाढावे यासाठी सुरुवातीला ग्रॅज्युएट झाल्यानंतर जर तरुन बेरोजगार असेल तर त्यास सुशिक्षीत बेरोजगार भत्ता मिळत असे. गाव तिथे शाळा हे धोरण सुरु झाले. भारतात प्रगतीचे वारे सुरु झाले, देश विकासाकडे झेपावला. परंतु भारत ही जगातील 5 वी आर्थिक महासत्ता म्हणून उदय होत असतांनाच आपल्याकडे पैसा नाही, कर्मचाऱ्यांना पेशन दिली तर आपला देश, राज्य आर्थिक डबघाईला येईल. अशा कितीतरी सबबी देत हे राजकारणी सरकारी कर्मचाऱ्यांचे परिवार उघडयावर टाकत आहे. आता तर सरकारी नोकरी भरती प्रक्रिया बंद करुन 9 एजन्सीद्वारे सरकारी कामे करण्याचे ठरविले आहे. अग्नीविर यासारखी योजना सरकार राबविणार आहे. महाराष्ट्रापेक्षा मागास असलेले राज्यस्थान, छतीसगड, हिमाचल प्रदेश इत्यादी राज्य पेंशन देवू शकतात. तर महाराष्ट्र का नाही? पण मुळातच बेईमानी रक्तात असलेले हे सुडबुध्दीचे जनप्रतिनिधी हे या गंभीर विषयाकडे दुर्लक्ष करीत आहेत. या सर्व गोष्टिमुळे समाजावर खुप मोठे विपरित परिणाम होतील.

**जुनी पेन्शन व सरकारी नोकरी नाकारण्याचे परिणाम:**

1. सरकारी नोकरी व जुनी पेंशन हे पात्र कामासासाठी पात्र व्यक्ती उपलब्ध करण्यासाठी आकर्षण ठरत असते. त्यामुळे पात्र कामासाठी पात्र व्यक्ती उपलब्ध होतात. परंतु जुनी पेंशन व सरकारी नोकरी हे हद्दपार केल्यास पात्र कामासाठी पात्र व्यक्ती उपलब्ध होणार नाही.

2. सरकारी दवाखान्यात काम करणाऱ्या डॉक्टर, कर्मचारी यांना जुनी पेंशन वा कुटुंब सुरक्षितता न लाभल्यामुळे तज्ञ डॉक्टर हे प्रायवेट दवाखाने थाटतील व सरकारी दवाखान्यात फक्त मजबूरी म्हणून काम करणारेच उरतील. ते जीव लावून काम करणार नाही. **क्रमशः**

**प्रा. डॉ. विठ्ठल शा. आत्राम**
**सहायक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग**
**प्रमुख, श्री शिवाजी महाविद्यालय, राजुरा**
**मो.नं. 8007971465**

# भाडेकरू, आम्हाला आमचं घर देता का घर ?

## वृद्ध दाम्पत्याची आर्त हाक; गांधीवादी मार्गाने लाक्षणिक उपोषण व आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** पुण्यात भाडेकरूच्या मुजोरीला कंटाळलेल्या आणि आर्थिक विवंचनेत सापडलेल्या वृद्ध दाम्पत्याने गांधीवादी मार्गाने लाक्षणिक उपोषण आंदोलन करत 'भाडेकरू, आम्हाला आमचं घर देता का घर?' अशी आर्त हाक दिली. बिबवेवाडीतील आपल्याच घरासमोर बसून उपोषण करण्याची वेळ डॉ. अविनाश फाटक व माधुरी फाटक या वृद्ध दांपत्यावर आली आहे. डॉ. अविनाश फाटक ७२ वर्षांचे, तर माधुरी ६७ वर्षांच्या आहेत. त्यांच्या या आंदोलनाला अन्य ८-१० वृद्ध नागरिकांनी उपोषणाला बसून साथ दिली.

फाटक दाम्पत्याने सदानंद सोसायटीतील आपला 'सरस्वती' हा बंगला आतिश जाधव यांना पाच वर्षांच्या भाडेकरारावर 'किडझी' हे नर्सरी स्कुल चालवण्यासाठी दिला होता. हा करार या वर्षाखेरीस संपणार आहे. सलग तीन महिने भाडे थकवल्यास जागा सोडावी लागेल, अशी तरतूद




रजिस्टर अग्रीमेंट केलेल्या भाडेकरारात आहे. असे असतानाही गेल्या साडेतीन वर्षांपासून आतिश जाधव भाडे देत नाहीत. या ठिकाणी पोटभाडेकरू ठेवून अन्य व्यवसाय अनधिकृतपणे करत आहेत. वारंवार फोन करण्याचा, भेटण्याचा प्रयत्न करूनही टाळाटाळ केली जात आहे. यासंदर्भात फाटक दाम्पत्याने न्यायालयात धाव घेतलेली असून, त्यावर निर्णय होत नसल्याने त्यांची ससेहोलपट होत आहे.

याबाबत बोलताना डॉ. अविनाश फाटक म्हणाले, आतिश जाधव यांनी गोड बोलून आमच्याकडून जागा भाड्याने घेतली. सुरवातीला वर्षभर भाडे नियमित दिले. मात्र, पुढे वारंवार भाडे मागूनही दिले नाही. परिणामी, आम्ही न्यायालयात गेलो. मात्र, तिथेही 'तारीख पे तारीख' सुरु असून, जाधव किंवा त्यांचे वकील न्यायालयात हजर राहत नाहीत. साडेतीन वर्षे भाडे नाही, पण आम्हाला मालमत्ता कर भरावा लागतो. कायदेशीर लढाईत मोठा खर्च होत आहे. उतारवयात आम्हाला उत्पन्नाचे हे एकमेव साधन असताना उत्पन्न शून्य आणि खर्च मोठा, अशी आमची अवस्था झाली आहे. जागा बळकावण्याची भाषा जाधव यांच्याकडून वारंवार होत आहे. या सगळ्यात आम्ही आर्थिक विवंचनेत सापडलो आहोत. हक्काचे घर असताना आम्हाला भाड्याने किंवा मुलीच्या घरी जाऊन राहावे लागत आहे. या सगळ्याचा आमच्या दोघांच्या मनावर प्रचंड मानसिक ताण निर्माण झाला असून, माझा रक्तदाब व हृदयविकारचा त्रास वाढला आहे. माझी पत्नी माधुरी हिला निद्रानाशाचा त्रास सुरु झाला असून, सततच्या चिंतेने आमच्या दोघांचे जीवन अवघड बनले आहे. जाधव यांच्याकडून होणारी मुजोरी, न्यायालयाची दिरंगाई यामुळे आम्ही खचलो असून, आम्हाला प्राणांतिक उपोषण करण्याशिवाय अन्य पर्याय उरला नाही. त्यामुळेच आम्ही आज लाक्षणिक उपोषण करत आहोत," असे डॉ. अविनाश फाटक यांनी सांगितले.

**शाळेत प्रवेश घेऊ नये :** फाटक दाम्पत्याच्या या जागेत किडझी नर्सरी स्कुल चालू आहे. शाळा चालवणारे आतिश जाधव फाटक दाम्पत्याची फसवणूक करत आहेत. या जागेचा वाद न्यायालयात सुरु आहे. त्यामुळे पालकांनी आपल्या मुलांना इथे प्रवेश घेऊ नये. तसेच फाटक दाम्पत्याच्या पाठीशी उभे राहावे, असे आवाहन करणारी पत्रके आंदोलनकर्त्यांनी परिसरात वाटले.

# उन्हाच्या कटाविरुद्ध... छळणाऱ्या प्रश्नचिन्हाभोवती फिरणारे काव्यनाट्य

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** बिल्डरच्या होर्डिंगवरली देखणी घरे आणि त्याच होर्डिंगला टेकून उभी अंधारलेली घरे यांच्यातली भलीरूंद दरी कशी सांधावी हा प्रश्न सतत फणा काढून उभारलेला... आणि या प्रश्नचिह्नाच्या अवतीभवती जे घडते ते काव्यनाट्य म्हणजे 'उन्हाच्या कटाविरुद्ध'.



दिग्दर्शक, अभिनेते व कवी नागराज मंजुळे यांच्या कवितासंग्रहाचे हे नाट्यरूपांतर आहे. 27 मार्च रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नाट्यगृहात हे दाहक नाट्य सादर झाले. अमोल पानबुडे यांनी कवितांचे नाट्यरूपांतर करताना गोष्ट सांगता येईल अशी रचना केल्यामुळे पात्रांच्या तोंडून कविता ऐकतानाही एक सलग गोष्ट उलगडत जाते. चरण जाधव यांनी दिग्दर्शन, नेपथ्य व अभिनय अशा तीन जबाबदाऱ्यांचा ताल आणि तोल नीटपणे सावरलाय. सुरुवातीला थोडी संथ वाटणारी ही एकांकिका नंतर महामार्गावरचा वेग धारण करते आणि अचानक एका उंचीवर जाऊन थांबते. मात्र तोपर्यंत एका खुद्दार कलावंताची अनिवार अस्वस्थता प्रेक्षकांच्या रक्तात भिनलेली असते. यातील पात्रांना नेहमीच्या नाटकासारखे संवाद नाहीत. प्रत्येकाच्या तोंडी वेगवेगळ्या कविता आहेत. या कविता मुक्तछंदातल्या आहेत. एकही शब्द इकडचा तिकडे झाला की छंदाचे वजन ढासळण्याची भीती होती. मात्र सर्व पात्रांनी कवितेच्या ओळी प्राणपणाने जपत सादर केल्या. हा पहिलाच प्रयोग असल्याने सुधारणेला थोडा वाव आहेच. एक-दोन पात्रांच्या वाचिक अभिनयावर थोडेसे लक्ष दिले तर या कविता अधिक भेदक होतील.

कला दिग्दर्शक विशाल गवळी, प्रतीक लाडे, भागवत शेळके यांच्या टीमसह चरण जाधव यांनी केलेले नेपथ्य अत्यंत दिलकश. डॉ. अशोक बंडगर यांची प्रकाश योजना भारी. रंगभूषाकार जॉय, वेशभूषाकार कविता दिवेकर, संगीत संयोजक अभिनय जाधव यांच्यासह नेपथ्य साहाय्यक अश्वजित भित्रे व आदित्य इंगळे या सर्वांनीच गाळलेला घाम सादरीकरणातून दिसत होता. चरण जाधव आणि त्यांच्या टीमला पुढील सर्व प्रयोगांसाठी शुभेच्छा.

# मर्जी सांभाळली तरच परवाना नूतनीकरण

## ऊत्पादन शूल्क विभागाचा अजब कारभार

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** शहरात कार्यान्वित असलेले राज्य उत्पादन शुल्क विभागाचे कार्यालय बिलोली येथे स्थलांतरित करण्यात आले आहे.असे असले तरी "मार्चएन्ड" च्या निमित्ताने भोकरला एका वसाहतीत चक्क बिअरबार, देशी दारू दुकानाचा परवाना नूतनीकरणाचे काम केले जात आहे.अधिकृत लागणारी शासकीय शूल्क आणि "वरकमाई "घेऊन खिसा गरम केला जात आहे.

वरिष्ठानी याबाबींकडे त्वरीत लक्ष देऊन संबधीतावर कार्यवाही करावी अशी जनतेची मागणी आहे.

प्रारंभी शहरातील बिलालनगर वसाहतीत राज्य उत्पादन शुल्क विभागाचे कार्यालय कार्यान्वित होते. काही कारणांस्तव सदरील कार्यालय हे बिलोली शहरात स्थलांतर करण्यात आले. तेव्हापासून कार्यालयीन कामकाज हे बिलोली येथे सुरू आहे. शहरात असलेले वाईनशॉप, बिअर-बार आणि शासनमान्य देशी दारू दुकानदारांना शासकीय कामासाठी बिलोली गाठावी लागत आहे. सदरील विभागानी दुकानादारांना काही नियमावली लागू केली आहे. नियमाची पायमल्ली झाली तर कठोर कार्यवाही करण्याचा अधिकार त्यांना देण्यात आला आहे.केवळ उदिष्टपूर्ती नाममात्र कार्यवाही करून व्यवसायीकाना रान मोकळे केले जाते. अधूनमधून संबंधित अधिकाऱ्यांचा भोकरला शासकीय दौरा असतो पण मर्जीतल्या दूकानदाराशी "भेट " घेऊन कसलीच कार्यवाही न करता "खिसा" गरम करुन दौरा आटोपून घेतात.ग्रामीण भागात घरपोच देशीदारूचा पूरवठा केला जातो.शहरात विना परवाना देशी दारूची विक्री सुरू आहे. शासनाने दिलेल्या नियमाचे पालन केले जात नाही.

याकडे अधिकाऱ्यांचे कमालीचे दुर्लक्ष होत असल्याने व्यापाऱ्यांचे मनोबल वाढले आहे. बंदबारीत अव्वाच्यासव्वा दरात दारूची विक्री केली जात आहे.आंबटशौकीन व्यसनाची भूक भागविण्यासाठी अधिक रक्कम देऊन शौकपुरा करीत आहेत.

**शहरात कार्यालय थाटले :** भोकर शहरात मागील अनेक वर्षांपासून राज्य उत्पादन शुल्क विभागाचे कार्यालय कार्यान्वित नाही. एरवी एका खासगी व्यक्ती कडून छोटे-मोठे काम करून घेतली जातात .महिनेवारीचा "आर्थिक" व्यवहार याच व्यक्तीच्या मार्फत केला जात असल्याचे समजते. मार्चएन्ड अवघ्या दोन दिवसांवर आल्याने शासनमान्य दूकानदाराना परवाना नूतनीकरण करणे गरजेचे आहे. त्यासाठी शहरात कार्यालय थाटले आहे. शासन शूल्क सोडून "वरकमाई" केली जात आहे .शासनाच्या डोळ्यात धूळफेक करुन सदरील अधिकारी मनमानी करीत असल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

आमचे कार्यालय हे बिलोली येथे असून भोकर तालुक्याची जबाबदारी एका निरीक्षकाने दिली आहे त्याविषयी तेच माहिती देऊ शकतात. **आनंद चौधरी, कार्यालयीन अधीक्षक नांदेड**

आमचे बिलोलीत कार्यालय आहे दूकानदाराना चालन भरण्यासाठी सोयीचं व्हावे म्हणून इथे कामकाज सुरू केले आहे. **बोडेमवाड, उत्पादन शुल्क निरीक्षक, भोकर**

# पीककर्ज फेडीची मुदत वाढवून द्या! : चव्हाण

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील व सावळदबारा परिसरातील शेतकऱ्यांना यंदा शेतकरी वर्गाची मागणी देत माफी या शेतकऱ्यांना दुसऱ्या बँक पीक कर्ज छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील शेतकयांचे मुख्य, नगदी व पाढरे सोने म्हणून ओळखले जाणारे पीक कापूस आहे. यावर्षी हेच पांढरे सोने अडचणीत सापडलेले आहे. शेतकऱ्यांच्या कापसाला पुरेसा भाव नसल्यानें बहुत्येक शेतकन्यांनी कापूस अद्याप पर्यंत विक्री केलेला नाही. त्यामुळे शेतकरी आर्थिक 'अडचणीत सापडला आहे.दुसरीकडे विविध कार्यकारी सहकारी सोसायट्या कडून घेतलेल्या जिराईत पीक कर्जाची परतफेडीची मुदत ३१ मार्च पर्यंत आहे. कापूस घरात असल्याने शेतकऱ्यांच्या हातात पैसा नाही. म्हणूनच शेतकरी पीक कर्ज परतफेड करू शकत नाही. इतर मार्ग ही मार्च महिना असल्याने बंद झालेले आहेत. यासाठीचा पर्याय म्हणून महाराष्ट्र ग्रामीण,बॅंक आफ महाराष्ट्र व जिल्हा मध्यवर्ती बँकेने शेतकऱ्यांच्या जिरायती पीक कर्जाच्या परत फेडीची मुदत दि. ३० जुन पर्यंत वाढवून द्यावी अशी मागणी सोयगाव पंचायत समितीचे माजी सभापती धरमसिंग चव्हाण व अडचणीत असणाऱ्या शेतकरी वर्गातून होत आहे. अशा परिस्थितीत बँकेने पीक कर्ज परतफेडीची मुदत वाढ करून शेतकयांच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याची ही वेळ आहे.जिल्ह्यातील शेतकऱ्यांना महाराष्ट्र ग्रामीण बॅंकेचे व जिल्हा मध्यवर्ती बँक विविध कार्यकारी सहकारी सोसायट्यांच्या मार्फत जिराईत पीक कर्ज वाटप करीत असते. शेतकरी दरवर्षी पीक कर्जाची रक्कम सहा टक्के व्याजासह मार्च महिन्यात भरणा करीत असतो.

# सतर्क रिक्षाचालकाने मुद्देमालासह चोरट्याला नेले थेट ठाण्यात

## उपविभागीय पोलीस अधिकारी मुकुंद अघाव यांच्याकडून रिक्षा चालकाचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** सतर्क रिक्षा चालकाने आपली रिता थेट पोलीस ठाण्यात नेवून चोरटा चोर मुद्देमाल पोलीसांच्या ताब्यात दिला असून उपविभागीय पोलीस अधिकारी मुकुंद आघाव व पोलीस निरीक्षक तसेच पोलीस निरीक्षक भुजंग हातमोडे यांच्यासह खुलताबाद पोलीस विभागा मार्फत रिक्षाचालकाचा सत्कार करण्यात आला आहे.

या विषयी उपविभागीय पोलीस अधिकारी मुकुंद आघाव यांनी दिलेल्या माहितीनुसार खुलताबाद शहरातील कमान मोहल्ला येथील रिक्षा चालक शेख मिनाज शेख रहीम यांनी मंगळवारी रोजी सकाळी साडेसहा वाजेच्या दरम्यान आपली रिक्षा क्रमांक एमएच २० इएफ ४९०६ घेऊन दररोज प्रमाणे खुलताबाद ते वेरूळ भाडे तत्त्वावर प्रवासी वाहतूक करण्यासाठी खुलताबाद शहरातील म्हैसमाळ चौक येथे उभी केली होती. या दरम्यान चोरटा रामचंद्र साहेबराव शर्ट, रा. शादुलवाडी वेरूळ, तालूका खुलताबाद हा तेथे आला व शेख मिनाज यांची रिक्षा भाड्याने ठरवून फुलंब्री महामार्गावर असलेल्या पेट्रोल पंपासमोर घेऊन गेला. चोरलेली पाण्यातील विद्युत मोटार रिक्षा टाकून रिक्षा ही वेरूळ येथे घेऊन गेला. भाडे



देत नसल्याने रिक्षा चालकाला संशय आला. चोरटा वेरूळ येथे पोहचल्यावर रिक्षा चालकाला भाड्याचे पैसे देत नव्हता. मोटार रिक्षात ठेवून चोरटा भाडे देण्यासाठी इतरांकडून पैसे मागत होता. परंतु त्यास कोणीही पैसे देत नव्हते, यामुळे रिक्षा चालक शेख मिनाज यांना सदरील व्यक्ती चोरटा असावा असा अंदाज आला व चोरट्याला समजू न देता रिक्षा चालक मिनाज यांनी विद्युत मोटारीसह थेट खुलताबाद पोलीस ठाण्यात आणले व चोरट्यासह चोरलेली विद्युत मोटार ही पोलीसांच्या ताब्यात दिली. खुलताबाद तालुक्यातील इतर रिक्षाचालकांनी व टॅक्सी चालकांनी सावधगिरी बाळगावी यामुळे गुन्हेगारीला आळा बसेल असी माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी मुकुंद आघाव यांनी दैनिक आनंद नगरीला दिली. रामचंद्र शर्ट या चोरट्याला पोलीसांनी ताब्यात घेतल्यावर कसून चौकशी केली असता पाण्यातील विद्युत मोटार ही चोरून आणल्याची रामचंद्र याने कबुली दिली व रिक्षा चालक शेख मिनाज यांचा अंदाज खरा ठरला.

रिक्षा चालक शेख मिनाज यांनी चतुराईने मुद्देमालासह चोरट्याला थेट पोलीसठाण्यात नेवून पोलीसांच्या ताब्यात दिले यामुळे उपविभागीय पोलीस अधिकारी मुकुंद आघाव पोलीस निरीक्षक भुजंग हातमोडे यांच्या वतीने रिक्षा चालक शेख मिनाज यांचा सत्कार करण्यात आला आहे या दरम्यान पोलीस उपनिरीक्षक विजयकुमार वाघ पोलीस उपनिरीक्षक संजय बहुरे पोलीस उपनिरीक्षक जनार्दन मुरमे पोलीस हेडकॉन्स्टेबल के .जी गवळी पोलीस नाईक एसएच सदावर्ते, सुदाम साबळे, योगेश ताठे अनिल पवार, मनोज घोडके, अंकुश सरोदे, भगवानसिंग चरखंडे, प्रमोद साळवी यांची उपस्थिती होती.

# जगदीश बियाणी यांच्या रूपाने सर्वगुणसंपन्न व्यक्ती माहेश्वरी समाजाला अध्यक्ष म्हणून लाभली

## कल्याण पांडे : जगदीश बियाणी यांचा महाराष्ट्र राज्य पत्रकारसंघातर्फे जाहीर सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजी नगर :** जगदीश बियाणी यांची माहेश्वरी समाजाच्या अध्यक्षपदासाठी बिनविरोध निवड झाली आहे. यानिमित्त छत्रपती संभाजीनगरच्या महाराष्ट्र राज्य पत्रकारसंघाच्या कार्यालयात त्यांचा सत्कार दैनिक पुढारीचे युनिटहेड कल्याण पांडे यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना दैनिक आधुनिक केसरीचे संपादक डॉ. प्रभू गोरे म्हणाले... जगदीश बियाणी यांच्या रूपाने माहेश्वरी समाजाला एक अतिशय सक्षम असा अध्यक्ष लाभलेला आहे... आता महाराष्ट्र राज्य पत्रकारसंघाच्या आणि माहेश्वरी समाजाच्या संयुक्त विद्यमाने अनेक सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेतून अनेक उपक्रम राबविण्यात येतील. दैनिक पुढारीचे युनिट हेड कल्याण पांडे आपल्या भाषणात म्हणाले... जगदीश बियाणी यांच्या सारख्या उत्तुंग व्यक्तींचा सत्कार माझ्या हस्ते करण्यात येत आहे म्हणजे एका मुख्यमंत्र्यांनी पंतप्रधानाचा सत्कार केल्याची भावना माझ्या मनात येत आहे.... जगदीश बियाणी सर्व गुणसंपन्न व्यक्ती ही अध्यक्ष म्हणून माहेश्वरी समाजाला लाभली हा खऱ्या अर्थानं माहेश्वरी समाजाचा गौरवाचा भाग आहे असंच मला वाटतं... आपल्या सत्काराला उत्तर देताना जगदीश बियाणी म्हणाले... महाराष्ट्र राज्य पत्रकारसंघाच्या कार्यालयात माझा सत्कार करण्यात येतं आहे, म्हणजे माझ्या सर्व पत्रकार बांधवांनी माझ्या घरच्या मंडळींनी केलेला हा सत्कार केला आहे. त्यामुळे माझी जबाबदारी वाढली आहे असंच मला वाटतं. आपल्या महाराष्ट्र राज्य पत्रकारसंघाच्या आणि माहेश्वरी समाजाच्या संयुक्त विद्यमाने आपण भविष्यात चांगले समाजाभिमुख उपक्रम हाती घेवूयात असं मी आजच आपणास सांगतो. जगदीश बियाणी पुढे म्हणाले मी २००५ साली छत्रपती संभाजी नगरात आलो...

प्रत्येक गोष्टीचा पॉझिटिव्ह विचार करून प्रत्येक विविध क्षेत्रात वाटचाल केली त्यामुळे मला यश मिळतं गेलं. आज माझ्या महाराष्ट्र राज्य पत्रकारसंघाच्या काही अपेक्षा असतील.. माझ्या माहेश्वरी समाजाच्या काही अपेक्षा असतील त्यांची मी निश्चितच परिपूर्तता करेन हेच सांगू इच्छितो. त्यानंतर मराठवाडा साथीचे मानद संपादक केशव काळे यांनी आपल्या भाषणातून विचार मांडले. यावेळी ज्येष्ठ पत्रकार सुधीर कोर्टीकर यांनीही



फुलांचे रोपटे देऊन जगदीश बियाणी यांचा सत्कार केला आणि बियाणी यांच्या विषयी आपले विचार व्यक्त केले. महाराष्ट्र राज्य पत्रकारसंघाच्या कार्यालयात झालेल्या या सत्कार प्रसंगी भावे आणि कंपनीचे संचालक विश्वजीत भावे , दैनिक पुढारीचे अमोल कोल्हे, दैनिक मराठवाडा साथीचे मानद संपादक केशव काळे, ज्येष्ठ कलावंत सुधीर कोर्टीकर, सुभाष वानखेडे, अक्षररंगचे सुनील बियाणी, दैनिक अट्टलमतचे रसपालसिंग अट्टल, विलास शिंगी, मुकेश मुंदडा, मनोज पाटणी, संजय व्यापारी, छबुराव ताके, शुभम चव्हाण, राठोड, शाकेरभाई, सचिन उबाळे आदींची उपस्थिती होती.

# कर्म.आ.मा.पाटील महाविद्यालयात वक्तृत्व व वादविवाद स्पर्धा संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** कर्म.आ.मा. पाटील कला, वाणिज्य व विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या विविध सुप्तकलागुणांना वाव देण्यासाठी वक्तृत्व स्पर्धा व वाद-विवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रभारी प्राचार्य प्रा.के.डी.कदम हे होते. यावेळी विचार मंचावर वरिष्ठ प्राध्यापक डॉ. डब्ल्यू.बी.शिरसाट, डॉ. ए.जी. खरात, डॉ. सतीश मस्के, प्रा. एल.जे.गवळी, प्रा.व्हि.जी. उगलमुगले, प्रा.डी.बी.जाधव आदी उपस्थित होते. कर्म.आ.मा.पाटील कला, वाणिज्य व विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात "माझा बाप शेतकरी राजाः उभ्या जगाचा पोशिंदा' व 'सोशल मीडिया शाप की वरदान' या विषयावर वक्तृत्व स्पर्धा व वादविवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.
वक्तृत्व स्पर्धेत प्रथम पवन निकुम द्वितीय चेतना निकुम व तृतीय डिंपल गांगुर्डे यांनी क्रमांक मिळवला तर वादविवाद स्पर्धेत प्रथम पवन निकुम दुतीय चेतना निकुम व तृतीय दीपक सूर्यवंशी यांनी क्रमांक मिळवला. अध्यक्ष समारोप करताना प्रभारी प्राचार्य प्रा. के.डी.कदम म्हणाले की, विद्यार्थ्यांनी वक्तृत्व वादविवाद स्पर्धेतून काहीतरी बोध घेणे गरजेचे आहे. या स्पर्धेमुळे विद्यार्थ्याला मंथन करता येते. सोशल मीडियाचा वापर चांगला करायचा की वाईट करायचा हे आपल्या हातात आहे. सुखदुःखाच्या घटनाही आपल्याला मीडियाच्या माध्यमातूनच कळतात. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सतीश मस्के यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. ए.जी. खरात यांनी केले. स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रा.एल.जी.गवळी व प्रा.डी.बी.जाधव यांनी काम पाहिले. आभार प्रा. व्हि.जी. उगलमुगले यांनी मानले. कार्यक्रमाला प्राध्यापक व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.






# गटशेती प्रशिक्षणासाठी शेतकरी जळगावला रवाना; पाणी फाउंडेशनचा उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील दहा गावातील महिला व पुरुष गट शेती करण्यासाठी जळगाव जिल्ह्यात असणाऱ्या प्रशिक्षणासाठी रवाना झाले आहे. सदरील उपक्रम हा पाणी फाउंडेशनच्या माध्यमातून राबविण्यात येत आहे, अशी माहिती पाणी फाउंडेशनचे विभागीय समन्वयक प्रल्हाद आरसुळ यांनी दिली. तालुक्यातील दहा गावांतील महिला व पुरुष शेतकऱ्यांची पहिली प्रशिक्षणार्थींची बॅच आर्यन इको रिसॉर्ट, जळगाव या सेंटरवर प्रशिक्षण घेण्यासाठी सोमवारी दी.27/03/2023 रवाना झाली. तालुका कृषी मंडळ अधिकारी काकासाहेब इंगळे यांनी छत्रपती संभाजीनगर शरद जोशी विचार मंच संघटनेचे जिल्हाध्यक्ष काशिनाथ जाधव कृषी उत्पन्न बाजार समिती फुलंब्री मा.सभापती सुभाष गायकवाड प्रशिक्षणाला जाणाऱ्या गावकऱ्यांना शुभेच्छा देत बसला हिरवा झेंडा दाखवला. प्रशिक्षणाला वणेगाव,कान्हेगाव, चिंचोली नकीब, शहापूर, वावना, निधोना, नायगाव, लालवन, आडगाव बुद्रुक, बोधेगाव बुद्रुक, मारसावळी, किनगाव, पाडळी आदी गावचे प्रतिनिधी गेले आहे. तिन दिवसीय निवासी प्रशिक्षणात गट शेती, शाश्वत शेती विषमुक्त शेती जमिनीचे आरोग्य सांभाळत कमी खर्चात विद्यापीठाच्या शास्त्रज्ञ यांच्या शेतीच्या सुधारित पद्धतीचा अवलंब करून उत्पन्न वाढविण्यासाठी प्रशिक्षणात मार्गदर्शन मिळणार आहे. यावेळी पाणी फाउंडेशनचे विभागीय समन्वयक प्रल्हाद आरसुळ, तालुका समन्वयक असलम बेग यांची उपस्थिती होती.

# मंत्रालयात विष प्राशन; माणिकचंद मुनोत त्यांच्यावर गुन्हा

## या प्रकरणात पोलीस अधिकाऱ्यांचा निष्काळजीपणाचा आरोप

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** कित्येक वर्षापासून धुळे एमआयडीसीच्या वादग्रस्त जमिनी संदर्भात मयत शितल रविंद्र गादेकर यांनी पोलिसात कित्येक तक्रार केल्या आहेत परंतु तिला न्याय न मिळाल्याने सरळ मंत्रालयात विष प्राशन करून आत्महत्या केली या प्रकरणात संबंधित जे काही आरोपी आहेत व काही पोलिसांचा निष्काळजीपणामुळे झालेल्या प्रकाराची सखोल चौकशी होणार आहे.
रा.बारामती जि.पुणे यांनी त्यांचे पती रविंद्र सायन्ना गादेकर यांचे नावे धुळे एमआयडीसी मध्ये प्लॉट नं. पी -१६ हा असून अर्जदार तिचे पती सोबत व्यवसाय निमीत्ताने पुणे येथे रहात असतांना गैरअर्जदार नरेशकुमार मानकचंद मुनोत यांनी तत्कालीन एमआयडीसी अधिकारी यांचे सोबत आर्थिक संगणमत करुन बोगस व खोटी नोटरी बनवून पतीचे नावे असलेला प्लॉट जबरदस्ती भ्रष्टाचार करुन हडपला. या भ्रष्ट कामकाजामध्ये तत्कालीन एमआयडीसी धुळे येथे अधिकारी बेकायदेशीर खरेदीखत ऐवजी रुपये १०० च्या स्टॅम्पवर नोटरी करुन बेकायदेशीर आदेशाव्दारे हस्तांतरण करुन अर्जदाराची फसवणुक केली आहे.

सदर नोटरी पेपरवर तिच्या पतीचे नावे खोटया सहया करून पतीचे छायाचित्राचा गैरवापर करुन बोगस इसम उभा करुन सदर प्लॉट हस्तांतरण करुन फसवणुक केली आहे . सदरचा प्लॉट अनियमित अनाधिकृत भ्रष्ट कामकाज व बेकायदेशीर हस्तांतरण संदर्भात दोषींवर भादंवि क .४२० , ४६७ , ४६८ , ४७१ , ३४ प्रमाणे फौजदारी गुन्हा दाखल करावा व अर्जदार यांना सदरचा प्लॉट परत करावा अशी तक्रार अर्ज दि . १६/१२/२०२० रोजी प्रधान सचिव गृह विभाग , मंत्रालय मुंबई यांचे कडून चौकशीसाठी प्राप्त झालेला होता . सदर अर्जावरुन मोहाडी पोलीस स्टेशन गुरनं . ५८/२०२३ भादंवि.क . ४२०,४६७ , ४६८ , ४७१,३४ प्रमाणे आरोपी नरेशकुमार मानकचंद मुनोत , रा . धुळे तसेच एमआयडीसी येथील अधिकारी व कर्मचारी यांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर प्रकरणात सखोल तपास करुन पुढील तपासाची जिम्मेदारी स्थानिक गुन्हे शाखेचे हेमंत पाटील यांच्यावर दिले आहे व योग्य ती सखोल चौकशी करूनकागदपत्राच्या आधारे चे आरोपी निष्पन्न होतील त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात येईल अशी ही आश्वासन दिले.

# राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान अंतर्गत नादांगाव येथे शेती दिन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील नादांगाव येथे राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियान अंतर्गत सोयाबीन पिकामध्ये तूर प्रात्यक्षिक या बाब अंतर्गत शेतीदिन तालुका कृषी अधिकारी एस.जी.वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला.

शेती दिनाच्या कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदक अमोल महाजन विषय यांनी मार्गदर्शन केले.अमोल महाजन यांनी संपूर्ण पीक लागवड तंत्रज्ञान बाबत सविस्तर हंगामासाठी बियाणे लागवड पासून ते पिक काढणी पर्यंत उत्पादन खर्च कसा कमी करावा व उत्पन्न कसे वाढवावे याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. कृषी विभागाच्या विविध योजनांविषयी तसेच शाश्वत शेती करोडवाहू प्रकल्पांतर्गत ठ-क बाबत सविस्तर मार्गदर्शन कृषी सहाय्यक मानसिंग भोळे, कृषी सहाय्यक अर्जुन सुरडकर यांनी मार्गदर्शन केले तसेच तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक अमोल महाजन यांनी आत्माअंतर्गत असलेल्या विविध योजनांची व गटाविषयी सविस्तर माहिती शेतकऱ्यांना दिली. शेतकऱ्यांना प्रशिक्षण साहित्याचे वाटप करण्यात आले व अल्पोपहार देण्यात आले. सदर कार्यक्रमाकरीता सोयगाव पंचायत समितीचे माजी सभापती धरमसिंग चव्हाण, सरपंच,उपसरपंच,व बहुसंख्य शेतकरी यांचे कृषी पर्यवेक्षक हेमंत देशमुख यांनी आभार व्यक्त केले.

# पत्रकार शंकर भामेरे यांचा असाही प्रामाणिकपणा

## बँक खात्यावर आलेले ४० हजार केले परत

आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** तालुक्यातील पहूर येथे दिनांक २९/३/२०२३ रोजी येथील महात्मा फुले शिक्षण संस्था संचलित सावित्रीबाई फुले माध्यमिक शिक्षक तथा पत्रकार शंकर रंगनाथ भामेरे यांनी त्यांच्या स्टेट बँक ऑफ इंडियाच्या खात्यावर चुकून आलेले ४० हजार रुपये संबधीतास प्रामाणिकपणे परत केले.

आज भौतिक सुखाच्या मागे जग धावत असताना अनेकदा अनैतिक तथा भ्रष्टाचारी मार्गाचा अवलंब होताना दिसतो. मात्र पहूर येथील शिक्षक तथा पत्रकार शंकर रंगनाथ भामेरे यांच्या स्टेट बँक ऑफ इंडियाच्या ३५ ४४ ६८ ६० ० ३९ या खात्यावर रोहिदास बारकू पाटील, रा .कृष्ण दर्शन सोसायटी भडगाव रोड, पाचोरा यांच्या ९७६६६ ४४ ४००६ या फोन पे वरून काल दिनांक २८/३/२०२३ रात्री साडे वाजता ४०, ००० रुपये चुकून पाठवल्या गेले. याविषयी शंकर भामेरे यांनी शिक्षक मित्र हरिभाऊ राऊत, पोलीस निरीक्षक प्रतापराव इंगळे, गोपनीय विभागाचे गोपाल गायकवाड यांना माहिती दिली. आज बुधवारी (ता. २९) सकाळी साडे अकरा वाजता एसबीआय बँकेच्या एटीएम सुविधेद्वारे रोहिदास पाटील यांना शंकर भामेरे यांनी त्यांच्या खात्यावर आलेले ४० हजार रुपये प्रामाणिकपणे परत केले. यावेळी बँक व्यवस्थापक शफिक पिंजारी, ग्राहक सेवा केंद्राचे संचालक तुषार बनकर, पत्रकार प्रवीण कुमावत, सादीक शेख, अशोक बनकर, सुनिल पवार आदींची उपस्थिती होती. त्यांचे वडील तथा श्री क्षेत्र संगमेश्वर महादेव मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष पुजारी शिवभक्त रंगनाथ महाराज यांना देखील बस स्थानक परिसरात सापडलेले साडेनऊ हजारांचे पाकीट त्यांनी संबंधितास प्रामाणिकपणे परत केले होते. शंकर भामेरे यांनी खात्यावर आलेले पैसे परत करून एक आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या या प्रामाणिकपणाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.



# वैजापूर शहरात सर्वत्र श्रीराम जन्मोत्सव सोहळा उत्साहात संपन्न



आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** समस्त भारतीयांचे आराध्य दैवत असलेले श्री प्रभू रामचंद्र यांचा जन्म सोहळा येथील मार्केट यार्डमध्ये असलेल्या श्रीराम मंदिरात गुरुवार (ता. ३०)रोजी सकाळी ठीक बारा वाजता "सियावर रामचंद्र की जय" , जय श्रीराम! जय श्रीराम!!, "प्रभू रामचंद्र की जय" अशा जय घोषात शेकडो नागरिकांनी घोषणा देत झाला,त्या आधी पूजेचे मानकरी म्हणून नवं दाम्पत्य अजय सुरेश तांबे व सौ. कल्याणी अजय तांबे यांनी सपत्नीक पूजा केली. मंदिरात भक्त भाविकांची अलोट गर्दी लोटली होती, जन्मोत्सव समिती अध्यक्ष सुरेश तांबे, उपाध्यक्ष प्रफुल संचेती,सचिव सतिष कुलकर्णी, कोषाध्यक्ष माधवराव बावचे, निखिल कासलीवाल, सहसचिव संजय व्यवहारे, राजेंद्र मालपाणी, प्रकाश व्यास, महावीर जैन, अशोक शिंदे यांनी चोख व्यवस्था ठेवली होती. या समयी नगरसेवक गणेश खैरे, धोंडीरामसिंह राजपूत, मकरंद कुलकर्णी, किरण राजपूत, सीताराम व्यवहारे, संतोष पवार याच्यासहं जन्मोत्सव समितीचे सदस्य उपस्थित होते. स्वप्नील राजपूत यांच्या मडळाने पिण्याच्या पाण्याची व्यवस्था ठेवली होती. या निमित्ताने रक्तदान शिबिर ही आयोजित केले होते. छत्रपती संभाजीनगर येथील लोकमान्य ब्लड बँक गेल्या २७ वर्षे पासून रामनवमी उत्सवात रक्त संकलन करते त्यांनी ३५रक्त दात्यांचे रक्त संकलित केले. शहरातील संकट मोचन मंदिर व ईतर मंदिरात ही प्रभू श्रीराम जन्मोत्सव कार्यक्रम उत्साहात भजन करून व आरती गाऊन साजरा झाला. सायंकाळी स्वर नाद झंकार कार्यक्रम झाला. उद्या शुक्रवार रोजी श्री प्रभू रामचंद्र यांच्या पालखीची भव्य मिरवणुक शहरातून काढण्यात येणार असून त्यात आदिवासी भोवाडे, यांचे नृत्य असणार आहे. रात्री शोभेची दारू ही सोडण्यात येईल.




# श्रीकृष्ण उघडे यांना आदर्श शिक्षक पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** ISO जिल्हा परिषद उच्च प्राथमिक मराठी शाळा मल्हारा पं. स. अचलपूर येथील आदर्श शिक्षक श्रीकृष्ण उघडे सह पत्नीक यांना जिल्हा परिषद अमरावती तर्फे मुख्य कार्यकारी अधिकारी मा. अविश्यांत पंडा तसेच मान्यवर यांच्या हस्ते 2021-2022 चा आदर्श शिक्षक पुरस्कार सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. अविशान्त पंडा ( मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अमरावती ) हे होते. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. संतोष जोशी ( अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ), मा. प्रीती देशमुख( प्रकल्प संचालक ), मा. तुकाराम टेकाडे( उपमुख्य कार्यकारी अधिकारी सामान्य ), मा. चंद्रशेखर खंडारे( मुख्य लेखा व वित्त अधिकारी ), डॉ. मिलिंद कुबडे, डॉ. कैलास घोडके, मा. गिरीश धायगुडे, बी. आर. खरात ( शिक्षणाधिकारी प्रा. ), प्रफुल्ल कचवे( शिक्षणाधिकारी मा. ), प्रिया देशमुख( उपशिक्षणाधिकारी प्रा. ), अनिल कोल्हे( उपशिक्षणाधिकारी मा. ), बुद्धभूषण सोनोणे( उपशिक्षणाधिकारी प्रा. ), यांच्या उपस्थित मध्ये आदर्श शिक्षक म्हणून सन्मानित करण्यात आले. या करिता शाळेतील मुख्यध्यापिका शीला सोळंके, कल्पना चौधरी, बबिता पंडीत, रुपलाल बेठे, आदर्श शिक्षक बबलू कराळे, किरण साकरकर, रश्मी पानझाडे यांनी अभिनंदन व शुभेच्छा दिल्या.

# देव्हारी येथील जि. प.शालेय पोषण आहारापासून विद्यार्थी वंचित

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील देव्हारी येथील जिल्हा परिषदेच्या शाळांना शालेय पोषण आहार धान्याचा पुरवठा न झाल्याने काही शाळांत विद्यार्थी शालेय पोषण आहारापासून वंचित असल्याची प्राथमिक माहिती समोर आली असुन या संपुर्ण प्रकरणाला जबाबदार कोण सरकार की ठेकेदार असा प्रश्न विद्यार्थ्यासह पालकांना पडला आहे.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार वर्ग 1 ते 8 व्या वर्गापर्यंत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे नीट पोषण झाले पाहिजे या हेतूने केंद्र व राज्य शासनाच्या वतीने शालेय पोषण आहार योजना सुरू करण्यात आली. परंतु शासनाने फेब्रुवारी व मार्च महिन्यात शाळा स्तरावर तांदुळाचा पुरवता न केल्यामुळे सोयगाव तालुक्यातील बहुतेक शाळांमध्ये पोषण आहार योजना ठप्प पडली आहे. शासनाकडून तांदुळाचा पुरवता न झाल्याने अशी स्थिती थोड्याफार फरकाने पूर्ण राज्यात निर्माण झाली आहे.शालेय पोषण आहार योजने अंतर्गत सुरवातीच्या टप्प्यात विद्याथ्र्यांच्या उपस्थितीनुसार प्रत्येक महिन्याला 3 किलो तांदुळाचे तयार पाकीट दिले जात होते . तर या योजने बदल करून खिचडी शिजवून विद्यार्थ्यांच्या दुपारच्या दिल्या जात होती, यात पुरक आहार म्हणून केळी अंडी दिल्या जात होत्या , त्यात अधिक करून मध्यानाह भोजन योजना अधिक पोषक करून विविध डाळी पालेभाज्या या आहारात सुरू झाले आहे. यातून विद्यार्थ्यांना खरोखरच आहार मिळत होता. या योजनेच्या पुढील टप्प्यात तांदुळासह तूरदाळ मुंगदाळ वटाणा शासनाकडून पुरवला जाऊ लागला. यात शालेय व्यवस्थापन समिती व् मुयाध्यापकाद्वारा किंवा केंद्रीकृत किंचन योजनेअंतर्गत काही शहरी भागात कंत्राटदार नेमून एकाच ठिकाणी अन्न शिजवून त्याचे वितरण करण्याची पद्धत सुरू आहे.या सर्व प्रकारामध्ये धान्य शासनाकडूनच पुरविल्या जाते. मागील महिन्यात आवश्यक तांदळाचा पुरवठा न करता फक अर्थ तांदूळ पुरविल्या गेले. त्याआधी शासनाने प्रत्येक शाळेत किती तांदुळाचा साठा शिल्लक आहे. याची आहारापासून वंचित राहणार नाही, ऑनलाईन माहिती गोळा केली होती. तरीही पुरेसा धान्य पुरवठा शासनाकडून करण्यात आला नाही ज्या शाळेचे धान्य संपले आहे. त्या शाळेला खुल्या बाजारातून खरेदी करण्याची परवानगी नाही. त्यामुळे धान्य संपल्यानंतर विद्यार्थ्यांना पोषण आहार देणे बंद करण्याशिवाय शाळा व्यवस्थापन समिती व मुख्यध्यापका जवळ दुसरा पर्याय नसल्यामुळे ही विद्यार्थी उपयोगी न्यायालयाच्या आदेशाने सुरू झालेली योजना धान्याच्या पुरवठ्याअभावी बंद पडली आहे. या गंभीर बाबीची शासनस्तरावर तत्काळ दखल घेऊन धान्यादी साहित्याचा पुरवठा सुरू करावा, अशी मागणी पालकांकडून होत आहे.

RAHUL S. ANCHALKAR
9850500629, 9325727798
R.R. Enterprises
घर तुमचे... इंटरीयर आमचे !
आपल्या घरातील आतील संपूर्ण सजावट आम्ही करू, वेल डेकोर फर्नीचर, किचन ट्रॉलीज, सोफा, बेड सर्वकाही तुमच्या स्वप्नाप्रमाणे
Add. : N-8, Behind Onkar Gas, CIDCO, Aurangabad-431 003
E-mail : anchalkarrahul@gmail.com
Web:rrenterprises.com

# स्वमग्न मुलांचा धमाकेदार फॅशन शो

## आडोपट्टीव क्लोदिंग संकल्पनेवर मराठवाड्यातील पहिलाच शो

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** कलर्स ऑफ ऑटिझम अँण्ड ॲक्सेसेबल डीस्याबिलीटी संकल्पना घेवून जागतिक स्वमग्नता दिन अर्थात वर्ल्ड ऑटिझम डे यावर्षी साजरा होत आहे. यानिमित्ताने आरंभ सोसायटी फॉर ऑटिझम अँण्ड स्लो लर्नर चिल्ड्रनच्या वतीने जनजागृती आठवडा साजरा करण्यात येत असून या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे या सप्ताहाचा समारोप धमाल फॅशन शोने 2 एप्रिल रोजी होणार आहे अशी माहिती आरंभच्या संचालिका अंबिका टाकळकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.
२७ मार्च ते 2 एप्रिल दरम्यान सजरा होत असलेलेल्या स्वमग्नता जनजागृती आठवड्यात आतापर्यंत विविध उपक्रम राबवण्यात आले आहेत. समारोपाला होणारा भव्य फॅशन स्वमग्न तसेच दिव्यांग मुलांना वापरण्यायोग्य कपडे कसे असावेत (आडोपट्टीव क्लोदिंग) या संकल्पनेवर आधारित असणार आहे. या संकल्पनेवर आधरित हा मराठवाड्यातील पहिलाच फॅशन शो असून शासकीय तंत्रनिकेतनच्या ड्रेस डिझायनिंग आणि गारमेंट मेकिंग विभागाचे २३ विद्यार्थी स्वमग्न मुलांसाठी कपडे तयार करतील आणि त्यांच्या बरोबर धमाकेदार रॅम्प वॉकही करतील. फॅशन शो नंतर तयार केलेले कपडे तंत्रनिकेतनचे विद्यार्थी त्या त्या मुलाला डोनेट करणार आहेत. एक महिन्यापासून तंत्रनिकेतनचे विद्यार्थी आरंभच्या विशेष मुलांबरोबर त्यांना समजावून घेत काम करत आहेत. मागील दोन आठवड्यापासून आरंभ'ची मुले रॅम्प वॉकचा सराव करत आहेत. गुरुकुल शाळेच्या मैदानावर 2 एप्रिलला संध्याकाळी 5 वाजता गुरुकुल ऑलम्पियाड स्कूल, शहानुरवाडी येथे हा फॅशन शो होणार आहे. संपूर्ण कार्यक्रम यशवी करण्यासाठी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आरंभचे डान्स थेरीपिस्ट चेतन पाटील ,आनंद पोळ, गोपाल देशमुख,विजयश्री जाईबहार, अश्विनी वांढेकर, शोएब शेख, किशोर गायकवाड, किरण जोशी, सिद्धेश रेवणकर, रेखा मोरे, चंद्रकला मिसाळ परिश्रम घेत आहेत अशी माहिती अंबिका टाकळकर यांनी दिली.

**'यलो' चित्रपट फेम गौरी गाडगीळची उपस्थिती** : फॅशन शोसाठी 'यलो' चित्रपट फेम तसेच दिव्यांग असूनही बीजिंग स्पेशल ऑलम्पिक मध्ये जलतरणात रजतपदक आणि अभिनयासाठी राष्ट्रीय पुरस्कार विजेती गौरी गाडगीळची उपस्थिती राहणार आहे . यावेळी त्या आपला यशस्वी प्रवास उलगडणार आहेत . **आडोपट्टीव क्लोदिंग म्हणजे म्हणजे काय ?** : स्वमग्न मुलांना अनेक सेन्सरी प्रोब्लेम अर्थात पंचेन्द्रीयाशी संबधित अडचणी असतात . त्यातील एक म्हणजे स्पर्शासबंधित अडचण . काही मुलांना मऊ तर काहींना खरखरीत स्पर्श चालत नाहीत . त्यामुळे स्वमग्न मुलांना कपडे आणताना खूप विचार करून आणावे लागतात . सोबतच त्यांची कारक कौशल्ये विकसित झालेली नसल्याने त्यांना बटन लावणे, झिप ओढणे, अशा साध्या क्रियाही करता येत नाहीत . कपड्याचा स्पर्श, कपडे त्यांना स्वताच्या हाताने सहज घालता यावेत अशा पद्धतीचे कपडे म्हणजे आडोपट्टीव क्लोदिंग . ही संकल्पना विविध प्रकारचे दिव्यांग, शस्त्रक्रिया झालेले रुग्ण, अंथरुणाला खिळलेले वयोवृद्ध यांच्या संदर्भातही वापरली जाते .

# ग्राहक संरक्षण समितीच्या तालुकाध्यक्षपदी पंजाबी

आधुनिक केसरी न्यूज



**वैजापूर :** तालुक्यातील अमिताभ गुरुबच्चन पंजाबी (साईनाथ कॉलनी) यांची वैजापूर तालुका ग्राहक संरक्षण समितीच्या तालुकाध्यक्ष पदी निवड करण्यात आली आहे. ग्राहक संरक्षण समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष दादाभाऊ केदारे, राष्ट्रीय सचिव हर्षद गायधनी व राज्य अध्यक्ष मंगेश मोहिते यांनी अमिताभ यांना नियुक्तीचे पत्र दिले. ग्राहकांचे संरक्षण अबाधित ठेवण्यासाठी व जागो ग्राहक जागो या संज्ञेचा सर्वत्र प्रचार व प्रसार करण्यासाठी जिल्हा, तालुका, वार्ड व गाव स्तरावर शाखा निर्माण करुन जिज्ञासू व कायदेशीर बाबींची माहिती असणाऱ्या पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याचे निर्देश या पत्रात दिले आहेत. ग्राहक संरक्षण समितीच्या तालुकाध्यक्ष पदी निवड झाल्याबद्दल माजी नगराध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी, बाळासाहेब संचेती व प्रा. जवाहर कोठारी यांनी अमिताभ यांचे अभिनंदन केले.

# लम्पिची मदत कागदावरच, पशुपालक हवालदिल

आधुनिक केसरी न्यूज



**सुलतानपुर :** खुलताबाद तालुक्यात जवळपास ७० पशुधन लम्पी चर्मरोगाने रोगाने दगावले असले तरी पशुधनांची नुकसान भरपाई अद्याप पशुपालकांना देण्यात आलेली नाही. मृत पशुधन पडताळणी आव्हाल पूर्ण होऊनही शेतकऱ्यांवर भरपाईसाठी वाट पाहणेच नशिबी आले आहे.मागील काही महिन्यात पशुधनावर आलेल्या लम्पी रोगाने तालुक्यातील७०जनावरे दगावली आहेत. त्यामुळे पशुपालकांचे मोठे आर्थिक नुकसान झालेआहे,लम्पी आजाराने दगावलेल्या जनावरांच्या पशु पालकांना ताबडतोब आर्थिक मदत देण्याची घोषणा राज्य सरकारने केली खरी, परंतु पाच ते सहा महिने उलटुन गेले असले तरी, प्रत्यक्षात मात्र शेतकऱ्यांना कुठलीही मदत मिळाली नाही. ही मदत मिळावी यासाठी पायपीट करावी लागत आहे. मदत देण्याचा सरकार ला विसर पडला कि काय असा प्रश्न पशुपालकांना पडला आहे,आधी झालेल्या ओल्या दुष्काळाणे शेतकरी त्रस्त झाला होता त्यात घरातले पशुधनही लम्पीने दगावल्याने शेतकऱ्यांना दुहेरी फटका बसला आहे. मात्र, शेतकऱ्यांना भरपाई मिळण्यास वेळ लागत आहे.
तालुक्यातील ७० पशुधन लम्पी चर्मरोगाने दगावले आहेत. ५६ जणांचे अर्थ सहाय्य मंजुरी मिळाली असुन सात प्रस्ताव प्रलंबित आहे सात प्रस्ताव शासनाच्या आदेशानुसार मंजूर आहे.
जनावरांना जाहीर केलेली मदत दुभती गाय : ३० हजार रुपये भाकड गाय आणि बैल : २५ हजार वासरू : १६ हजार
लम्पीपासून पशुधनाला वाचवण्यासाठी आणि त्यांच्या उपचारावर शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात खर्च केला आहे. ओल्या दुष्काळामुळे शेतकऱ्यांच्या हातात पैसा नाही. लम्पी आजाराने दगावलेल्या पशुधनाच्या पालकांना तातडीने त्यांच्या खात्यात पैसे जमा करावेत. अशी मागणी पशु पालकांनी केली आहे.

# डोमेगाव येथील सविता शेळके यांना महात्मा फुले समाजरत्न पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज



**अंबड :** तालुक्यातील डोमेगाव येथील सविता शेळके यांना श्री संत शिरोमणी सावता माळी सेवाभावी संस्था व महात्मा फुले ब्रिगेड महाराष्ट्र च्या वतीने महात्मा फुले जयंती निमित्त महात्मा फुले समाजरत्न पुरस्कार दि.09 एप्रिल रोजी सकाळी 11 वाजता देण्यात येणार असल्याची माहिती प्रदेशाध्यक्ष दत्तात्रय किसनराव चांबारगे (माळी) यांनी दिली आहे.
अंबड तालुक्यातील डोमेगाव येथील सविता शेळके यांचे सामाजिक योगदान क्रांतिसुर्य महात्मा जोतीराव फुले यांना अभिप्रेत असलेले समाजकार्य आहे. तसेच त्यांनी महात्मा जोतीराव फुले यांच्या विचारक्रांतीची ज्योत तेवत ठेवण्यात आपले अमूल्य योगदान दिले आहे.
या कार्यामुळे श्री संत शिरोमणी सावता माळी सेवाभावी संस्था व महात्मा फुले ब्रिगेड महाराष्ट्र च्या वतीने महात्मा फुले जयंती निमित्त आपणास राज्यस्तरीय "महात्मा फुले समाजरत्न पुरस्कार" दि.09 एप्रिल 2023 रोजी सकाळी 11 वाजता पुरस्कार वितरण सोहळा व दुपारी 03 वा. महात्मा फुले ब्रिगेड महाराष्ट्र राज्य पदाधिकारी मेळावा विश्व पॅलेस मंगल कार्यालय,डी मार्ट जवळ,रिंग रोड लातूर येथे विविध मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात येणार आहे.

# महावितरणची कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** वीजबिल थकबाकीचा भरणा होत नसल्याने महावितरणकडून सर्व वर्गवारीतील थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित करण्याची कारवाई सुरू करण्यात आली आहे. गेल्या दीड महिन्याच्या कालावधीत औरंगाबाद परिमंडलातील 9 हजार 71 थकबाकीदारांचा वीजपुरवठा महावितरणकडून खंडित करण्यात आला. थकीत वीजबिलापोटी वीजपुरवठा खंडित करणे व खंडित केलेल्या वीजजोडण्यांची तपासणी करण्यासाठी महावितरणचे सर्व अभियंता, अधिकारी, कर्मचारी सध्या 'ऑन फिल्ड' आहेत. एका महिन्याचे वीजबिल थकीत असले तरी बिलाची रक्कम किती आहे हे न पाहता नियमानुसार वीजपुरवठा खंडित करण्याची कारवाई सुरू आहे. त्यामुळे चालू वीजबिलांचा भरणा करून सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# फुले-आंबेडकरी चळवळीत बुद्धप्रिय कबीरांची पोकळी जाणवते : मिलींद दाभाडे

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** प्रतिगामी शक्तीने डोके वर काढले आहे, अशा स्थितीत लढवय्ये कार्यकर्ते हवे असतात. पण बुद्धप्रिय कबीर यांच्या निधनामुळे फुले-आंबेडकरी चळवळीत मोठी पोकळी निर्माण झाली आहे. असे मत मनपाचे माजी विरोधी पक्षनेते मिलिंद दाभाडे यांनी व्यक्त केले आहे.
सामाजिक कार्यकर्ते कबीर यांच्या 3 र्या स्मृतीदिनानिमित्त शनिवारी (२५ मार्च) बुद्ध लेणी येथे अभिवादन सभेचे आयोजन केले होते. त्यावेळी ते बोलत होते.अध्यक्षस्थानी ॲड. अभय टाकसाळ होते. दाभाडे म्हणाले, ' बुद्धप्रियने निष्ठावान, प्रामाणिक, धडाडीचा आणि पूर्णवेळ कार्यकर्ता कसा असतो, याचा आदर्श समाजासमोर ठेवला. आज असे कार्यकर्ते भेटणे दुरापास्त झाले आहे. सार्वजनिक जीवनात वावरणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्याने कबीरपासून धडा घेतला पाहिजे. विद्यार्थी चळवळीत त्यांनी प्रचंड योगदान दिले आहे. नागसेन वन बचाव आंदोलन त्यांनी हाती घेतले होते. आता त्यांच्या स्मरणार्थ पीईएसचे डॉ. आंबेडकर लॉ कॉलेज ते जुबली पार्कच्या रस्त्याला नाव दिले जाईल. मनपाच्या पहिल्याच सर्वसाधारण सभेत तसा ठराव मंजूर करून घेतला जाईल. त्यांच्या नावाने पूर्णवेळ कार्यकर्त्याला दरवर्षी एक पुरस्कार दिला जाईल.' असेही त्यांनी यावेळी जाहीर केले. टाकसाळ म्हणाले, ' लोकशाहीचा गळा घोटला जात आहे. राहुल गांधी यांच्या खासदारकी रद्द केल्याच्या निषेधार्थ सर्व विरोधी पक्ष एकत्र आले आहेत.


गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in


# राफिया व सलिहाचा पहिला रोजा पूर्ण

आधुनिक केसरी न्यूज



**जिंतूर :** शहरातील मौलाना आजाद कालुनी परिसरातील रहिवासी रईसखा फैज मोहम्मद खान पठाण यांची मुलगी रफिया वय १० वर्ष व सलिहा वय 08 वर्ष या दोन्ही चिमुकल्यांनी पवित्र रमजान महिन्याचे औचित्य साधून आपल्या आयुष्यातील पहिला रोजा पूर्ण केला. पवित्र रमजान महिन्यातील रोजेला खूप महत्त्व आहे. या महिन्यात मुस्लिम समाज बांधव सलग 30 दिवस रोजे ठेवून तसेच विविध धार्मिक विधीद्वारे अल्लाह ची संपूर्ण निष्ठेने आराधना नमाज पठण करतात या दोन्ही मुलींनी आपल्या जीवनातील रोजाची सुरुवात केली. याच मुकल्याने उन्हाची परवा न करता आपला रोजा पूर्ण केला म्हणून त्यांचे आजी मैमुन्नीसा बेगम फैज मोहम्मद (नगरसेवक) वडील रईस खान काका टीका खान, रियाज खान उर्फ बाबा, बासू खान, मोहसीन खान, सिराज सिद्दिकी आदींनी कौतुक व अभिनंदन केले आहे.

# भय इथले संपत नाही....

## || मंथनाचे पैलू ||





डॉ. धोंडोपंत मानवतकर
संपर्क क्र. 9890827414

लेखांक : ११

"भय इथले संपत नाही" कवी ग्रेस यांच्या कवितेची ही एकच ओळ भूत, भविष्य आणि वर्तमानाचे भाकित करते. म्हणूनच कवी किंवा कलावंत हा काळाचा भाष्यकार असतो.


२६ मार्च रोजी कवी ग्रेस यांचा स्मृतीदिन होता. कवी ग्रेस हे माझे अत्यंत आवडते कवी, ललितलेखक. कवी ग्रेस यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन करून "भय इथले संपत नाही" ह्या एकाच काव्यपंक्तीच्या आधाराने मी वर्तमानातील वास्तवाचा समाचार घेणार आहे. म्हणजे तुमच्या माझ्या सगळ्यांच्याच मनात जे खदखदतंय तेच मांडणार आहे.. मित्रांनो इथले सगळे जीव परपोषी आहेत. परपोषी म्हणजे इतरांवर जगणारे. तो निसर्गाचा नियमच आहे. कधी एकमेकांच्या आधाराने जगतात, तर कधी एकमेकांना मारून जगतात. ही निसर्गाने निर्माण केलेली जीवशृंखला आहे. मोठे जीव लहान जीवांना खाऊन जगतात, तर लहान जीव त्यांच्याहून लहान जीवांना मारून खाऊन जगतात. माणूस असा एकच जीव आहे जो अनेक पशु, पक्षी, फळे झाडपाला खाऊन जगतो... परंतु त्याला माणसाला खाऊन जगता येत नाही, म्हणून तो माणसाचं शोषण करून जगतो..शोषण करण्यासाठी तो अत्यंत खालच्या स्तराला जात असतो.. त्याने गरजवंतांचे, दुर्बलांचे शोषण करण्याचे वेगवेगळे मार्ग तयार केलेले आहेत..त्यालाच तो मानवी संस्कृती म्हणतो, म्हणत आला आहे. माणसाने जंगली जनावरांपासून सुरक्षित राहण्यासाठी स्वतःचा समुह तयार केला, जाती तयार केल्या, धर्म तयार केले, गावे, शहरे तयार केली आणि तो जंगली जनावरांपासून सुरक्षित झाला. तो सुरक्षित झाला खरा; परंतु नंतर त्याला सिमेंटच्या जंगलातल्या प्राण्यांचीच भीती वाटू लागली..त्याने इतर प्राण्यांपासून स्वतःचे रक्षण केले; परंतु त्याला माणसाचीच भीती वाटू लागली आहे आणि आता फक्त माणूसच माणसाला भिऊ लागलाय..!

खरं सांगायचं तर कोणताही प्राणी कितीही छोटा असो किंवा कितीही शक्तीशाली असो तो आतून भित्राच असतो. एक तर तो आपल्या बरोबरीचा असला किंवा आपल्यापेक्षा लहान असला तर प्रतिकार करत असतो किंवा या भयापोटी तो कोणाचा तरी आसरा किंवा आधार शोधत असतो... भीती वाटली की, त्याला जवळची व्यक्ती आठवते... बालपणी बाळाला भीती वाटली की,त्याला लगेच त्याची आई आठवते आणि ते आईच्या कुशीत जाऊन शिरते किंवा तिच्या पदराआड लपते.

कवी ग्रेस यांच्या कवितेच्या ओळीसुद्धा तेच सांगतात...

**"भय इथले संपत नाही, मज तुझी आठवण येते."** **हे आई मी कितीही मोठा झालो तरी मला तुझीच आठवण येते. मला भीती वाटली की, मी तुझ्या कुशीत शिरायचो.! तेव्हा माझी भीती जायची;**

परंतु हे आई "इथले भय अजून संपत नाही, ते कायम आहे, कायम राहणार आहे म्हणून मला तुझीच आठवण येते... मी मोठा झालो तरी तुझीच आठवण येते. तू या जगात नाहीस हे मला माहितच आहे.. तरीही कशाचीही भीती वाटो, मला तुझी आठवण येते. ग्रेस यांच्या बहुतांश कवितांमध्ये आईच आहे..ती आपण समजून घेतली पाहिजे.



कवी ग्रेस यांची ही रचना अंतर्मुख करणारी आहे.. ग्रेस यांची कविता ज्यांना समजली नाही त्यांनी ती दुर्बोध ठरवली. कविता कधीच दुर्बोध नसते. त्यासाठी कविची मनोभूमिका समजून घ्यावी लागते. ज्याला कविच्या मनोभूमीत शिरून खोल तळाशी जाऊन कवितेच्या आशयाचा तळ शोधता येतो तो कवितेला कधीच दुर्बोध म्हणत नाही. परंतु दुर्दैवाने अनेकांना कवी ग्रेस यांच्या कवितेच्या आशयाचा तळ शोधता आला नाही म्हणून ते त्यांच्या कवितेला दुर्बोध म्हणून मोकळे झाले. कोल्ह्याने ठरवलेल्या आंबट द्राक्षासारखे..! जसे एखाद्या माणसाने मौन धारण केले तर त्याच्या मनात सुरू असणाऱ्या विचारांचा थांगपत्ताच लागणार नाही. तसंच एखाद्या कवीला जे सांगावयाचे आहे तो त्यांच्या मनातले अंतर्द्वद्व शब्दात मांडतो; मात्र कविच्या अंतर्द्वद्वाचा विषय आणि आशय तो सर्वसामान्यांना कधीच कळणार नाही.. ती कविची प्रतिभा असते...म्हणतात ना " जेथे न जाय रवि, तेथे जाय कवी" म्हणजे जिथे सूर्याची किरणे पोहचत नाहीत म्हणजेच ज्या ज्या घटना आणि घटकांकडे इथल्या व्यवस्थेचे दुर्लक्ष झाले आहे. त्या दुर्लक्षित घटकांना आणि घटनांना आपल्या साहित्यात, कवितेत कवी मांडत असतो. ते मांडण्यासाठी स्वतःशी प्रामाणिक असावं लागतं आणि कवी आपल्या भूमिकेशी प्रामाणिक असतो, तो आपल्या भूमिकेवर ठाम असतो.

कवी अशाच दुर्लक्षित समुहाचा, दुर्लक्षित कृत्याचा शोध घेत असतो समाजाशी त्याची नाळ अखंड जुळलेली असते..कारण तोही या समाजव्यवस्थेचा एक घटक असतो. त्यालाही हा समाज भलंबुरं समजत असतो. या समाजव्यवस्थेचा त्यालाही त्रास होत असतो..म्हणून त्यालाही इथल्या समाजव्यवस्थेचा घटक असणाऱ्या माणसांबद्दल आपुलकी, जिव्हाळा असणे किंवा माणसाचा कळवळा येणे साहजिक आहे. यावरील संत तुकाराम महाराजांचा अभंग,

**" बुडती हे जन | न देखवे डोळा || म्हणोनि कळवळा | येत असे ||**

संत तुकाराम महाराज म्हणतात हा जनसमुदाय खोट्या गोष्टींच्या आहारी जात आहे. ही खोटारडी व्यवस्था समाजाचे शोषण करण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारे तिला वेठीस धरते, बळी पाडते, बळी पाडून शोषण करते. या वेठीस धरणाऱ्या, शोषण करणाऱ्या विकृत व्यवस्थेपासून भोळ्याभाबड्या जनतेने दूर रहावे, नाहीतर समाजाचे खूप मोठे नुकसान होईल.. यामुळेच संत तुकाराम महाराजांना या भोळ्याभाबड्या समाजाचा कळवळा येतो. सत्तेचे स्वार्थी असणारे लोक कोणत्या ना कोणत्या परिने समाजाला लुबाडतात, लुबाडणार आहेत आणि लुबाडतच राहणार आहेत . म्हणून या हिंस्त्र लुबाडणाऱ्या लोकांची प्रत्येकाला भीती वाटते, भीती आहे, ही भीती कायमच राहणार आहे म्हणून कवी ग्रेस यांच्या कवितेच्या ओळीही तेच सूचवतात की, या लुटारू, लुबाडणाऱ्या हिंस्त्र ठगांची मलाच काय प्रत्येकाला भीती वाटते, भीती आहे, आणि जोपर्यंत इथे या विकृत ठगांची जमात असणार आहे.. तोपर्यंत या पृथ्वीवरचे भय संपणार नाही. व्यवस्थतेल्या सत्ताधारी ठगांची संख्या थोडी असली तरी ती बलवान आहे, धनवान आहे किंवा त्या व्यवस्थेच्या हातात सत्तेचं शस्त्र आहे म्हणून मी या व्यवस्थेला प्रतिकार करू शकत नाही, हा दुर्बल समाजही प्रतिकार करू शकत नाही. माझी आणि इथल्या एकुणच दुर्बल समाजाची अवस्था लहान बाळासारखी झालेली आहे...म्हणून कविला आईची आठवण येते..आणि कवी म्हणतो "भय इथले संपत नाही, मज तुझी आठवण येते."

आई मला इथल्या विकृतीची, विकृत व्यवस्थेची भीती वाटते. विकृत माणसांची भीती वाटते...मी या विकृत व्यवस्थेचा बळी होतोय. विकृत माणसांचा बळी होतोय. ही विकृत माणसे माझा बळी घेतील की, काय! याची भीती वाटते.

कवीला भीती वाटली की, कवीला आई आठवते म्हणजे माय आठवते....आपण तर सरकारलाच मायबाप म्हणतो .." अहो सरकार तुम्हीच आमचे मायबाप !" म्हणजे आमचे मायबाप कोण तर राज्य चालविणारे सरकार आणि आता तर हे मायबापच लेकरांना वेगवेगळ्या प्रकारची भीती घालत असतात किंवा भीती घालून वेगवेगळ्याप्रकारे शोषण करत असतात. तर मग ह्या लेकरांनी कुणाचा आधार घ्यावा ? कुणाचा सहारा करावा.? कुणाच्या आसऱ्याला जावं, कुणाला जवळ करावं ? कुणाची आठवण काढावी..?

अलिकडच्या काळात तर कमालीच्या महागाईसह अनेक समस्यांनी जीवन जगणंच मुस्किल करून टाकलंय. सगळ्या जनतेचं वागण्या, बोलण्याचं, जगण्याचं स्वातंत्र्यच हिरावून घेतलंय, सुखाची तर आता कल्पनासुद्धा करता येणार नाही. सुखापेक्षा आहे त्या परिस्थितीत जीवन कसं जगता येईल? याचाच प्रत्येकजण विचार करतोय.! त्याच तंद्रीत जगतोय..! अनेकांच्या मनात अनेक प्रश्नांचे तांडव सुरू असते. अनेक समस्यांचे मोहोळ माथ्यावर घेऊन आम्ही फिरत असतो. कुणाजवळ मांडायचे आमचे प्रश्न..? ही व्यवस्थाच आमच्या बाजुने नसेल, तर आम्ही या व्यवस्थेला आमची कसं म्हणणार..? आता जर रक्षण करणाऱ्यांपासूनच भीती वाटू लागली...तर इथले भय कधी संपेल ? की, संपणारच नाही ?

**लेखक सामाजिक, साहित्यिक, सांस्कृतिक चळवळीचे अभ्यासक आहेत.**





## भीमराव सरवदे यांना राजा ढाले राष्ट्रीय पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** शाहू-फुले-पेरियार-आंबेडकरवादी साहित्याचे अभ्यासक भीमराव सरवदे यांना नुकताच जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळ नागपूर यांचे वतीने त्यांच्या पेरियार रामासामी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या ग्रंथास राजा ढाले राष्ट्रीय पुरस्कार देऊन सन्मानीत करण्यात आले आहे. हा सोहळा २६ मार्च रोजी विदर्भ हिंदी साहित्य संमेलन, मधुरम सभागृह, नागपूर येथे संपन्न झाला हा पुरस्कार ८९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष व प्रख्यात साहित्यिक डॉ. प्रा. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. याप्रसंगी महामंडळाचे अध्यक्ष डॉ. प्रा. दीपककुमार खोब्रागडे, डॉ. के.पी. वासनिक, दिल्ली , डॉ. अनिल सुर्या, दिल्ली, मल्लेश चौगुले, बेळगाव, डॉ. जगन कराडे, कोल्हापूर, डॉ. रविंद्र तिरपुडे व सुजित मुरमाडे आदी मान्यवर विचार पिठावर उपस्थित होते. भीमराव सरवदे यांनी आजपर्यंत फुले शाहू पेरियार आंबेडकरी विचारांना बांधिलकी मानून तेरा ग्रंथांचे लिखाण केलेले आहे. त्यांच्या या साहित्य सेवेची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. या निमित्ताने अनेक मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | अॅल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

# पैठण शहरात रामनवमीनिमित्त मिरवणुकीचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** शहरात रामनवमीचा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळी खंडोबा चौकातून निघालेल्या भव्य श्रीरामाच्या मुर्ती सह हनुमानाच्या सजीव देखाव्याने मिरवणुकीत लक्ष वेधले तसेच या मिरवणुकीत मोठ्या संख्येने रामभक्त सहभागी झाले होते. पैठण शहरात अलिकडच्या काळात रामनवमीचा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जात आहे. त्याशिवाय बुधवारी रात्री अनेक युवकांनी वेगवेगळ्या भागातून दुचाकीवर मिरवणुका काढून रामनामाचा गजर केला. पैठण शहरात होणाऱ्या मिरवणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी मोठा बंदोबस्त तैनात केला होता.

सकाळी शहरातल्या मुख्य चौकातून निघालेली ही मिरवणूक प्राचीन राममंदिरात विसर्जित झाली. यावेळी पैठण तालुका सार्वजनिक रामनवमी उत्सव समितीच्या पदाधिकार व सर्व पक्षीय पदाधिकारी व रामभक्ताची मोठी उपस्थिती होती. मिरवणुकी दरम्यान वेगवेगळ्या मित्रमंडळामार्फत पिण्याचे पाणी, अन्नदान तसेच शितपेयांची व्यवस्था करण्यात आली होती.

यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.विशाल नेहुल यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक लक्ष्मण केंद्रे यानी चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता.





# वडोद बाजार येथे क्षयरोग दिन साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**वडोद बाजार :** फुलंब्री तालुक्यातील वडोद बाजार येथे 24 मार्च रोजी जागतिक क्षयरोग दिन साजरा करण्यात आला यावेळी वडोदबाजार येथील सरस्वती भुवन प्रशालेच्या विद्यार्थ्यांचे प्रभात फेरी काढण्यात आली त्यात शेरोगाबद्दल जनजागृती करण्यात आली त्यासाठी जिल्हा क्षयरोग केंद्र औरंगाबाद येथील कलापथक डॉक्टर सतपाल बाबा हिंदुस्तानी फुलंब्रीकर आरोग्य जनजागृती मनोरंजन कला मंच कलावंतांनी क्षयरोग बद्दल जनजागृती केली त्यांच्यासोबत त्यांचे सहकारी सुमेध निकाळजे ढोलकी फोटो योगेश वादळे व धनंजय शिंदे यांनी या कलाकारांनी सहभाग घेतला माननीय पंतप्रधान यांच्या संकल्पनेतून वर्ष 2025 पर्यंत भारत शेरो मुक्त करण्याचा निर्धार करण्यात आला यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉक्टर श्रीमती आशा काथार यांनी मार्गदर्शन केले यावेळी सरपंच बाकीच्या पठाण उपसरपंच गोपाळ वाघ तालुका पर्यवेक्षक दिपाली डोळे वरिष्ठ औषध निर्माण अधिकारी जमील शेख चव्हाण आर आर नगरे स्वप्निल घायवट एचए दीपक वाडेकर हरकळ अमोल दयाळू दिवसाने अर्जुन बारबोले कांबळे सिस्टर आशा कार्यकर्त्या श्रीमती सुनिता भारुडे कमल बनसोडे तसेच सरस्वती भुवन विद्यालय येथील पाटील पाचपुते कचमोरे श्रीमती देशमुख श्रीमती भामरे श्रीमती जाफरी यांनी सक्रिय सहभाग कार्यक्रम यशस्वी केला मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना डॉक्टर अभय धानोरकर जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा माता बालक संघ पण श्रीमती रेखा भंडारी डॉक्टर कल्याणकर जिल्हा शहर अधिकारी डॉक्टर श्री विलास विखे पाटील तालुका आरोग्य अधिकारी डॉक्टर प्रसन्न वाले यांच्या मार्गदर्शनाखाली क्षयरोग दिन साजरा करण्यात आला.

# इंडियन आयडॉल अंजली, नंदिनीच्या गायनाने वैजापूरकर मंत्रमुग्ध

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** इंडियन आयडल फेम अंजली गायकवाड आणि संगीत सम्राट विजेती नंदिनी गायकवाड यांनी भजनसंध्या कार्यक्रम प्रसंगी केलेल्या गायनाने वैजापुरकर मंत्रमुग्ध झाले-

ज्ञानेश संगीत विद्यालयाच्या नवव्या वर्धापन दिनानिमीत्त आयोजित 'वैजापूर संगीत महोत्सव-२०२३ चे आयोजन शहरातील पंडीत नगर परिसरात करण्यात आले होते. प्रथमतः गुरुवर्य प्रभाकर जी महाराज चन्ने व सच्चीतानंद फुलसरे यांच्या गुरुपुजनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली त्यानंतर सामाजिक कार्याबद्दल वैद्यकिय क्षेत्रात कार्यरत असलेले डॉ. धनंजय महाडिक, व डॉ. सुधाकर मापारी यांना डॉ. नितेश शहा, व्यापारी महासंघाचे अध्यक्ष प्रकाशचंदजी बोथरा, ह.भ.प. पुरुषोत्तम महाराज पवार यांसह मान्यवरांच्या उपस्थितीत आदर्श सेवा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. त्यानंतर संगीत सम्राट विजेती नंदिनी गायकवाड व इंडियन आयडल फेम अंजली गायकवाड यांच्या भजन संध्येचा कार्यक्रम संपन्न झाला.

यावेळी सुमधुर आवाजात गायलेल्या भजन, अभंग, गौळणी यामुळे उपस्थित वैजापुरकर मंत्रमुग्ध झाले. तर दुसर्या दिवशी ज्ञानेश संगीत विद्यालयातील विद्यार्थ्यांचे गायन, वादन संपन्न झाले याप्रसंगी बाल कलाकारांनी गायलेले अभंग, गौळणी, पोवाडे तसेच केलेले वादन यामुळे उपस्थितांमध्ये भक्तीमय वातावरण बघायला मिळाले. त्याचप्रमाणे बालकलाकार श्रीस्वर निकम याच्या गायनाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. याप्रसंगी ज्ञानेश संगीत विद्यालयाचे संचालक तुकाराम गायके व मंगेश निकम यांनी कार्यक्रम यशस्वीततेसाठी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन हेमलता खैरनार, निवृत्ती काळे यांनी केले तर आभार अनिल शहाने यांनी मानले. कार्यक्रमास वैजापुर शहर व ग्रामीण भागातील संगीत प्रेमींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.





# एस.एम.एस. अकॅडमीत निरोप समारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**घनसावंगी :** कुंभारपिंपळगाव येथील सदगुरु मॅथ्स ऍन्ड सायन्स अकॅडमीच्या १० वीच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून डॉ.रितिका खरात, प्रमुख मार्गदर्शक विनोद भगत, प्रमुख पाहुणे प्रदीप धनवडे,उमेश काजळे तसेच अध्यक्षस्थानी राम राऊत हे होते.

उद्घाटक रितिका खरात यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना मोबाईलच्या अतिवापराच्या व्यसनापासून दूर व्हा असा महत्वाचा संदेश दिला.त्याच बरोबर त्यांनी 10 वि नंतर करियर कसे करावे व अभ्यासातून यश संपादन करण्यासाठी सातत्याची गरज असते, असा मोलाचा सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. तसेच प्रमुख मार्गदर्शक विनोद भगत यांनी विद्यार्थीही शिक्षकाला घडवत असतात, अताची पिढी ही आधीच्या पिढी पेक्षा दोन पाऊल पुढे आहे असे प्रतिपादन त्यांनी केले. स्वतः च्या ज्ञानावर भरवसा ठेवा, यश तुमचेच आहे,असा मोलाचा सल्ला दिला. तसेच विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी सर्व मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या. तसेच शहरातील माऊली लॅबोरेटरी च्या वतीने विद्यार्थ्यां ची हिमोग्लोबिन व रक्त गट तपासणी करण्यात आली, लॅबोरेटरी चे संचालक प्रदीप धनवडे यांच्या मार्गदर्शनाखाली रक्त गट तपासणी अगदी उत्साहात पार पडली. यावेळी दिव्या अरगडे, दिक्षा कंटुले,साक्षी पाटमासे,संघमित्रा शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सई कंटुले, अंजली कोकाटे यांनी केले, सानिया सय्यद व सदिया शेख यांनी स्वागत गीत घेतले तर प्रस्ताविक विक्रम राऊत व आभार दिव्या जाधव आणि अध्यक्षीय समारोप अकॅडमीचे संचालक राम राऊत यांनी केले. अशोक काळे,शिवाजी कंटुले,अप्पासाहेब कंटुले, किशोर शिंदे, अंकिता कासट, रोहिणी वायदळ,शितल वायदळ, साक्षी कोरडे, निकिता कोरडे, उन्नती भुसारे यांच्या सहित विद्यार्थी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धर्मात राजकारण नको, धर्म पाळायला हवा : सोपान महाराज पहाणे

आधुनिक केसरी न्यूज

**लोणी खुर्द :** राजकारणात धर्म नको म्हणून धर्मात राजकारण आणले जाते.महाराजानी आनेक दृष्टांत, मार्मिक टिप्पणी, सूचक वक्तव्य आणि राजकीय संदर्भ देत करीत खुसखुशीत शैलीतून सोपान महाराज पहाणे पंढरपूर यांनी आपल्या विषयाची मांडणी केली. धर्मात राजकारण असावे की नाही, असा अनेकांना प्रश्न पडतो. परंतु मुळात धर्म आपल्याला कळतो का, हा खरा प्रश्न आहे. राजकारण हा मराठी माणसाचा आवडता विषय आहे. पण धर्माचारण आणि राजकारण यांमध्ये नेहमी गल्लत केली जाते. खऱ्या माणुसकीच्या धर्माचा आपल्याला विसर पडत चालला आहे. ती दुसऱ्या कोणाचीतरी जबाबदारी आहे, असे आपल्याला वाटते आसे महाराज म्हणाले. वैजापुर तालुक्यातील लोणीखुर्द येथे आखंड हरीनाम सप्ताह राम नवमी निमित्त दुपारी १२ वाजता राम जन्मोत्सव सोपान महाराज पहाणे यांनी धर्म रक्षावया अवतार घेसी, आपुल्या पाळीसी भक्तजना, अंबऋषी साठी गर्भ सोसीयेले, दुष्ट निर्दाळीले कीती एक, धन्य तुज कृपा सिंधु म्हणतील आपुला तू बोल साच करी, तुका म्हणे तुजवर्णिती पुराणे, होय नारायण दयासिंधु, या आभंगावर निरुपण करतांना महाराज म्हणाले. धर्माशिवाय मानवी जीवन व्यर्थचआहे. भारतीय संस्कृतीचा अर्थ अध्यात्म जीवन असाच अभिप्रेत आहे. जगातील अनेक धर्मांनी मानवतेची व आपापल्यापरीने मोक्षाची शिकवण समाजाला दिली. मानवाला भक्तीच्या माध्यमातून परमार्थिक सुख देण्यासाठी अनेक संत देवदेवतांनी अवतार घेतला. दशावताराततही श्रीकृष्ण अवतार हा सर्वश्रेष्ठ मानला गेला आहे. समाजात धर्माला ग्लानी येते. अधर्म वाढतो तेव्हा धर्माची संस्थापना करण्यासाठी भगवान अवतार घेतातण् पुढे बोलतांना सोपान



महाराज म्हणाले. रामनवमीचे व्रत केल्याने माणसाचे ज्ञान वाढते. त्याच्या सहनशक्तीचा विस्तार होतो. याशिवाय उपवास केल्याने विचारशक्ती, बुद्धी, श्रद्धा, भक्ती आणि पवित्रता वाढते. श्रीरामप्रभूंचे अवतारकार्य महान असून सर्वांसाठी अनुकरणीय आहे. आपल्या व्यक्तीमत्त्वाने संपूर्ण विश्वाला नितीमत्तेचा एक महान आदर्श निर्माण करून देणारे श्रीरामप्रभू अवघ्या भारतवासियांना पुजनीय आहेत. संत तुकारामांनी तर काम, क्रोध अभिमान जाण्यासाठी रामनामाची मात्रा दिली आहे- राम आणि कृष्ण भारतीय संस्कृतीचे आधारस्तंभ आणि भारतीय जनतेचे केंद्रबिंदू आहेत. प्रत्येकाच्या अंतःकरणात रामाचे नाव कोरलेले आहे. रामरंगी सगळे रंगले आहेत. राम आहे, म्हणूनच भारतीय जनतेत राम आहे. प्रत्येकाच्या जीवनात राम एकरूप झालेले असून खेडेगावातील दोन व्यक्तींची गाठभेट झाल्यास ते आदराने हात जोडून 'राम राम' असे म्हणतात. सोपान महाराज यांनी आध्यत्म. परमार्थ. वारकरी सांप्रदाय संस्कार आशा विविध विषयांवर प्रकाश टाकला. यावेळी कृष्णा महाराज. राहुल महाराज खरे, ज्ञानेश्वर माऊली मधाने अर्जुन महाराज वाडीकर राजाराम दादा गणेश महाराज उद्धव महाराज लोणी रामेश्वर महाराज सोनवणे चंद्रभान दादा चिकटगावकर सिताराम निकम एकनाथ पवार वासुदेव सोनवणे उध्दव जाधव याची प्रमुख उपस्थिती होती यावेळेस राम जन्मोत्सव साजरा करुन महाआरती केली. प्रसाद म्हणून साबुदाणा खिचडीचे वितरण करण्यात आले. उद्या सप्ताहाची सांगता चंद्रभागा चिकटगावकर याचे केल्याचे किर्तन होणार असून महाप्रसादासाठी उपस्थितीत राज्याचे आव्हान सप्ताह कमिटीच्या वतीने करण्यात आले.

# प्रसन्न वाणीचा गोडवा जपणारा झरा : सिद्धेश्वर पवार



किरण डोंगरदिवे
संपर्क क्र. 7588565576

आधुनिक केसरी

**आधुनिक केसरीमधील गोडवा या स्तंभाचे स्तंभलेखक सिद्धेश्वर पवार यांचा दि. 31 मार्च हा वाढदिवस. त्यानिमित्ताने त्यांच्या कार्याचा आढावा) कंचनी एक रहस्यमय स्वप्न कथा या लघुपटातील कंचमीच्या महालाचे स्वगत-संवाद असो, किंवा मेहकरच्या तीन चार तपांचा साक्षीदार म्हणून उभा असलेला चिंचेचा वृक्ष रस्त्याच्या कामात तोडला गेल्यावर त्याबद्दलची भावनिक साद असो वा पैनगंगा नदीवरील इंग्रज कालीन पुल मेहकरवासीयांशी काय बोलत असेल? जमीनदोस्त झालेली मेहकरची प्रताप टॉकीज पाहून मेहकरवासियांच्या मनात काय स्पंदने उमटत असतील? या सर्व बाबींचा विचार करा आपल्या लेखणीतून जनसामान्यांचा मनोभाव अगदी अचूक शब्दात मांडण्याचे काम करणारे व्यक्तिमत्व म्हणजे मित्रवर्य सिध्देश्वर पवार हे होय.**

सिद्धेश्वर पवार हा मेहकरच्या पत्रकारितेचा चेहरा होय. समाजकारण साहित्य आणि पत्रकारिता या तिन्ही आघाड्यांवर जेवढी जबरदस्त पकड आहे. त्या सर्वांपेक्षा वक्तृत्व आणि वाणीचा धनी म्हणून सिद्धेश्वर पवार यांची ओळख आहे. अगदी विद्यार्थीदशेपासूनच वक्ता म्हणून त्यांची महाराष्ट्रभर ओळख कशी निर्माण झाली हे सांगणे मला गरजेचे वाटते. तर 1994 मध्ये राष्ट्रीय सेवा योजना अमरावती विद्यापीठात राज्यस्तरीय शिबिराच्या समारोप कार्यक्रमाचा तो दिवस होता. मेहकरच्या मे ए सो विद्यालयातून प्रा गणेश परिहार यांनी पाठवलेले सिद्धेश्वर पवार, जयचंद बाठीया,गणेश निकम हे विद्यार्थी समारोपीय कार्यक्रमाच्या दालनामध्ये बसलेले होते. अशातच अगदी वेळेवर विद्यापीठाने या विद्यार्थ्यांची एक वाद विवाद स्पर्धा घ्यावी असा निर्णय घेतला. प्रत्येक विद्यापीठातून दोन विद्यार्थ्यांची निवड करून त्यांना मत मांडण्याची संधी द्यायची असा निर्णय झाला. मात्र अमरावतीचे प्रतिनिधित्व करण्यासाठी परस्परच दोन विद्यार्थी निवडले आणि कार्यक्रम होणार असे घोषित केले. सिद्धेश्वर पवार या विद्यार्थ्याने वरील बाबीवर आक्षेप घेतला. अमरावती विभागातून येथे जमलेले आम्ही सर्व विद्यार्थी समान आहोत त्यामुळे आमच्यापैकी जे पात्रतेचे असतील त्यांना संधी द्यावी असे मत त्यांनी मांडले. ग्रामीण भागातून आलेला किरकोळ देहयष्टीचा हा मुलगा सर्व विद्यार्थ्यांच्या न्यायासाठी आणि हक्कासाठी लढू लागला. त्याचे मित्र जयचंद बाठीया आणि गणेश निकम ह्यांनी त्याला साथ दिली. मग सर्व विद्यार्थ्यांना आपले मत मांडण्यासाठी एक विषय देण्यात आला. व त्यातून सर्वात चांगल्या दोघांना विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळणार असे समन्वयक दिलीप काळे यांनी सांगितले. ती एक प्रकारची पात्रता परीक्षा होती. आणि त्यात सिद्धेश्वर पवार आणि यवतमाळच्या अस्मिता शिर्के ह्या विद्यार्थिनीची निवड झाली. महाराष्ट्राच्या सर्व विद्यापीठ समितीने "अभ्यासक्रमात लैंगिक शिक्षणाची आवश्यकता आहे किंवा नाही ? असा ज्वलंत विषय वाद- विवादासाठी घेतला. या शिक्षणाची आवश्यकता नाही या बाजूने मत मांडत सिद्धेश्वर पवार हा विद्यार्थी त्या वेळी संपूर्ण महाराष्ट्रातून पहिला आला. त्याच सोबत विद्यार्थ्यांची सर्वोत्तम चमू म्हणून अस्मिता शिर्के आणि सिद्धेश्वर पवार ह्यांना पारितोषिक मिळाले. ज्या विचारपीठावर बोलण्याची संधीच उपलब्ध नव्हती, त्या विचारपीठावर स्वतः चे मत मांडण्यासाठी व्यवस्थेशी लढणे आणि त्या विचार पीठावर आपले निर्विवाद वर्चस्व सिद्ध करणे हा आजच्या भारतीय युवकांचा प्रातिनिधिक चेहरा आहे असे उद्‌गार बक्षीस वितरण करताना विद्यापीठाचे कुलगुरू गणेश पाटील ह्यांनी काढले. रा सु गवई साहेबांच्या हस्ते आपल्या हक्काचा पूरस्कार घेऊन खाली उतरल्यावर एका प्राध्यापकाने वक्तृत्व ही god gift असते असे उद्‌गार त्याचं अभिनंदन करत असताना काढले त्यावेळी this is not god gift this is dad gift असे उद्‌गारून फक्त मेहकर तालुक्यातच नव्हे तर संपूर्ण बुलढाणा जिल्ह्यामध्ये ज्यांच्या वक्तृत्वाचा नावलौकिक गाजला त्या भाऊसाहेब रा ना पवार स्वतःच्या वडिलांना आपल्या वाणीच्या देणगीच सर्व श्रेय देऊन सिद्धेश्वर पुढे निघाला. आणि तेथून त्याला पुन्हा कधी मागे वळून पाहिले नाही. वाणीवरील ह्या प्रभुत्वाने सिद्धेश्वर पवार ह्यांना अनेकदा मोलाच्या संधी उपलब्ध करून दिल्या जसे , 1997 मध्ये चरितार्थ चालवण्यासाठी देशोन्नती वृत्तपत्राची पत्रकारिता हिवरा आश्रम विभागातून सिद्धेश्वर पवार यांनी घेतली. जनसामान्यांच्या न्याय हक्कासाठी त्यांची लेखणी कार्य करू लागले. पत्रकारिता सुरू झाल्यावर अवघ्या तीन महिन्यात देशोन्नतीचा जिल्हास्तरीय मेळावा खामगाव येथे आदरणीय प्रकाशभाऊ पोहरे यांच्या मुख्य मार्गदर्शनाखाली सुरू होता. त्यावेळी त्या मेळाव्यात सिद्धेश्वर पवार या युवा पत्रकाराने दिलेले भाषण ऐकून प्रकाशभाऊ पोहरे प्रभावित झाले. आणि सिद्धेश्वर सारख्या अभ्यासू
तरुणांची देशोन्नतीला गरज आहे असे आपल्या भाषणातून सांगून सिद्धेश्वर पवार यांची नेमणूक मेहकर तालुका प्रतिनिधी म्हणून केली ही वाणीवरील प्रभुत्वाचीच देणगी होय. पुढे पत्रकारिता, कविता, राजकीय हितसंबंध, समाजकारण ,वक्तृत्व, सूत्रसंचालन ह्या सर्व क्षेत्रात त्यांनी स्वतःच्या नावाचा दबदबा निर्माण केला. बुलढाणा जिल्हा कॉंग्रेस उपाध्यक्ष लक्ष्मणराव घुमरे यांच्या कन्येच्या विवाह प्रसंगी अनेक दिग्गज राजकीय नेत्यांची मांदियाळी उपस्थित होती. आलेल्या महत्त्वांच्या पाहुण्यांचा पाटावर बसवून शाल श्रीफळ देऊन सत्कार करणे सुरू होते. अशावेळी कॉंग्रेसमधील ज्येष्ठ नेते केंद्रीय महासचिव मुकुल वासनिक हे सत्कार घेण्यासाठी पाटावर उभे राहिले आणि तो पाट मोडला. 4 ते 5 हजार लोकांच्या उपस्थितीत हा प्रकार घडला उपस्थित सभागृहातील सर्वच लोक हसू लागले. लक्ष्मणराव घुमरे यांच्या डोळ्यात पाणी तरळले, इतक्या मोठ्या नेत्याचा आपल्या दारात सत्कार करताना झालेला अपमान पाहूनच त्यांना काहीच सुचेनासे झाले होते. स्वतः मुकुल वासनिक साहेब सुद्धा मनात खजील झाले होते. मात्र प्रसंगावधान राखून सूत्रसंचालन करणारे सिद्धेश्वर पवार यांचे आवाजात एक धीरगंभीर वाक्य सभागृहाच्या कानाकोपऱ्यात ज्या माणसाचे वजन संपूर्ण देशाच्या राजकारणावर आहे त्याचे वजन हा चिमुकला पाट कसे पेलू शकणार ? ह्या एका वाक्याने मुकुल वासनिक यांना संपूर्ण देशातील त्यांचे राजकीय प्रस्थ काय आहे याची जाणीव करून देत सभागृहाला त्यांच्या मोठेपणाचीजाणीव करून दिली. वासनिक साहेबांचे समर्थकांनी अक्षरक्षः टाळ्यांचा पाऊस पाडला. लक्ष्मणरावांचा जीव भांड्यात पडला आणि वासनिक साहेबांच्या यावर स्मित हास्य पसरले. अशा प्रसंगामुळे सिद्धेश्वर पवारांच्या वक्तृत्वाची चर्चा जागोजाग होऊ लागली. विद्यमान खासदार ( तत्कालीन आमदार ) प्रतापराव जाधव यांची सुकन्या नम्रता ह्यांच्या लग्नामध्ये सिद्धहस्त सूत्रसंचालक अजीम नवाज राही यांच्यासोबत एकत्रित संचलन करत असताना बापलेकीचा नात्याचे वर्णन ज्या भावनिकतेने सिद्धेश्वर पवार यांनी केले त्यामुळे गहिवरले खासदार प्रतापराव जाधव लाखो लोकं लेकीच्या लग्नासाठी आले त्यांचे आभार मानण्यासाठी उभे तर राहिले पण गहिवरून गेलेल्या मनाने त्यांना बोलणें कठीण झाले आणि प्रतापराव जाधव यांच्यातील हळवा बाप लाखो लोकांनी पाहिला. वक्तृत्व आणि अभ्यास ह्यांनी प्रभावित होऊन तत्कालीन महिला व बाल विकास मंत्री नामदार सुभाषराव झनक सिद्धेश्वर पवारांना आपले स्वीय सहाय्यक म्हणून नियुक्त केले. त्या काळात मंत्रीमहोदयांच्या कानावर टाकून शक्य होईल तेवढ्या गरजवंताचे आणि गोरगरिबांची कामे अतिशय सकारात्मक पद्धतीने सिद्धेश्वर पवार यांनी करून दिली. 28 ऑक्टोबर 2013 रोजी यांचे निधन झाले.



लाखो लोक अंत्यविधीसाठी जमा झाले. तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण, पालकमंत्री विजयकुमार गावित, शिक्षण मंत्री राजेंद्र दर्डा, कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष माणिकराव ठाकरे, युवक कॉंग्रेसचे राज्याध्यक्ष विश्वजीत कदम, याशिवाय जवळपास मंत्रालय विदर्भातील अनेक लहान मोठे नेते ह्या सर्वांच्या उपस्थितीत अतिशय भावपूर्ण वातावरणात सुभाष झनक यांच्या कार्यकर्तृत्वाचा आढावा घेत सुभाषजी झनक यांच्यानंतर पोरक्या झालेल्या जनतेला आणि अमितला ( म्हणजे रिसोडचे विद्यमान आमदार अमितभाऊ झनक ) आता आधाराची गरज आहे. आलेल्या दिग्गजांनी आपला मायेचा हात अमितच्या डोक्यावर ठेवावा आणि त्याला आशीर्वाद द्यावेत व दिलासा द्यावा असे भावनिक आवाहन सूत्रसंचालन करत असताना सिद्धेश्वर पवार यांनी केले. आणि कार्यक्रमानंतर माजी मंत्री अझहर हुसेन यांनी सिद्धेश्वरला भेटून तुमने आजही अमित को आमदार बना डाला अशा शब्दात आपली प्रतिक्रिया व्यक्त केली. तत्कालीन कॉंग्रेसचे विदर्भ प्रदेशाध्यक्ष श्यामभाऊ उमाळकर यांनी सिद्धेश्वर तुझ्या वकृत्वामुळे आता कॉंग्रेसला अमित झनक शिवाय दुसरा उमेदवार दिसणार नाही आणि जनतेला अमित शिवाय दुसरा आमदार सुचणार नाही अशी सूचक प्रतिक्रिया दिली. अशोक चव्हाण आणि पृथ्वीराज चव्हाण यांनीसुद्धा सिद्धेश्वरला वैयक्तिक भेटून संवाद साधला. सूत्रसंचालना मध्ये संपूर्ण महाराष्ट्र अजीम नवाज राही ह्यांची बरोबरी करणे कुणालाही शक्य नाही त्या अजीम नवाज राही ह्यांच्या कन्येच्या आणि मुलाच्या लग्नातील सूत्रसंचालन सिद्धेश्वर पवार ह्यांनी केले हे विशेष. मध्यप्रदेशातील इंदूर येथे आधुनिक संत भय्यूजी महाराज यांनी आत्महत्या केली आणि संपूर्ण देश ढवळून निघाला. अनेक राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील नेते कार्यकर्ते यांच्याशिवाय भय्यूजी महाराजांना मानणारा त्यांचा भक्तगण अशी प्रचंड गर्दी भय्युजी महाराजांच्या अंत्यविधी चा कार्यक्रमाच्या वेळी जमली. फक्त महाराष्ट्रातीलच नव्हे तर संपूर्ण देश आपण कॉर्पोरेट जगतातील अनेक लोक भय्यूजी महाराजांच्या अंत्यदर्शनासाठी आलेले होते. त्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करणारा व्यक्ती ही गर्दी आणि हा जमाव पाहून गोंधळून गेला होता, तो प्रचंड जनसागर थोपविणे हे त्याला जमेना. ह्यावेळी खासदार प्रतापराव जाधव यांनी तेथे उपस्थित असलेल्या सिद्धेश्वर पवार ह्यांच्याकडे बोट दाखवून आयोजकाला, संचालन त्यांच्या हातात द्या असे सांगितले. आणि त्या भावनिक वातावरणात सिद्धेश्वर पवारांचा धीरगंभीर आवाज आणि शब्द प्रत्येक उपस्थित लोकांच्या हृदयाचा ठाव घेऊ लागले. कार्यक्रमानंतर पंकजा मुंढे, गिरीश महाजन तथा महाराष्ट्रातील आणि मध्य प्रदेशातील आमदार खासदार मंत्री यांच्यासह छत्रपती शिवरायांचे वारस खासदार उदयनराजे भोसले ह्यांनी ह्या सुत्रसंचलानाची दखल घेतली. उदयनराजे भोसले ह्यांनी एक शब्दही न बोलता सिद्धेश्वर पवारांच्या पाठीवर हाथ ठेवला आणि असंख्य शब्दातून जी आत्मीयता आणि प्रसंशा मिळणार नाही ती फक्त त्या स्पर्शाने व्यक्त झाली. आपले वकृत्व आणि वाणीचा गोडवा हा कोणत्याही आर्थिक फायद्यासाठी न वापरता समाजाच्या आणि मित्र परिवाराचे भल्यासाठी वापरावा असा भाऊसाहेब रा ना पवार यांचा दंडक त्यांचा सुपुत्र सिद्धेश्वर पवार यांनीसुद्धा अंगीकारला आहे. मध्यंतरी मराठा मोर्चा हा विषय संपूर्ण राज्यामध्ये गाजत होता. बुलढाणा जिल्ह्याच्या मराठा मोर्चाचे नियोजन समितीमध्ये सिद्धेश्वर पवार यांचा जिल्हास्तरावरून समावेश करण्यात आला होता. पंधरा लाखापेक्षा जास्त समाज बांधवांना संबोधित करण्याचे महत्वाचे कार्य शांततेत आणि इतर कोणत्याही समाजाच्या भावना दुखावल्या जाणार नाहीत अशा पद्धतीने हाताळण्याचे वक्तृत्व आणि नेतृत्व सिद्धेश्वर पवार च्या रूपाने बुलढाणा जिल्ह्याने पाहिले. बुलढाणा जिल्ह्याचे मराठा मोर्चाचे नियोजन पाहण्यासाठी मध्यप्रदेश बऱ्हाणपूर येथील काही मंडळी आवर्जून या मोर्चामध्ये सहभागी झाले होते त्यांनी सिद्धेश्वर पवार यांना विनंती करून बर्‍हाणपूर येथील मराठा मोर्चाचे आयोजन नियोजनात सहभागी करून सूत्रसंचालनाची जबाबदारी सोपविली ही सुद्धा फार मोठी वाणीची उपलब्धता आहे असे म्हणावे लागेल. मात्र सिद्धेश्वर पवार मराठा मोर्चा चे आयोजन नियोजन करणारे असले तरी जातीय चौकट यांना एका ठिकाणी बंदिस्त करू शकत नाही असे काही प्रसंग सातत्याने समोर आले. मेहकर तालुक्यातील घाटबोरी या गावी बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू राजरत्न आंबेडकर यांच्या जाहीर सभेत त्यांना मानाचा पुरस्कार मिळाला. त्याशिवाय त्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सिद्धेश्वर पवार यांनी केले. त्यांच्या भाषणात कौशल्याने प्रभावित होत राजरत्न आंबेडकर यांनी त्यांना आपल्या सोबत चळवळीत काम करण्याचे जाहीर निमंत्रण दिले. स्वतःच्या जीवनामध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आणि छत्रपती शिवाजी महाराज ह्या दोन्ही महापुरुषांचा विचार एकत्रित घेऊन चालताना सिद्धेश्वर पवार राजगृहावर झालेल्या दगडफेकीचा निषेध करणारे पत्र उपविभागीय अधिकारी मेहकर यांना देताना मेहकर वासियांनी पाहिले आहे. मराठा मोर्चात कुशल नेतृत्व करणारा हा सिद्धहस्त पत्रकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरी साहित्य अकादमी मेहकरचे तालुकाध्यक्षपद यशस्वीपणे सांभाळताना दिसतात. महेश परिवार मेहकर यांची वाणी म्हणजे सिद्धेश्वर पवार, खासदार प्रतापराव जाधव, आमदार संजय रायमुलकर, श्यामभाऊ उमाळकर, लक्ष्मणराव घुमरे किंवा मेहकर मधील इतर कोणतेही सामाजिक क्षेत्रात किंवा राजकारणी क्षेत्रांमध्ये कार्य करणाऱ्या महत्त्वपूर्ण व्यक्तीचे तोरणदार आणि मरणदार त्याचे पूर्णत्व सिद्धेश्वर पवारांच्या वाणी शिवाय होताना दिसत नाही. एका शब्दात किंवा एका वाक्यात एखाद्या कार्यक्रमासाठी राबणाऱ्या व्यक्तीला त्या कार्यक्रमाचे संपूर्ण श्रेय कसे द्यावे याचा आदर्श म्हणजे सिद्धेश्वर पवार यांचे सूत्रसंचालन पाहिजे. हर्षवर्धन कंकाळ, सिद्धेश्वर पवार आणि मी असे तिघजण ऑक्टोंबर 2021 मध्ये माझे मित्र हर्षवर्धन कंकाळसर यांचे वडील लक्ष्मणराव कंकाळ ह्या सामाजिक कार्यकर्त्याचा 86 वा वाढदिवसाच्या नियोजनात होतो. मी हर्षवर्धनला अगोदर सांगून प्रत्यक्ष कार्यक्रमात माझे नाव कुठेच येणार नाही याची दक्षता घेतली होती. मोठ्या थाटामाटात कार्यक्रम साजरा होत असताना आणि वक्ते भरभरून लक्ष्मणराव कंकाळ आणि कार्यक्रमाचे आयोजन नियोजन याबद्दल बोलत असताना कपिल कंकाळ हर्षवर्धन कंकाळ आणि सिद्धेश्वर पवार यांच्या नियोजनाची प्रशंसा करत होते. एका महत्त्वाच्या वक्त्याच बोलणे झाल्यावर सूत्रसंचालना मध्ये सिद्धेश्वरचे एक वाक्य पुढील प्रमाणे निघाले मित्रहो कार्यक्रमाचे आयोजन म्हणून तुम्हाला कपिल दादा, हर्षवर्धन आणि सिद्धेश्वर दिसत असला तरी आम्ही फ्रेम आहोत आणि ही फ्रेम ज्या चौकटीवर आहे तो खिळा म्हणजे किरण डोंगरदिवे ह्या एका वाक्याने त्या कार्यक्रमातील माझे सर्व कार्य अधोरेखीत करून त्याची जाणीव लोकांना सिद्धेश्वर पवार ह्यांनी करून दिली. आजही आधुनिक केसरी च्या दर बुधवारी प्रकाशित होणाऱ्या गोडवा ह्या सदराची चर्चा सर्वत्र सुरू आहे. त्याद्वारे ते अनेक उपेक्षित आणि दुर्लक्षित व्यक्तिमत्व आणि बाबी ह्यांना लोकांच्या पुढे आणत आहेत मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, मुख्यमंत्री अशोक चव्हाण, मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री आर आर पाटील, ग्राम विकास मंत्री पंकजा मुंडे अशा अनेक दिग्गजांच्या सभेचे सूत्रसंचालन सिद्धेश्वर पवार यांनी केले आहे. त्यांच्या वाणीने प्रभावित होत देवेंद्र फडणवीस यांनी सुद्धा 31 मार्च 2021 ला त्यांना आवर्जून वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. कोरोना आणि लॉकडाऊन काळात निर्वासित प्रवाश्यांना स्वतःच्या खाण्यापिण्याची व्यवस्था करणाऱ्या सिद्धेश्वर पवार ह्यांनी प्रसिद्ध साहित्यिक अजीम नवाज राही ह्यांच्या कोरोनाच्या संकटात अजीम राही ह्यांना मरणारच्या दारातून बाहेर काढण्यासाठी मा राजेंद्रजी शिंगणे आणि राजेंद्र काळे ह्यांच्या सोबत सिंहाचा वाटा उचलला अशी कृतज्ञता अजीम राही आजही जाहीरपणे करतात ह्यातच सिद्धेश्वर पवार ह्यांचे मोठेपण दडलेले आहे. कोरोना काळात केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी यांच्याशी बोलून मेहकरच्या सेंटरमध्ये ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेट मिळवून देणे असो की 2006 मध्ये विलासराव देशमुख यांच्याशी बोलून अंत्री देशमुख येथील पूरग्रस्तांना पुरातून बाहेर काढण्यासाठी हेलिकॉप्टर ची सुविधा उपलब्ध करणे असो अशा सर्व सामाजिक उपक्रमातून आणि सामाजिक जाणिवेतून कार्य करत, आपली सामाजिक उंची, साहित्य निष्ठा, जीवननिष्ठा ही लोककल्याणासाठी उपयोगी आली पाहिजे तेव्हाच आपल्या मनातील दैवत म्हणजे त्यांचे भाऊसाहेब रा ना पवार ज्यांचे आपण वारस असल्याचा अभिमान बाळगता येईल अशी स्पष्ट जीवन भूमिका आणि जीवन निष्ठा असलेल्या माझ्या अत्यंत जवळच्या मित्राला आज दि 31 मार्च ह्या दिवशी वाढदिवसाच्या लाख लाख शुभेच्छा!

# राज्यातील ‘नपुंसक’ ईडी सरकारने तत्काळ राजीनामा द्यावा : पटोले

## धार्मिक वाद रोखण्यात सरकार अपयशी, कायदा सुव्यवस्थेचा बोजवारा उडाला

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्यातील भाजपाप्रणित शिंदे सरकारच्या ९ महिन्यातील कारभाराने महाराष्ट्राच्या प्रतिमेला मोठा धक्का बसला आहे. काही संघटनांच्या भडकाऊ भाषणांनी राज्यात धार्मिक वाद वाढत आहेत पण शिंदे-फडणवीस सरकार त्यावर काहीच कारवाई करत नाही. सर्वोच्च न्यायालयाने तर महाराष्ट्र सरकार नपुंसक आहे, ते काहीच करत नाही म्हणून धार्मिक वाद विकोपाला जात आहेत असा संताप व्यक्त केला आहे. शिंदे-फडणवीस सरकारला ही मोठी चपराक असून सत्तेवर राहण्याचा त्यांना अधिकार राहिलेला नाही त्यांनी तात्काळ राजीनामा दिला पाहिजे, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.
शिंदे-फडणवीस सरकारवर सुप्रीम कोर्टाने व्यक्त केलेला संताप योग्यच आहे असे म्हणत कॉंग्रेस प्रदेशाध्यक्षांनी सरकारवर तोफ डागली, ते पुढे म्हणाले की, राज्यात कायदा सुव्यवस्था नावाचा प्रकार कुठेच दिसत नाही. सत्ताधारी पक्षातील आमदार खासदार खुलेआम गुंडगिरी करतात. गृहमंत्र्याच्या घरात कुख्यात माफीयाचा हस्तक राजरोस वावरतो तरी पोलीस यंत्रणा व गृहमंत्र्याला त्याची खबर लागत नाही. माजी मंत्री, आमदार यांच्यावर हल्ले होतात तरीही त्याची दखल घेतली जात नाही. सत्ताधारी पक्षाचा आमदार गोळीबार करतो तरी त्याच्यावर कारवाई करण्यास टाळाटाळ केली जाते. एक संघटना राज्यात मागील काही महिन्यांपासून विविध जिल्ह्यात मोर्चे काढते, सभा घेते व भडकाऊ, चिथावणीखोर वक्तव्य करते, यातून सामाजिक शांततेला धोका निर्माण झाला आहे. काही संघटनांनी पोलीसांकडे याबाबत तक्रार दाखली केलेली आहे परंतु पोलीस यंत्रणांचे हात बांधलेले आहेत. महाराष्ट्र हे पुरोगामी व प्रगत राज्य आहे, मुंबई व महाराष्ट्राचा जगभरात मोठा लौकिक आहे, त्याला गालबोट लावण्याचे काम काही संघटना धर्माच्या नावाखाली करत आहेत. सरकारने हे प्रकार तातडीने रोखले पाहिजेत पण सरकारमध्येच इच्छाशक्ती नसल्याने अशा संघटनांचे फावते. सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्र सरकारबद्दल जो शब्द वापरला तो आजपर्यंत कोणत्याही सरकारबाबत वापरलेला नाही, यावरून परिस्थिती किती गंभीर आहे हे लक्षात येते. शिंदे सरकार आल्यापासून कायदा सुव्यवस्थेचा बोजवारा उडाला आहे, असेही नाना पटोले म्हणाले.

